कामगार दिनानिमित्ताने वाचकांसाठी खास विशेष पुरवणी पान ८ वर
१ मे - जागतिक कामगार दिन आणि संयुक्त महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून 'कर्मचारी टाईम्स' च्या वाचकांना हार्दिक शुभेच्छा. - संपादक

# कर्मचारी टाइम्स

• मुंबई, १, मे २०२३ • वर्ष - १, अंक ४ • पाने ८ • किंमत १० रुपये फक्त
शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त
Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India
www.karmacharitimes.com • संपादक - श्री. एम. एम. उर्फ भाऊसाहेब पठाण • Email - karmacharitimes@gmail.com

'कर्मचारी टाइम्स'
KARMACHARI TIMES1
ALL-IN-1 QR CODE
वर्गणीदार व्हा...

## कामगारांच्या किमान वेतनाबाबत लवकरच निर्णय : कामगार मंत्री



**मुंबई** : कामगार संघटनांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून कामगारांना न्याय देण्यासाठी नवीन किमान वेतनाबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल. असंघटीत कामगारांची नोंदणी आणि विभागातील रिक्त पदांची भरती करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणार असल्याचे कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे २५ कामगार संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि प्रतिनिधींमार्फत कामगारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विधानपरिषद सदस्य भाई जगताप, सचिन अहिर, प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, अपर कामगार आयुक्त शिरीन लोखंडे, आयुक्त सतीश देशमुख, कामगार नेते नरेंद्र पाटील, राज्य अध्यक्ष डॉ.डी.एल.कराड यांच्यासह अधिकारी आणि संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सफाई कामगार, आरोग्य खात्याचे कामगार, माथाडी कामगार, घरकामगार, विडी कामगार, विक्रेते, रिक्षाचालक, यंत्रकामगार, ऊसतोड कामगार, स्थलांतरित कामगार, कंत्राटी कामगार यांच्या संघटनेच्या प्रतिनिधींनी कामगारांच्या समस्या यावेळी मांडल्या.

मंत्री श्री. खाडे म्हणाले, कामगार विभाग अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासन कार्यरत आहे. उद्योग सुरू राहीले तर कामगार जगेल, यासाठी कामगार केंद्रस्थानी ठेवून कामगारांच्या कल्याणासाठी निर्णय घेण्यात आले असून, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे, असेही ते म्हणाले.

कामगार विभागातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू असून, पुढील कार्यवाहीस गती देण्यात येत आहे. कामगारांसाठी क्षेत्रानुसार नवीन किमान वेतन तातडीने जाहीर करण्यात येईल. कामगार कल्याण मंडळाच्या अर्धवेळ कामगारांना नियमानुसार पगारात वाढ करण्यात येणार आहे. सुरक्षा मंडळाच्या सुरक्षा रक्षकांना महानगरपालिका आणि शासनात नियुक्त करण्याच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा करून निर्णय घेणार तसेच त्यांच्या पगार वाढीसंदर्भात तातडीने निर्णय घेणार, असेही त्यांनी सांगितले.

असंघटीत कामगारांची नोंदणी करण्यासाठी तालुका स्तरावर नोंदणी कार्यालय उभारण्यात येणार असून, या केंद्राअंतर्गत कामगारांना इतर सुविधाही पुरविण्यात येतील. प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन उभारण्यात येणार आहे. कामगार सुरक्षा विमा महामंडळ, कामगार कल्याण मंडळ, बॉयलर वर्कशॉप सुरू करण्यात येणार आहे.

सर्व संघटनांच्या वतीने करण्यात आलेल्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून कामगारांना न्याय देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## जुन्या पेन्शनबाबत शासकीय समितीपुढे अभ्यासपूर्ण मांडणी !

**मुंबई** : जुन्या पेन्शन योजनेच्या आंदोलनानंतर निवृत्त जेष्ठ सनदी अधिकारी सुबोध कुमार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समितीपुढे कर्मचारी संघटनांकडून अभ्यासपूर्ण मांडणी केली गेली.

कर्मचारी संघटनांच्या समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष अशोक दगडे, राज्य सरकारी गट 'ड'(चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे शिवाजी खांडेकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

सर्वांना जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागू व्हावी, जुन्या पेन्शनच्या तुलनेत आर्थिक लाभ व सामाजिक सुरक्षा तसेच नवीन पेन्शनमध्ये उचित बदल व्हावे, निवृत्तांना सद्यस्थितीत मंजूर झालेल्या निवृत्तीवेतनाची रक्कम योग्य असावी, हे समितीसमोर स्पष्ट करण्यात आले. याची सकारात्मक दखल समितीच्या अध्यक्षांनीही घेतली.

# नोकरभरती दुप्पट !

## शासकीय कर्मचारी संघटनांच्या मागणीला यश

**मुंबई** : राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघासह अन्य कर्मचारी संघटनांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. भारत देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून राज्य सेवेतील ७५ हजार पदे भरण्याची घोषणा राज्य सरकारने केली असली तरी प्रत्यक्षात विविध विभागांच्या मागणीनुसार पदसंख्या १ लाख ४५ हजारांवर गेली आहे. त्यातील ६,४९९ पदे आतापर्यंत भरण्यात आली असून, उर्वरित पदांसाठी भरतीची तयारी सुरू करण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पदभरतीचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी विविध विभागांकडून पदांबाबत माहिती देण्यात आली. राज्य शासनाच्या विविध विभागांत दोन लाखांहून अधिक पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरावीत, अशी सरकारी अधिकारी व कर्मचारी संघटनांची मागणी आहे. त्यापैकी ऑगस्ट २०२३ पर्यंत ७५ हजार पदे भरण्याचे ठरविण्यात आले आहे. प्रत्येक मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्याचा आढावा घेतला जात आहे.

या भरती प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट ब (अराजपत्रित), क व ड संवर्गातील पदे भरण्यासाठी 'टीसीएस' आणि 'आयबीपीएस' या नामांकित कंपन्यांची नियुक्ती केली आहे. लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे भरण्याची प्रक्रिया नियमित सुरू आहे.मंत्रिमंडळाच्या बैठकीत पदभरतीचा आढावा घेण्यात आला तेव्हा विविध विभागांनी त्यांच्याकडील भरती प्रक्रियेची माहिती सादर केली. काही विभागांमधील पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे, काही विभागांनी भरती प्रक्रिया सुरु करण्याची तयारी केली आहे. त्यानुसार येत्या काळात राज्य शासनाच्या सेवेतील जवळपास १ लाख ४५ हजार पदांची भरती होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. प्रत्येक विभाग व मंत्र्यांकडून जास्त पदे भरण्याचा आग्रह धरण्यात आल्याने पदांची संख्या वाढल्याचे मंत्रालयातील सूत्रांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, कोरोना काळानंतर नोकरी भरतीला ५० टक्के इतकी मर्यादा घालण्यात आली होती. ती आता दूर करण्यात आली आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने ७५ हजार हा आकडा निश्चित करण्यात आला होता. पण प्रत्यक्षात २९ विभागांचा आढावा घेतला असता ही भरती अपूर्ण राहिल तसेच त्यामुळे कामात गतिशीलता येण्यास अडचणी ठरतील, हे शासनाच्या लक्षात आले. त्यामुळेच ही भरती आता जवळपास दुप्पट करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ज्या विभागातील सुधारीत आकृतीबंध अद्याप अंतिम झालेला नाही, अशा विभागांतील गट अ व गट ब मधील वाहनचालक तसेच गट ब संवर्गातील पदे वगळून सरळ सेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के इतक्या मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्यास मुभा मिळालेली आहे. सरकारने मंजूर केलेला आकृतीबंध बाजूला ठेवून नोकर भरती करण्याची भूमिका घेतली आहे. सध्या राज्यात अनेक जागा रिकाम्या असल्यामुळे उपलब्ध कर्मचारी अथवा मनुष्यबळावर फार मोठा ताण येत आहे.

याबाबत त्वरित निर्णय घेण्याची मागणी कर्मचारी संघटनांकडून होत होती. राज्यात जवळपास २ लाख ४४ हजार ४०५ इतक्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत. एवढ्या प्रमाणावर कर्मचारी वर्गाची कमतरता असल्यामुळे प्रशासकीय कामात मोठी अडचण निर्माण होत होती. त्यामुळे संघटनांनी सातत्याने आग्रह धरला होता. मात्र तिजोरीवर ताण पडेल, या मानसिकतेतून हा निर्णय घेणे अवघड जात होते. आता मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भरती करण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. त्यामुळे पुरेशा प्रमाणावर राज्यात कर्मचारी वर्ग उपलब्ध होईल. राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी तसेच अन्य शासकीय कर्मचारी संघटनांच्या वतीनेही राज्य शासनाच्या या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे.

नवीन धोरणानुसार आरोग्य, गृह, ग्रामविकास, कृषि, सार्वजनिक बांधकाम, जलसंधारण, सामाजिक न्याय, आदिवासी आणि पशुसंवर्धन या विभागात ही भरती प्रामुख्याने करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया लवकरच पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## राज्य सरकारच्या सर्व विभागांचे मंत्रालयात होणार मूल्यांकन

**मुंबई** : सरकारकडून वेगवान कारभार हाकण्याचा प्रयत्न केला जात असला तरी काही विभागांचा कारभार अद्यापही संथगतीने सुरू आहे. त्यामुळे सरकारच्या सर्वच विभागांच्या कामांना गती देण्यासाठी केंद्र सरकारकडून या विभागांचे मूल्यांकन होणार आहे.

केंद्र सरकारच्या अखत्यारी-तील क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाकडून हे मूल्यांकन होणार असून, संबंधित विभागाचे अधिकारी मंत्रालयात येऊन कामकाजाचा दर्जा तपासणार आहेत.नरेंद्र मोदी यांच्या ई गव्हर्नन्स योजनेअंतर्गत शासकीय सेवा सुधारण्यावर भर देण्यात येत आहे. क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया आणि उत्तर प्रदेश सरकारने उत्तर प्रदेश गुणवत्ता संकल्प अभियान (उत्तर प्रदेश क्वालिटी मिशन) राबवले होते. त्याच धर्तीवर आता राज्याचा सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, जलसंपदा पाणीपुरवठा, गृह विभागातील तक्रार निवारणासाठी लागणारा वेळ आणि प्रलंबित प्रकरणांची संख्या लक्षात घेऊन राज्याच्या विविध विभागांचे क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियामार्फत मूल्यांकन करण्यात येणार आहे. कौन्सिलचे प्रतिनिधी मंत्रालयात येऊन सर्व शासकीय विभागांतील कामाचा दर्जा तपासून मुख्य सचिवांकडे अहवाल सोपविणार आहेत.

## अधिकारी कर्मचारी यांना मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**मुंबई** : स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शहरांबद्दल आस्था, जिव्हाळा ठेऊन काम करावे आणि आपल्या कारकीर्दीची छाप शहर विकासावर सोडावी, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील महापालिका आयुक्त, नगरपरिषद मुख्याधिकारी यांना केले.

नगरविकास दिनी झालेल्या सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभाा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मंत्री दीपक केसरकर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, महापालिका आयुक्त आय. एस. चहल, अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव सोनिया सेठी यावेळी उपस्थित होते.

## सेवानिवृत्ती वय ६० वर्षे करण्याचे मुख्यमंत्र्यांचे नि:संदिग्ध आश्वासन

**मुंबई** : पूर्वलक्षी प्रभावाने जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठीचे आंदोलन स्थगित केल्याच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाची मुख्यमंत्री महोदयां-समवेत वर्षा निवासस्थानी बैठक पार पडली. जुनी पेन्शन योजना लागू करावी या मागणीसाठी अधिकारी महासंघ आग्रही असून, यासंदर्भात राज्य शासनाने गठीत केलेल्या समितीसमोर अधिकारी महासंघाला बाजू मांडण्यासाठी पुरेशी संधी व वेळ देण्याच्या सूचना संबंधितांना कराव्यात, अशी विनंती सदर बैठकीत मुख्यमंत्र्यांना करण्यात आली.

सेवानिवृत्तीचे वय केंद्राप्रमाणे ६० वर्षे करण्याबाबत देखील अधिकारी महासंघाने बैठकीत अभ्यासपूर्ण भूमिका मांडली, त्याबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी आश्वासित केले. बैठकीत महसूल विभागीय संवर्ग वाटपाच्या अधिनियमातून पदोन्नत अधिकाऱ्यांना वगळणे; सेवानिवृत्ती उपदानाची मर्यादा केंद्राप्रमाणे रु.२० लाख करणे; ८० वर्षे वयावरील वरिष्ठ सेवानिवृत्तांना केंद्राप्रमाणे निवृत्तीवेतन वाढ देणे, आदींबाबत सकारात्मक चर्चा झाली. सर्व मागण्यांबाबत शासन निर्णय प्राधान्याने व्हावेत, अशी आग्रही भूमिका महासंघाच्या वतीने बैठकीत स्पष्ट करण्यात आली.

## सातव्या वेतन आयोगाची थकबाकी लवकरच

**मुंबई** : राज्यातील अकृषी विद्यापीठामधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाच्या मुंबईत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यामुळे कित्येक महिन्यांपासून या थकबाकीसाठी सनदशीर मार्गाने आंदोलन करणाऱ्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळण्यास मदत होणार आहे. थकबाकीची रक्कम देण्यासाठी सरकारी तिजोरीवर ९०० कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडणार आहे. दरम्यान, या निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर व्हावी तसेच परत एकदा आंदोलन करण्याचा निर्णय घ्यावा लागू नये, अशी अपेक्षा संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## महिला कर्मचाऱ्यांसाठी मोठ्या शहरांत वसतिगृहे बांधा

### राज्यपालांची सूचना

**मुंबई** : नोकरी, स्वयंरोजगार व उद्योगांमध्ये महिलांचा सहभाग वाढावा या दृष्टीने मोठ्या शहरांमध्ये काम करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे बांधण्यात यावीत, अशी सूचना राज्यपाल रमेश बैस यांनी केली. यासाठी कॉर्पोरेट्स व उद्योग संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही राज्यपालांनी केले.

राज्यपाल बैस यांच्या हस्ते तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉर्पोरेट सामाजिक दायित्व पुरस्कार' राजभवन मुंबई येथे प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

राज्यपाल म्हणाले, सर्व शहरांमध्ये, गर्दीच्या भागांमध्ये आणि विशेषत रेल्वे स्थानकांवर महिलांसाठी अद्ययावत स्वच्छतागृहे बांधावी, सार्वजनिक ठिकाणी व कार्यालयांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी रॅम्प बांधावे, अशाही सूचना राज्यपालांनी यावेळी उद्योग जगताला केल्या.

आपण मुख्यमंत्री असताना कॉर्पोरेट्सच्या मदतीने राज्यातील एक हजार गावांचे आदर्श गाव म्हणून परिवर्तन केले असल्याचे सांगून आगामी काळात राज्यातील २० हजार गावांचे सर्वंकष परिवर्तन करण्याचा शासन विचार करीत असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## सनदी अधिकाऱ्यांच्या गुंतवणुकीवर मर्यादा

**मुंबई** : सनदी अधिकाऱ्यांना शेअर्स गुंतवणुकीतील खरेदी विक्रीवर मर्यादा आणतानाच दरवर्षी या व्यवहारांची माहिती सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने बुधवारी याबाबतचा शासन निर्णय (जीआर) जारी केला.

अखिल भारतीय सेवेतील सनदी अधिकाऱ्यांना स्टॉक, शेअर्स तसेच इतर गुंतवणुकीतून सट्टबाजी करण्यास मनाई आहे. मात्र, स्टॉक ब्रोकर्स किंवा इतर एजंटच्या माध्यमातून प्रासंगिक गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली होती, मात्र वारंवार खरेदी-विक्री करता येत नाही. दरवर्षी याबाबतची माहिती जारी करणे बंधनकारक केले आहे.सेवा नियमानुसार शेअर्स, सेक्युरिटीज, डिबेंचर्स या चल मालमत्ता समजण्यात येतील.

## कामगार चळवळीची नवी बांधणी आवश्यक

**भाऊसाहेब पठाण**

आपण १ मे हा दिवस 'महाराष्ट्र दिन' आणि 'जागतिक कामगार दिन' म्हणून साजरा करतो. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली म्हणून 'महाराष्ट्र दिन' साजरा करतो, पण 'जागतिक कामगार दिन' हा सुद्धा १ मे रोजीच का असा प्रश्न बऱ्याच जणांना पडू शकतो. दरवर्षी आंतरराष्ट्रीय कामगार दिन किंवा जागतिक कामगार दिन हा जगभरातील कामगार चळवळीच्या गौरवासाठी पाळण्यात येणारा विशेष दिवस आहे. दर वर्षी १ मे रोजी जगभरातील ८०हून अधिक देशांमध्ये हा दिवस राष्ट्रीय सुट्टीचा दिवस म्हणून पाळला जातो. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर कामगारांना रोजगार मिळू लागला; परंतु त्यांची पिळवणूकही होत होती. कोणत्याही सुविधा न देता अल्प मजुरीच्या बदल्यात १२ ते १४ तास राबवून घेतले जात होते. या विरोधात कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. प्रत्येक कामगाराला केवळ ८ तास काम असावे, असा ठराव करण्यात आला; परंतु उद्योजक जुमानत नसल्याने मोठे आंदोलन उभारण्यात आले. त्यानंतर कामगार संघटनांची दोन आंतरराष्ट्रीय अधिवेशने झाली व १८९१ पासून १ मे हा कामगार दिन पाळण्यात येऊ लागला.

अनेक वर्षांनंतर अधिकाधिक देशांतले कामगार १ मे दिनाच्या सोहळ्यात सामील होत गेले आणि कामगार वर्गाच्या आंतरराष्ट्रीय ऐक्याचा विस्तार वाढत गेला. औद्योगिक राष्ट्रांतील कामगारांच्या जोडीला वसाहती देशातील शहरामध्ये लाखो कामगार १ मे दिन साजरा करू लागले. १ मे दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचे, स्वातंत्र्याचे मानवाकडून होणाऱ्या मानवाच्या पिळवणुकीचा अंत करण्याची प्रतीक बनला. साम्राज्यवादी भांडवलदारी व्यवस्थेच्या निषेधाचा अत्यंत व्यापक आविष्कार १ मे या दिवशी होऊ लागला. हा दिवस कामगार चळवळीची परंपरा झाली. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्यशक्ती या दिवशी आपल्या दलाची आणि बलाचीदेखील पाहणी करते, आढावा घेते. भविष्यातील नियोजन कार्यासाठी त्याचा उपयोग होतो. तसेच भारतात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व याच्या आधारे कामगार चळवळ पुढे नेण्याचा निर्धार होतो.

जशी वर्षे लोटली तसतशा अधिकाधिक देशांतल्या संघटना १ मे दिनाच्या सोहळ्यात सामील होत गेल्या आणि कामगार वर्गाच्या आंतरराष्ट्रीय ऐक्याचा विस्तार वाढत गेला. भारतातील पहिला कामगार दिन तत्कालीन मद्रास शहरात १ मे १९२३ रोजी पाळण्यात आला. लेबर किसान पार्टी हिंदुस्थान या संघटनेने हा दिवस पाळला होता. याच दिवशी भारतात सर्वप्रमथ लाल बावटा वापरण्यात आला. कामगार नेते सिंगरवेल चेत्तीअर यांनी कामगार दिन कार्यक्रमाच्या आयोजनात पुढाकार घेतला होता. मद्रास उच्च न्यायालयासमोरील जागेत हा दिवस साजरा झाला होता. देशाच्या व जगाच्या विकासात कामगारांच्या योगदानाला सलाम करण्यासाठी हा दिवस जगभरात कामगार दिन म्हणून पाळला जातो.

आधी गुलामगिरी आणि यंत्रांच्या आगमनानंतर कमी दर्जाची मानली जाणारी श्रमशक्ती संघटित झाली आणि कामगार चळवळींच्या रूपाने श्रमिकांची ताकद जगाला कळली. मात्र दोन शतकांपेक्षा जास्त काळ उलटला तरी श्रमजीवी न्याय्य हक्कांपासून बरेच दूर दिसतात. मालकांची नफेखोर वृत्ती त्यांना यापासून वंचित ठेवण्याचे काम करते. काळाचे आव्हान कामगार चळवळीने स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याच्या हक्काला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीच्या चळवळीनेच होऊ शकतो. पुरोगामी बुद्धिजीवी वर्ग, शेतकरी वर्ग व लहान उद्योजक हे लोकशाही शक्तीचे विभाग आहेत. हे सर्व होण्यासाठी वर्ग जागृतीची गरज आहे. कामगार शक्तीच्या वाढतीचा आत्मविश्वास कामगारामध्ये निर्माण होण्याने चळवळीला धार येऊ शकते. जागतिक कामगार संघटनेच्या काँग्रेसने आपल्या घोषणापत्रावर विश्वास व्यक्त केलेला आहे. याच घोषणापत्रामध्ये काँग्रेसने असा विश्वास व्यक्त केला आहे की जागतिक, राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर कामगार संघटनांमध्ये एक प्रकारचा भक्कम भ्रातृभाव निर्माण करून आपले स्वतंत्र व्यासपीठ भक्कम उभे करून अर्थनिर्भर अर्थकारण व शाश्वत विकास या मागण्यांसाठी शक्ती उभी करावी. कामगार चळवळीपुढे अनेक आव्हाने आहेत. बदलत्या काळानुसार त्याचे स्वरुप भिन्न आहे. त्यामुळे आपल्याला वेगळ्या पद्धतीने त्याची व्यूहनीती आखावी लागेल आणि सोडवणूक करून घ्यावी लागेल. भविष्यात अनेक समस्या निर्माण होणार असल्यामुळे कामगार चळवळी सक्रीय ठेवायच्या असतील तर त्यांची नव्याने बांधणी करावी लागेल.

## मंत्रालय को. ऑ. बँकेच्या उपाध्यक्षपदी सुनील खाडे

**मुंबई** : मंत्रालय बँकेच्या उपाध्यक्षपदी सुनील खाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. मंत्रालय बँकेची शतकपूर्तीकडे वाटचाल सुरू असून या बँकेने नुकताच सन २१-२२ सालासाठी पगारदार नोकरांची आदर्श बँक म्हणून प्रथम क्रमांक पटकावला आहे. मंत्रालय बँकेच्या नवीन ४ शाखा पुणे, नगर, पालघर व नाशिक येथे लवकरच सुरू करण्यात येणार आहेत.

मंत्रालय बँकेवर १५ संचालक आहेत, त्यातील सर्वांशीच सलोख्याचे व संबंध असलेले सुनील खाडे यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यासाठी बँकेचे अध्यक्ष प्रमोद पंडित व सहकारी संचालक मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले, त्या सर्वांचे सुनील खाडे यांनी आभार व्यक्त केले.

## पडवीपठार येथे सडक योजनेतून रस्ता मंजूर

**महाड** : महाड-पोलादपूर-माणगांव भागातील आमदार भरतशेठ गोगावले यांनी पडवीपठार येथे मुख्यमंत्री सडक योजनेतून रस्ता मंजूर केला आहे.

हनुमान सेवाग्राम मंडळाचे पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहेत. अध्यक्ष भिकू साळुंके यांनी त्याचा पाठपुरावा केला. सरचिटणीस सुभाष साळुंके, चंद्रकांत साळुंके यांचा प्रशासकीय अनुभव दत्तात्रेय साळुंके, अशोक शेलार, तुळशीराम साळुंके, राजाराम साळुंके, शांताराम साळुंके, विठ्ठल साळुंके, भाऊ साळुंके, हनुमंत साळुंके, तानाजी साळुंके, संकेत साळुंके व मंडळाचे सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्यामुळे मुख्यमंत्री सडक योजनेतून रस्ता मंजूर झाला आहे.

## राजपत्रित अधिकारी महासंघ पेन्शन योजनेसाठी सक्रीय

**मुंबई** : शिक्षक-कर्मचाऱ्यांना अत्यंत जिव्हाळ्याची असणारी जुनी पेन्शन योजनाच लागू करण्यात यावी यासाठी राजपत्रित अधिकारी महासंघ आता अधिक सक्रीय झाला आहे.

जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, यासाठी राज्यात नुकताच लक्षवेधी संप झाला. या संपाची परिणिती म्हणून राज्य शासनाने राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (एनपीएस) व जुनी निवृत्तीवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी समिती गठीत केली आहे. या समितीसमोर द्यावयाच्या प्रस्तावावर चर्चा करुन योग्य मसुदा तयार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी, महासंघाने सक्रीय पुढाकार घेऊन सर्व संघटनांची महत्त्वपूर्ण सभा नुकतीच मंत्रालयात आयोजित केली होती. शिक्षणक्षेत्रासह इतर सर्व क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर या सभेत मौलिक चर्चा संपन्न झाली.

जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी शिक्षक-कर्मचारी संघटना व समन्वय समितीच्या वतीने राज्यात बेमुदत संप पुकारण्यात आला होता. या संपात राजपत्रित अधिकारी महासंघाने सहभागी होण्याचा निर्णय घेतला होता. दरम्यान तत्पूर्वीच समन्वय समिती व शासनाच्या वाटाघाटीनंतर हा संप मागे घेण्यात आला. त्या संदर्भात 'जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे खात्रीशीर अर्थिक व सामाजिक सुरक्षिततेची हमी देण्याचे धोरण' तत्व म्हणून राज्य शासन मान्य करीत असल्याचे लिखीत स्वरुपात मा. मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीत देण्यात आले. यासाठी तत्काळ समितीसुध्दा शासनाने गठीत केली.

शासनाने गठीत केलेल्या ज्येष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या समितीसमोर महासंघाच्या वतीने वस्तुनिष्ठ आकडेवारीसह भूमिका मांडून अभ्यासपूर्ण प्रस्ताव सादर करण्यासाठी सभा घेऊन चर्चा करण्यात आली.

या सभेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक व प्रमुख सल्लागार ग.दि.कुलथे होते तर मार्गदर्शक म्हणून महासंघाचे अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, राज्य संघटक इंजि. विनायक लहाडे, चारूशिला चौधरी, ही शिर्ष संघटना असल्याने या बैठकीतून विचारांची ही मांडणी तेवढ्याच दमदारपणे करण्यात आली. उपस्थित घटक संघटनांच्या व निमंत्रीत संघटनांच्या प्रतिनिधींनी आपले मुद्दे अगदी पोटतिडकीने मांडलेत. त्यांची दखल उपस्थित मान्यवरांनी घेतली. यामध्ये प्रामुख्याने जुनी पेन्शन संघटना, महाराष्ट्र राज्य नगरपरिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, मुख्याध्यापक संघ माध्यमिक शिक्षक संघ, मंत्रालय कर्मचारी संघटना, शासकीय आश्रमशाळा अधीक्षक संघटना, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय संघटना, सैनिक पुनर्नियुक्त कर्मचारी संघटना, जीएसटी अधिकारी संघटना इत्यादी संघटनांनी प्रामुख्याने जुनीच पेन्शन योजना लागू करण्याची मागणी पुढे रेटली आहे.

महासंघाच्या भूमिकेबद्दल समीर भाटकर सरांनी आकडेवारीसह छत्तीसगढ, झारखंड राज्यासह आपण कशी योजना मांडू यांचे प्रत्यक्षिकच समजावून सांगितले. कॅगचा अहवाल व त्यानंतर लागू करण्यात आलेली अधिसूचना व त्यानंतर अंमलबजावणी करण्यात आलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना कशी फसवी ठरू शकते हे विषद केले.

अध्यक्ष विनोद देसाई यांनी समितीसमोर जाण्यापूर्वीची ही मॉकड्रील असून आपल्याला जुनीच पेन्शन योजना ही फायदेशीर असल्याचे सुतोवाच केले. त्यांनी सध्या एनपीएस नुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना मिळणाऱ्या ३ ते ४ हजार रू. पेन्शनबाबत चिंता व्यक्त केली.

संस्थापक सल्लागार ग.दि.कुलथे यांनी पेन्शन व इतर लढ्यात अधिकारी हे कर्मचाऱ्यांच्या सतत सोबतच असतील तसेच गठीत समितीला विहित मुदतीत सकारात्मक अहवाल सादर करण्यास बाध्य करु असे आश्वासित केले.

एकंदरीत पुढील काही दिवसांत त्रिस्तरीय समितीसमोर सर्व संघटनाच्या माध्यमातून वस्तुनिष्ठ आकडेवारीसह भूमिका मांडून अभ्यासपूर्ण प्रस्ताव सादर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ सक्रीय झाला आहे.

निश्चितच जुनी पेन्शन योजनाच लागू व्हावी ही सर्वांची मागणी जरी असली तरी सरकार नेमके कोणते 'तत्व' स्वीकारते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## १५ हजार वैद्यकीय पदे दोन महिन्यांत भरणार !

**छत्रपती संभाजी नगर** : वैद्यकीय क्षेत्रातील १५ हजार पदे येत्या दोन महिन्यांत भरण्यात येतील, अशी माहिती छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या अवयवदानविषयक जनजागृती अभियानाच्या उद्घाटन सोहळ्यात वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

डॉक्टरांची संख्या अपुरी असून त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्यात येत आहेत, एनएमसी मानकांनुसार निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची १,४३२ पदे नुकतीच भरण्यात आली होती. गट क वर्गातील ४,५०० पदे महिनाभरात भरली जातील तर गट ड वर्गातील ३,८७४ पदे ही जिल्हा निवड समितीमार्फत भरण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## नोंदणी, मुद्रांक विभाग भरणार ३५० पदे

**पुणे**: नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागात सुमारे ३५० पदे भरली जाणार आहेत.

त्यासंदर्भात बिंदुनामावली निश्चित करण्याचे कामदेखील सुरू केले आहे. काही पदांवरील अधिकारी, कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीही मिळणार आहे. पदोन्नती आणि निवृत्त झालेल्या पदांवरील अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची पदे रिक्त होणार असून, ती पदे भरतीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, असे विभागाकडून सांगण्यात आले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून गेल्यावर्षी ७८ पदे भरली होती. यावर्षी ८९ जागांसाठी भरतीप्रक्रिया राबविण्यात येत आहे.ही प्रक्रिया लवकरच पूर्णत्वाला येत आहे.

## दी महाराष्ट्र मंत्रालय क्रेडिट सोसायटीत महामानवाची जयंती पहिल्यांदाच साजरी



**मुंबई** : दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑप. क्रेडिट सोसायटीत गेले ४० वर्षात कधीही महामानवाचे फोटो लागले नाही. तरी या वर्षी नवीन संचालक मंडळाने महामानवांचे फोटो लावून मानवंदना दिली आणि त्यांची जयंती साजरी केली.

नवीन संचालक मंडळांने संस्थेच्या सभासदांसमोर एक आदर्श निर्माण केला. संस्थेचे उपाध्यक्ष माननीय भाऊसाहेब पठाण, खजिनदार माननीय सुधीर कळवणंकर आणि संचालक मंडळ व संस्थेचे सभासद व संस्थेचे कर्मचारी वर्ग उपस्थित राहून महामानवाची जयंती साजरी केली. या उपक्रमामुळे सदस्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## जुनी पेन्शन योजना लागू होईपर्यंत लढा

**भंडारा** : जुनी पेन्शन मिळावी याकरिता सर्वच विभागातील राज्य सरकारी, निमसरकारी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी संप पुकारला होता. यात शासनाने निर्णय काढला. परंतु जोपर्यंत सरसकट जुनी पेन्शन योजना लागू होणार नाही तोपर्यंच आम्ही स्वस्थ बसणार नाही, लढा सुरूच राहील, अशी निर्णायक भूमिका महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना भंडाराने घेतली आहे.

शासनाने निर्णयात १ नोव्हेंबर २००५ पासून रुजू झालेल्या एनपीएसधारक कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना कुटुंब निवृत्ती वेतन त्यांच्या शेवटच्या पगाराच्या ५० टक्के दराने दहा वर्षे आणि नंतर ३० टक्के दराने पेन्शन मिळणार, असे म्हटले आहे.

## वेगवान कामासाठी "मंत्रालय मध्यवर्ती टपाल स्वीकृती केंद्र"

**मुंबई** : मंत्रालयात येणाऱ्या सामान्य नागरिकांच्या टपालावर जलद गतीने कार्यवाही व्हावी यासाठी मंत्रालयात मध्यवर्ती टपाल केंद्र सुरू करण्यात आले आहे. शासनाचा कारभार पारदर्शक होण्यासाठी मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागात ई-ऑफिस होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत असून, शासनाचा कारभार हा लवकरच कागद विरहित (paperless) करण्याचा शासनाचा मानस असल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिली.

मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना नागरीकांकडून तसेच क्षेत्रीय कार्यालयांकडून पाठविण्यात येणारे टपाल स्वीकारण्यासाठी मंत्रालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ मध्यवर्ती टपाल केंद्र सुरू करण्याबाबत आयोजित पत्रकार परिषदेत अपर मुख्य सचिव श्रीमती सौनिक बोलत होत्या. यावेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभागाच्या महासंचालक जयश्री भोज आणि अधिकारी उपस्थित होते.

श्रीमती सौनिक म्हणाल्या की, सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये प्राप्त होणाऱ्या टपालांवर तत्काळ कार्यवाही व्हावी व वेळेचा अपव्यव टाळण्यासाठी टपाल केंद्र उभारण्यात आले आहे. यासाठी मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागात तसेच विविध क्षेत्रीय कार्यालयांमधील पत्रव्यवहार करताना प्रत्येक पातळीवर टपाल ई- ऑफिसच्या माध्यमातून पाठविण्यासाठी ई-ऑफिस प्रणालीचा वापर प्रभावीपणे करण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

मंत्रालयात फक्त टपाल देण्यासाठी येणाऱ्या नागरिकांकडून आणि क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांद्वारे प्राप्त होणारे टपाल स्वीकारण्यासाठी कार्यालयीन वेळेत मंत्रालयाच्या मध्यवर्ती टपाल केंद्रात टपाल स्वीकृतीसाठी विभाग व कार्यालय निहाय व्यवस्था करण्यात आली आहे. या केंद्रामध्ये संबंधित विभागाने स्वीकारलेले टपाल स्कॅन करुन ते संबंधित प्रशासकीय विभागाच्या नोंदणी शाखेस ई-ऑफिसद्वारे ऑनलाईन पाठविण्यात येईल, याकरिता मध्यवर्ती टपाल केंद्रातील विभागांकरिता स्वतंत्र ई-खाते एनआयसी (NIC) मार्फत तयार करण्यात येणार आहे.

नोंदणी शाखेस ई-ऑफिस प्रणालीद्वारे ऑनलाईन पाठविण्यात आलेल्या टपालावर संबंधित विभागाने ई-ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून कामकाज करणे अपरिहार्य आहे. 'आपले सरकार' या वेब पोर्टलच्या माध्यमातून ५११ सेवा पैकी ३८७ सेवा नागरिकांना दिल्या जातात. शासनाच्या सेवा लोकाभिमुख करण्यासाठी १२४ सेवांचा समावेश करण्यात येणार आहे. त्याचबरोबर नागरिकांना आपले अर्ज दाखल केल्यापासून सेवा सहज मिळाव्यात यासाठी मोबाईल ॲपदेखील सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे.

## पालिका कर्मचाऱ्यांच्या बदल्या कधी ?

**पुणे**: पुणे महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंत्यांच्या नुकत्याच बदल्या करण्यात आल्या. लवकरच अन्य कर्मचाऱ्यांच्याही बदल्या करण्यात येणार आहेत. महानगरपालिकेत वर्ग एक ते तीन मधील अधिकाऱ्यांच्या दर तीन वर्षांनी बदल्या कराव्यात, असा नियम आहे. तोच नियम शिक्षण विभागात लागू करून बदल्या करण्यात याव्यात, अशी मागणी पुणे महापालिकेच्या शिक्षण समितीच्या माजी अध्यक्ष मंजूश्री खर्डेकर यांनी महापालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे. पुणे महापालिकेच्या शिक्षण विभाग कार्यालयात वर्षानुवर्षे तेच ते अधिकारी व कर्मचारी काम करत आहेत. त्यामुळे येथील कर्मचाऱ्यांची मक्तेदारी निर्माण झाली आहे.

## अग्निशमन जवानांची बांधिलकी उल्लेखनीय : मुख्यमंत्री

**मुंबई** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त राज्याला संदेश दिला. ते म्हणाले, अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त, मी सर्व अग्निशमन दलाच्या जवानांचे नागरिकांचे प्राण आणि मालमत्ता वाचविण्याच्या वीर भूमिकेबद्दल अभिनंदन करू इच्छितो. अग्निशमन दलाच्या जवानांची बांधिलकी आणि त्याग उल्लेखनीय आहे.

अग्निशमन दल विभागाविषयी बोलताना मुंबईचे मुख्य अग्निशमन अधिकारी संजय मांजरेकर म्हणाले, नागरिक आणि अग्निशमन विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांनीच शहर आगमुक्त होऊ शकते. वर्षभर आम्ही मॉक ड्रिल, जनजागृती कार्यक्रम, व्याख्याने, प्रशिक्षण, प्रात्यक्षिके इत्यादीद्वारे नागरिकांना अग्निसुरक्षेबाबत जागरूक करण्याचा प्रयत्न करत आहोत. दरवर्षी आम्ही अग्निशमन सेवा सप्ताहादरम्यान जागरूकता आणि अग्निसुरक्षा शिबिरे घेतो जेणेकरून नागरिकांना सुरक्षा प्रोटोकॉलबद्दल शिक्षित आणि प्रशिक्षित करता येईल. शहरामध्ये अलिकडच्या काही महिन्यांत विशेषत: उंच इमारतीत लागलेल्या आगी पाहता त्यावर निर्वासन उपाय करणे आवश्यक आहे. त्यानुसार पालिका आयुक्तांच्या मान्यतेनंतर २०१८ मध्ये फायर इव्हॅक्युएशन लिफ्ट ही संकल्पना आधीच लागू करण्यात आली होती. यामुळे आगीच्या आपत्कालीन परिस्थितीत रहिवाशांना तसेच अग्निशमन दलाला स्वत:हून बाहेर काढण्यास मदत होईल.

स्पार्टन फायर इव्हॅक्युएशन लिफ्टचे एमडी व उद्योग तज्ञ डॉ. विक्रम मेहता म्हणाले, अग्निशमन दलाच्या कष्टाची कल्पना करणे शक्य नाही. ते खरे सुपरहिरो आहेत जे इतरांच्या जीवनासाठी लढतात. आपल्या तारणकर्त्यांना (फायरमन) वाचवण्याची वेळ आली आहे.

पुण्याचे मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे म्हणाले, अग्निसुरक्षा नियम आणि नियमांचे पालन करणे हे केवळ कायदेशीर बंधन नाही, तर सर्व नागरिक, बांधकाम व्यावसायिक आणि विकासक यांची नैतिक जबाबदारी आहे. पुण्याला आगमुक्त शहर बनवण्यासाठी आपण एकत्र येऊन आपल्या आणि आपल्या समाजाच्या सुरक्षेला प्राधान्य देऊया.

सिडकोचे मुख्य अग्निशमन अधिकारी विजय राणे म्हणाले, अग्निशमन सप्ताह केवळ तेवढ्याच काळापुरता मर्यादित न ठेवता नियमित अग्नी-सुरक्षिततेबाबत समाज प्रबोधन होणे ही आवश्यक बाब आहे. अग्निसुरक्षा ही नागरिक व अग्निशमन विभाग यांची संयुक्त जबाबदारी आहे. 'स्वच्छ भारत अभियान' या प्रमाणेच 'अग्निसुरक्षित भारत' ह्या अभियानाबाबत विचार झाला पाहिजे.

समाधान देवरे, विभागीय अग्निशमन अधिकारी ठाणे म्हणाले, आम्ही दरवर्षी अग्निसुरक्षा आणि निर्वासन या विषयावर लोकांना शिक्षित करण्यासाठी प्रशिक्षण आणि जनजागृती कार्यक्रम करतो. ठाण्यातील प्रत्येक उच्चभ्रू इमारत सुरक्षित राहावी यासाठी आमचे प्रयत्न आहेत. उंच इमारतींसाठी फायर इव्हॅक्युएशन लिफ्ट अग्निशमन दलासाठी एक दिलासा आहे कारण ते त्यांना जलद आणि सुरक्षितपणे बाहेर काढण्यात मदत करते. अग्निशमन दल अधिक वेगाने पोहोचू शकतात आणि आग वाढण्याआधी ती वेळेवर विझवू शकतात. सोसायट्या, बिल्डर्स, डेव्हलपर्स आणि नागरिकांच्या पाठिंब्याने ठाणे शहर अधिक सुरक्षित करता येईल.

**मध्यवर्ती टपाल केंद्र खिडकी क्रमांक व ज्या विभाग/कार्यालयाचे टपाल स्वीकारले जाईल त्यांची नावे तसेच सदर खिडक्यांवर टपाल स्वीकारण्यासाठी मार्गदर्शक सूचना.**

| खिडकी क्रमांक | कार्यालय/प्रशासकीय विभाग |
|---|---|
| खिडकी क्रमांक १,२, व ३ | - मा. मुख्यमंत्री कार्यालय (मुख्यमंत्री सहायता कक्षाच्या टपालासह) |
| खिडकी क्रमांक ४,५, व ६ | - मा. उपमुख्यमंत्री कार्यालय |
| खिडकी क्रमांक ७ | - सामान्य प्रशासन विभाग (मुख्य सचिव कार्यालयासह) |
| खिडकी क्रमांक ८ | - गृह विभाग |
| खिडकी क्रमांक ९ | - महसुल व वन विभाग |
| खिडकी क्रमांक १० | - कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग |
| खिडकी क्रमांक ११ | - शालेय शिक्षण व क्रीडा विभाग उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| खिडकी क्रमांक १२ | - नगर विकास विभाग |
| खिडकी क्रमांक १३ | - वित्त व नियोजन विभाग |
| खिडकी क्रमांक १४ | - सार्वजनिक बांधकाम विभाग<br>- जलसंपदा विभाग |
| खिडकी क्रमांक १५ | - विधी व न्याय विभाग<br>- संसदीय कार्य विभाग |
| खिडकी क्रमांक १६ | - उद्योग, उर्जा व कामगार विभाग<br>- महिला व बाल विकास विभाग |
| खिडकी क्रमांक १७ | - ग्राम विकास विभाग |
| खिडकी क्रमांक १८ | - अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग<br>- कौशल्य विकास व उद्योजकता विभाग |
| खिडकी क्रमांक १९ | - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग<br>- अल्पसंख्यांक विकास विभाग |
| खिडकी क्रमांक २० | - गृहनिर्माण विभाग<br>- मराठी भाषा विभाग |
| खिडकी क्रमांक २१ | - पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग<br>- मृद व जलसंधारण विभाग |
| खिडकी क्रमांक २२ | - सार्वजनिक आरोग्य विभाग<br>- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग |
| खिडकी क्रमांक २३ | - पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग<br>- आदिवासी विकास विभाग |
| खिडकी क्रमांक २४ | - सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग<br>- पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग |
| खिडकी क्रमांक २५ | - इतर मागास व बहुजन कल्याण विभाग<br>- दिव्यांग कल्याण विभाग |

## सेवानिवृत्तीच्या एक दिवस आधीही कर्मचारी वेतनवाढीचे हक्कदार

**नवी दिल्ली** : सरकारी कर्मचारी निवृत्तीच्या एक दिवस आधीसुद्धा वार्षिक वेतनवाढीचे हक्कदार असतात, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्य न्यायालयाने दिला.

सरकारी मालकीच्या 'कर्नाटक पॉवर ट्रान्समिशन कार्पोरेशन लि.' च्या (केपीटीसीएल) एका अपिलावर सर्वोच्य न्यायलयाने हा निर्णय दिला. सेवानिवृत्तीच्या एक दिवस आधीही सरकारी कर्मचारी वार्षिक वेतनवाढीचे हक्कदार असतात, असा मूळ निर्णय कर्नाटक उच्च न्यायालयाने दिला होता.त्याविरोधात कंपनीने सर्वोच्च न्यायालयाच अपील केले होते. उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे.

सर्वोच्य न्यायालयाचे न्या.एम.आर. शाह आणि न्या.सी.ची रविकुमार यांच्या पीठाने केपीटीसीएलची याचिका फेटाळून लावताना म्हटले की, वार्षिक वेतनवाढ ही प्रोत्साहन स्वरुपात देण्यात येत असल्यामुळे सेवेत नसणाऱ्यांना ती देण्याचा प्रश्नच येत नाही, हा अपीलकर्त्याचा युक्तीवाद निरर्थक असल्याचे न्यायालयाने म्हटले. सरकारी कर्मचाऱ्यास वर्षभर केलेल्या चांगल्या आचरणाच्या आधारावर वेतनवाढ दिली जाते. दुसऱ्या दिवशी निवृत्त होणार असला तरी वेतनवाढीपासून वंचित ठेवता येऊ शकत नाही. त्यामुळे याबाबत गेल्या काही दिवसांपासून असलेला संभ्रम नक्कीच दूर होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

## प्रभारी पदाचा फटका

**उमरी** : उमरीच्या तहसीलदारांची महिनाभरापूर्वी बदली झाली असून, त्यांच्या जागेवर अद्याप नवीन तहसीलदार रूजू झाले नाहीत. येथे केवळ नायब तहसीलदारावरच कारभार चालत आहे. तहसीलदारांचा अतिरिक्त कार्यभार धर्माबाद तहसीलदारांकडे दिला असल्यामुळे महसुल विषयक कामांसाठी तालुक्यातील नागरिकांना धर्माबादला हेलपाटे मारावे लागत आहे.

उमरी तहसील कार्यालयामध्ये एकमेव नायब तहसीलदार आहेत. येथील तहसीलदारांची पूर्णा येथे बदली झाली. येथे नायब तहसीलदार असताना त्यांच्याकडे चार्ज न देता धर्माबाद येथील तहसीलदारांकडे येथील तहसीलदार चार्ज देण्यात आला. उमरीत नवीन तहसीलदारांची नियुक्ती झाली नाही.

## अर्धवेळ ग्रंथपालांचे लवकरच पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन

**मुंबई** : राज्य शासनाने अर्धवेळ पदावरील ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन (रूपांतरण) करण्याचा निर्णय घेतला असून याचा लाभ १२७६ अर्धवेळ ग्रंथपालांना होईल, अश माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली. त्यांच्या या निर्णयामुळे आता या अर्धवेळ ग्रंथपालांना फार मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी शासनाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे आता महाराष्ट्र राज्यातील सर्व अर्धवेळ ग्रंथपालांची अनेक वर्षापासूनची मागणी पूर्ण झाली असल्याचे ते म्हणाले. राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन करण्याची बाब अनेक वर्षापासून प्रलंबित होती. नवीन आकृतीबंधानुसार आता यापुढील काळात अर्धवेळ स्वरुपाचे ग्रंथपाल पद हे कार्यरत कर्मचाऱ्यांचे सेवा ज्येष्ठतेनुससार आता पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे, त्यानुसार लवकरच कार्यवाही व्हावी, असे आवाहन रविंद्र प्र.सुरवसे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई शहर यांनी केले आहे.

## माच्छिंद्र सुकटे आता सिंधुदुर्ग उपजिल्हाधिकारी

**सिंधुदुर्गनगरी** : गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त असलेल्या सिंधुदुर्गच्या उपजिल्हाधिकारी या पदाचा बीड जिल्ह्यातून बदली झालेले मच्छिंद्र सुकटे तात्काळ सिंधुदुर्गात दाखल होत त्यांनी कार्यभार स्वीकारला व तातडीने प्रशासकीय कारभारालाही सुरुवात केली आहे.

त्यापूर्वीही त्यांनी सिंधुदुर्गात काम केल्याचा त्यांना अनुभव आहे. दत्तात्रय भडकवाड यांची पदोन्नतीने बदली झाल्यापासून सिंधुदुर्ग निवासी उपजिल्हाधिकारी हे पद अनेक महिन्यांपासून रिक्त आहे. कधी उपजिल्हानिवडणूक अधिकारी, कधी रोजगार हमी योजनेचे अधिकारी तर कधी भूसंपादन अधिकारी म्हणून यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला होता.

## दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नती आरक्षण केंद्राच्या धर्तीवर लागू

**मुंबई :** राज्यात केंद्राप्रमाणे दिव्यांग पदोन्नती आरक्षण लागू करण्याचा त्याचप्रमाणे दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी ४ टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

केंद्र शासनाच्या १७ मे २०२२च्या आदेशाप्रमाणे राज्यात दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट ड ते गट अ च्या निम्नस्तरापर्यंत पदोन्नती आरक्षण लागू करण्यात येईल. दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट ड मधून गट ड मधील, गट ड मधून गट क मधील, गट क मधून गट क मधील, गट क मधून गट ब मधील, गट ब मधून गट ब मधील तसेच गट ब मधून गट अ मधील निम्नस्तरापर्यंत चार टक्के आरक्षण देण्यात येईल. रिक्त पद असलेल्या चार टक्के पदे दिव्यांगांसाठी आरक्षित ठेवण्यात येतील.

अपंगत्वाच्या वेगवेगळ्या प्रकारनिहाय एकूण आरक्षण चार टक्के राहील. ज्या संवर्गात सरळ सेवेने नियुक्तीचे प्रमाण ७५ टक्क्यांपेक्षा नसेल अशाच संवर्गात दिव्यांगांना पदोन्नतीत आरक्षण राहील. या संदर्भातील अन्य सर्व शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत. या निर्णयाची लवकरच अंमलबजावणी करण्याबाबत प्रक्रिया सुरु झाली आहे.

शासनाच्या या निर्णयाचा लाभ महाराष्ट्रातील दिव्यांग कर्मचाऱ्यांना होणार आहे. त्याचबरोबर केंद्र शासनानुसार राज्यातही हे आरक्षण लागू व्हावे, अशी त्यांची मागणीदेखील सातत्याने होत होती. आता या निर्णयामुळे त्यांना फार मोठा दिलासा मिळाला आहे.

## नोकऱ्यांचा नाही पत्ता; मात्र नफा ६ कोटींचा

**यवतमाळ :** शिक्षक भरतीसाठी राज्यातील सव्वादोन लाख विद्यार्थ्यांची 'टेट' परीक्षा घेण्यात आली. मात्र, महिना उलटून गेल्यावरही पवित्र पोर्टल किंवा नियुक्तीच्या हालचाली नाहीत. दुसरीकडे या बेरोजगारांच्या माध्यमातून परीक्षा परिषदेला तब्बल सहा कोटी दोन लाख रुपयांचा घसघशीत नफा झाला आहे. परिषदेनेच जाहीर केलेल्या ताळेबंदातून ही आकडेवारी पुढे आली आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही स्वायत्त संस्था विविध परीक्षांचे आयोजन व निकाल जाहीर करते. २०१७ पासून प्रलंबित शिक्षक भरतीची अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टेट) परीक्षा झाली. महाराष्ट्रातील डीएड, बीएडधारक बेरोजगारांनी दोन लाख ३९ हजार अर्ज दाखल केले होते.

## महाराष्ट्र राज्य चतुर्थश्रेणी कर्मचारी महासंघातर्फे डॉ. आंबेडकर यांची १३२ वी जयंती साजरी



**मुंबई (बांद्रा) :** शासकीय वसाहतीत परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकांचे प्रदर्शनाचे उद्घाटन व बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापण्यात आला.

महाराष्ट्र राज्य चतुर्थश्रेणी कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आली. संघटनेचे कार्याध्यक्ष बाबा कदम, महाराष्ट्र मंत्रालय को-ऑप सोसायटीचे अध्यक्ष रमेश लव्हांडे, खजिनदार सुधीर कोळवनकर, पालक संचालक राजेंद्र चव्हाण, संचालक सतीश जाधव आणि मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग व आमदार कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष विश्वास रणदिवे व सचिव नंदकुमार साने आणि कर्मचारीवर्ग व सभासद उपस्थित होते.

## प्रकल्पग्रस्त कर्मचारी आता कायमस्वरूपी

**नवी मुंबई :** काही वर्षांपूर्वी बारवी धरणग्रस्तांना विशेष बाब म्हणून विविध महानगर पालिकेत अनेकांना थेट कायम सेवेत घेण्यात आले. सिडको क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांनादेखील अशाच पद्धतीने नोकरीत समावेश करून घ्यावा, अशी मागणी जोर धरत होती. त्यामुळे ही मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी लावून धरत प्रकल्पग्रस्तांची लक्षवेधी मांडत प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याची मागणी केली होती. या मागणीला यश आले असून प्रकल्पग्रस्तांना नोकरी देताना ५ टक्के आरक्षण व भूकंपग्रस्त पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास २ टक्के पदे प्रकल्पग्रस्तांसाठी वापरण्यात यावी अशी तरतूद करण्यात आली आहे. कंत्राटी असलेल्या प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी नोकरी मिळावी ही मागणी सतत होत होती.

## राजपत्रित अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना एक दिवसाचे वेतन

**मुंबई :** अवकाळी पाऊस व गारपीटग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीकरिता 'मुख्यमंत्री सहायता निधी'मध्ये राजपत्रित अधिकाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन दिले आहे.

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, हा राजपत्रित अधिकाऱ्यांच्या ७० खातेनिहाय संघटनांची शिखर संघटना आहे. राज्यसेवेतील सुमारे १.५ लाख अधिकाऱ्यांचे समान प्रश्न, शासन-प्रशासनाशी चर्चा विनिमयातून, सौहार्दाच्या वातावरणात सोडविण्याचे अधिकारी महासंघाचे नेहमीच धोरण राहिले आहे. राज्य शासनाच्या महत्वपूर्ण योजना व निर्णय तळागाळापर्यंत पोहचवून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व अधिकारी कटीबध्द आहेत. शासकीय कामकाज करताना येणाऱ्या अडचणी व अधिकाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या मागण्यांचा सोडवणूकीकरीता आग्रही राहतानाच, राज्यावर उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी अधिकारी महासंघ नेहमीच राज्य शासनाच्या पाठिशी कर्तव्यभावनेने उभा राहिलेला आहे.

विद्यमान आपदग्रस्त स्थितीत शेतकरी व सामान्य जनतेच्या पाठिशी सर्व अधिकारी ठामपणे उभे असून, राजपत्रित अधिकाऱ्यांच्या माहे एप्रिल, २०२३ च्या वेतनातील एक दिवसाचे वेतन 'मुख्यमंत्री सहायता निधी' मध्ये जमा करण्यात येईल, असा निर्णय महासंघाने कर्तव्यभावनेने घेतला आहे, असे निवेदन महासंघाच्या वतीने ग. दि. कुलथे, विनोद देसाई, नितीन काळे आणि समीर भाटकर यांनी दिले आहे.

## प्रशासकीय पदातून लोकसेवा घडावी : अनिल तांबे

**ओतूर :** प्रशासकीय पदाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी लोकसेवा करावी आणि सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून त्याच्या कल्याणाकरिता अहोरात्र काम करावे, असे प्रतिपादन ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष अनिल तांबे यांनी सत्कार प्रसंगी केले.

ग्रामविकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयाची माजी विद्यार्थिनी कुमारी श्रध्दा किरण डुंबरे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत झालेल्या परीक्षेत तालुका कृषी अधिकारी पदाची परीक्षा ४१ व्या क्रमांकासह उत्तीर्ण केल्याबद्दल तिचा नुकताच संस्थेच्या व शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी तांबे बोलत होते.

प्रशासकीय पद हे अत्यंत महत्वाचे तसेच मानाचे आहे. त्यामुळे त्याचे फार मोठे दायित्व आपल्यावर असते. समाजाला आपल्याकडून खूप अपेक्षा असतात. त्यांच्यामुळेच आपण त्या पदावर असतो, हे ध्यानात ठेवून कार्य केले पाहिजे, प्रत्येक पातळ्यांवर आपल्याला आव्हाने असतात, त्यामुळे तशी मानसिकता ठेवूनच आपण त्याला सामोरे गेले पाहिजे. प्रत्येक समस्या सोडवून तळागाळापर्यंत आपले कार्य पोहचले पाहिजे. लोकांकडून त्या कामाचे समाधान व्यक्त झाले पाहिजे, असा निर्धार आपण मनात ठेवावा, असेही ते म्हणाले.

श्रध्दा किरण डुंबरे ही चैतन्य विद्यालयाची माजी विद्यार्थिनी असून, तिला दहावीला ९३ टक्के गुण मिळाले. बारावी विज्ञान शाखेत ती प्रथम आली. पुढे तिने राहुरी विद्यापीठातून एमएससी अँग्री केले आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला सामोरे जाऊन घवघवीत यश मिळविले.

याप्रसंगी ग्रामविकास मंडळाचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, कोळमाथा सोसायटीचे चेअरमन प्रकाश डुंबरे उपमुख्याध्यापक प्रतीक अकोलकर, संस्थेचे खजिनदार रघुनाथ तांबे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन भाऊसाहेब खाडे यांनी केले. मिलिंद खेत्री यांनी आभार मानले.

## दुपारी १२ ते ५ दरम्यान खुल्या कार्यक्रमांना बंदी

**मुंबई :** भरदुपारी झालेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात घडलेल्या दुर्घटनेमुळे दुपारच्या वेळी खुल्या जागेत कोणतेही कार्यक्रम घेतले जाऊ नयेत, असे निर्देश राज्य सरकारने काढले आहेत. जोपर्यंत राज्यात उन्हाची स्थिती आहे, तोपर्यंत दुपारच्या वेळी असे कार्यक्रम घेतले जाऊ नयेत, असे राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आले आहे. खारघरची घटना अतिशय दुर्दैवी आहे. या घटनेची कल्पनाही कुणी केली नव्हती, त्या दिवशी जे काही झाले, त्याची पुनरावृत्ती कुठेही होऊ नये, कुणाला त्रास होऊ नये म्हणून सरकारने निर्णय घेतला आहे.

### नवीन पेन्शन योजनेतही देणार ग्रॅच्युईटी

## सेवेत असताना मृत्यू झाल्यास कुटुंबाला लाभ

**मुंबई :** राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी मध्यंतरी केलेल्या संपानंतर आता सरकारने निवृत्तिवेतनासंदर्भात काही सकारात्मक निर्णय घेतले आहेत. २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांनादेखील आता ग्रॅच्युईटीची (सेवा उपदान) रक्कम दिली जाणार आहे. वित्त विभागाने यासंबंधीचा आदेश काढला आहे.

जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागू करण्यासंदर्भात राज्य कर्मचाऱ्यांनी (गट क व गट ड) मध्यंतरी सात दिवसांचा संप केला होता. जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात तीन सेवानिवृत्त सनदी अधिकाऱ्यांची समिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नियुक्त केली आणि सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर संप मागे घेण्यात आला होता. आता जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला नसला तरी कर्मचाऱ्यांना दिलासा देणारे निर्णय घेतले आहेत.

२००५ नंतर निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना आतापर्यंत ग्रॅच्युईटी दिली जात नव्हती. आता कर्मचाऱ्यांचे सेवेत असताना निधन झाले तर त्यांच्या कुटुंबीयांना तसेच कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याला स्वत:ला ग्रॅच्युईटी मिळणार आहे. कर्मचाऱ्याचे सेवेत असताना निधन झाले तर त्याच्या कुटुंबीयांना आधी काहीही रक्कम दिली जात नव्हती. कर्मचारी संघटनांच्या दबावानंतर १० लाख रुपये देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. मात्र, ही रक्कम अपुरी असल्याचे कर्मचारी संघटनांचे म्हणणे होते. केंद्र सरकारने नवीन पेन्शन योजना लागू करताना कर्मचाऱ्यांचे सेवेदरम्यान निधन झाल्यास कुटुंबाला जुन्या पेन्शननुसार निवृत्तीवेतन देण्याचा निर्णय घेतलेला आहे. तोच निर्णय राज्य शासनानेही घ्यावा, अशी संघटनांची मागणी होती. आता ती मान्य करण्यात आली आहे.

## पॅरामेडिकल टेक्नॉलॉजीच्या आंतरवासितांना विद्यावेतन

**मुंबई :** राज्यातील बी.एससी. पॅरामेडिकल टेक्नॉलॉजीच्या आंतरवासिता विद्यार्थ्यांना आता दरमहा आठ हजार रुपये विद्यावेतन मिळणार आहे. याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या निर्णयाचा लाभ ५११ आंतरवासितांना होईल.

महानगरपालिकेंतर्गत वैद्यकीय महाविद्यालयांतील बी.एससी. (पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी) या अभ्यासक्रमांच्या आंतरवासिता विद्यार्थ्यांना दरमाह आठ हजार रुपये इतके विद्यावेतन त्या-त्या महानगरपालिकांमार्फत देण्यास मान्यता देण्यात आली.

## अभिनव जत्रा उपक्रम यशस्वी करण्याचे शासकीय कर्मचाऱ्यांना निर्देश

**मुंबई :** आता प्रत्येक जिल्ह्यातून किमान ७५ हजार लाभार्थ्यांना विविध योजनांचा थेट लाभ देणारी शासकीय योजनांची एक अभिनव जत्रा संपूर्ण राज्यातून एकंदर २७ लाख लाभार्थींना थेट लाभ देण्यासाठी सुरु करण्यात आली असून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासनाने उत्तम नियोजन करावे, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या आहेत.

'जत्रा शासकीय योजनांची, सर्व सामान्यांच्या विकासाची' असे हे अभियान असून त्याचे समन्वय मुख्यमंत्री सचिवालयाच्या जनकल्याण कक्षामार्फत करण्यात येणार आहे. अभियानाच्या अंमलबजावणीस जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर जनकल्याण कक्ष देखील स्थापन करण्यात येणार आहे. जनकल्याणाच्या अनेक योजना घोषित करण्यात येतात. मात्र यासाठी नागरिकांना शासकीय कार्यालयामध्ये येणे, योजनांची माहिती घेणे, आवश्यक दस्तऐवज विविध कार्यालयात जाऊन जमा करणे, कागदपत्र पुन्हा सादर करण्यासाठी कार्यालयाकडे येणे अशा विविध प्रक्रियेतून जावे लागते. दस्तऐवज उपलब्ध करून देणारी ही कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना वेगवेगळ्या कार्यालयात जावे लागते. कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास त्या दूर करण्यासाठी वारंवार त्या कार्यालयामध्ये जावे लागते. कित्येक वेळा अनेक लोकांना त्यांना शासनाकडून देय असलेल्या योजनांची माहिती नसते आणि माहितीअभावी या योजनांचा लाभ गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे या योजनांचा उद्देश पूर्ण होत नाही. या उपक्रमात एकाच ठिकाणी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ कमीत कमी कालावधीत देण्यात आला आहे.

या अभियानात नागरिकांना शासकीय योजनांशी निगडीत कार्यालयांचे प्रतिनिधी व विविध दस्तऐवज उपलब्ध करून देणारे अधिकारी व कर्मचारी एका छताखाली एकत्र येऊन विविध योजनांचे लाभ देतील. जिल्हाधिकारी हे अभियानाचे जिल्हा प्रमुख असतील व इतर सर्व विभाग हे त्यांच्या समन्वयाने काम करतील. नागरिकांना विविध विभागांच्या योजनांची माहिती पोहचविणे, प्रस्तावित लाभार्थ्यांची यादी तयार करणे तसेच त्यांच्याकडून अर्ज भरून घेण्यात येतील. प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान ७५ हजार लाभार्थ्यांना लाभ देण्याचे उद्दिष्ट असेल. लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी जिल्हास्तरावर / तालुकास्तरावर दोन दिवसांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. केंद्र व राज्यशासनाच्या योजनांचा आढावा घेऊन या उपक्रमांतर्गत राबवावयाच्या योजनांचे उद्दिष्ट ठरविण्यात येईल. अभियान अंमलबजावणीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घेतले जाईल. पालिकांकडून राबविल्या जाणाऱ्या योजनांबाबत संबंधित विभागीय आयुक्त व महानगरपालिका आयुक्त वेळोवेळी मार्गदर्शन करतील. या अभियानाच्या आयोजनासाठी निधी उपलब्धतेबाबतही शासन निर्णयात तपशीलवार माहिती देण्यात आली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी मंत्रालयस्तर ते तालुकास्तर व विविध यंत्रणांसाठी कार्यपद्धतीही एसओपी निर्धारित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने विविध स्तरावरील जबाबदाऱ्यांचे वाटपही करण्यात आले आहे. योजनेची माहिती पोहचवून, अर्ज भरून घेणे ते लाभार्थ्यांची निवड, प्रत्यक्ष लाभ इथपर्यंत कार्यप्रणाली निश्चित केली गेली आहे. या अभियानाचा अहवाल जिल्हा जनकल्याण कक्षांना मुख्यमंत्री सचिवालयातील जनकल्याण कक्षास सादर करावा लागणार आहे.

## मंत्रालय सचिव भासवून दिले नियुक्तीचे पत्र

**मुंबई :** मंत्रालयात नोकरीचे आमिष दाखवून फसवणुकीचे सत्र सुरूच असून, मंत्रालयात सचिव असल्याचे सांगून लिपिक, तसेच चालकपदी नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका तरुणीसह तीन जणांची १६ लाख रुपयांना फसवणूक करण्यात आल्याची घटना समोर आली आहे.

आरोपीने विश्वास संपादन करण्यासाठी थेट बनावट नियुक्तीच्या पत्रासह त्यांना व्हिजिटिंग कार्डही दिले आहेत. श्याम विठोबा खतकर आणि विशाल नारायण गोनभरे अशी आरोपींची नावे असून त्यांच्याविरुद्ध दादर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दादर परिसरात राहणारी सुप्रिया खापरे (३०) एका खाजगी कंपनीत नोकरीला आहे. तिने दिलेल्या तक्रारीनुसार दादर पोलिसांकडून गुन्हा नोंदविला आहे.

## महत्वाचे शासन निर्णय (जीआर)


**www.maharashtra.gov.in**

| विभाग व दिनांक | तपशील |
|---|---|
| **इतर मागास बहुजन कल्याण विभाग** १३-०३-२०२३ | कोवीड-१९ (कोरोना) च्या पार्श्वभूमीवर विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी उमेदवाराचे नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राबाबत. |
| **पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग** २३-०३-२०२३ | महाराष्ट्र भूषण पुरस्कार रकमेत वाढ करणेबाबत. |
| **सामान्य प्रशासन विभाग** २३-०३-२०२३ | कोवीड-१९ (कोरोना) महामारीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना अर्थिक दृष्या दुर्बेल घटक (EWS) प्रमाणपत्र देणेबाबत. |
| **सामान्य प्रशासन विभाग** २७-०३-२०२३ | ई-ऑफिस कार्यप्रणालीच्या वापरासदर्भांत. |
| **सामान्य प्रशासन विभाग** २८-०३-२०२३ | अभ्यागतांसाठी निश्चित वेळ राखून ठेवण्याबाबत. |
| **महसुल व वन विभाग** ०६-०४-२०२३ | कोतवालांच्या मानधनात वाढ करण्याबाबत. |
| **महिला व बाल विकास विभाग** ०६-०४-२०२३ | अनाथ आरक्षण धोरणामध्ये बदल करणेबाबत. |

## पतसंस्थांतील ठेवींना आता मिळेल संरक्षण

**मुंबई :** सहकारी पतसंस्था-मधील गुंतवणूकदार तसेच खातेदार यांच्या ठेवींना संरक्षण देण्यासाठी सहकार आयुक्ताने मसुदा तयार केला आहे. सहकार मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत त्याचे सादरीकरण लवकरच मंत्रालयात करण्यात येणार आहे. केरळमधील पंतसंस्थांना २ लाखांपर्यंतच्या ठेवींना संरक्षण दिले आहे. त्या धर्तीवरच हा कायदा करण्यात येणार आहे, अशी माहिती सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी दिली आहे. राज्यातील दहा हजार पतसंस्थांचा याबाबत अभ्यास करण्यात आला असून त्यांची माहिती संकलित केली गेली आहे.

## रमेश पिंपळशेंडे यांचे दीर्घ आजाराने निधन



**मुंबई :** राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना जिल्हा शाखा सरचिटणीस तसेच चंद्रपूर शासकीय कर्मचारी भवन उभारण्याच्या कार्यात महत्वाचे योगदान देणारे, महाराष्ट्र माजी उपाध्यक्ष (नागपूर विभाग), विक्रीकर संघटनेचे माजी पदाधिकारी आणि सेवानिवृत्त विक्रीकर अधिकारी ॲड. रमेशभाऊ पिंपळशेंडे यांची मुंबईत दीर्घ आजाराने नुकतेच निधन झाले.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनात्मक चळवळीतील मार्गदर्शक, लढाऊ व्यक्तिमत्व, स्पष्टवक्ता, संघटनाप्रेमी, धडाडीचे नेतृत्व अशी त्यांची ख्याती होती.



कृष्णा बाबाजी भरडे यांच्या ६१व्या वाढदिवसानिमित्त राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे राज्य अध्यक्ष भाऊसाहेब पठाण, उपाध्यक्ष सुरेश आहेरकर, बाळा सावर्डेकर, बाबाराम कदम, पराग आडीवरेकर, मनोहर दिवेकर, नंदकुमार साने, रजनीश कांबळे, सुरेश चिकणे, भरत पितळे तसेच कर्मचारी टाईम्सचे कार्यकारी संपादक अशोक शिंदे, छाया करे, रिद्धी कुबल, आणि गुरुदत्त वाकदेकर यांनी मनपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## रोजगार हमी योजनेशी संबंधित राजपत्रित अधिकाऱ्यांचे निवेदन

**पालघर :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी संबंधित कामांबाबत राजपत्रित अधिकारी वर्गाने निवेदन केले आहे. त्यानुसार काही महत्वाचे मुद्दे त्यांनी प्रशासनापुढे मांडले आहेत.

मंत्री महोदय व अपर मुख्य सचिव महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, यांच्या समवेत औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने मविसे राजपत्रित अधिकाऱ्यांचे क्षेत्रीय स्तरावर काम करताना येणाऱ्या अडचणी बाबत हे निवेदन देण्यात आले. यामध्ये १) मजुरांच्या उपस्थितीबाबत गट विकास अधिकारी हे जबाबदार राहणार नाहीत, याबाबत शासन निर्णय निर्गमित करणे. २) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने बाबतीत ग्रामपंचायत स्तरावरील यंत्रांची जबाबदारी निश्चित करणे. ३) मंजूर कामांच्या बाबतीत व ६०:४० चे प्रमाण राखण्याबाबत गट विकास अधिकारी जबाबदार राहणार नसल्याबाबत शासन निर्णय निर्गमित करणे. ४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने बाबतीत, बैठकी दरम्यान उपस्थित करण्यात आलेले इतर मुद्दे निवेदनात नमूद करण्यात आलेले आहेत.

## देशात पहिले डिजिटल न्यायालय नवी मुंबईत

**नवी मुंबई :** बेलापूर न्यायालयात दिवाणी (वरिष्ठ) व सत्र न्यायालयाच्या कामकाजाला मंजूरी मिळाली असून या दोन्ही न्यायालयांचे कामकाज पूर्णपणे डिजिटल चालणार आहे. देशात अशाप्रकारचा उपक्रम पहिल्यांदाच नवी मुंबई येथून सुरु होत आहे. त्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गौतम पटेल यांनी आनंद व्यक्त केला आहे.

दरम्यान, या उपक्रमामुळे कर्मचारी वर्गावरदेखील पडणारा अतिरिक्त भार कमी होण्यास मदत होईल. त्यांच्याकडूनही या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले असून राज्यात अन्यत्रदेखील तशी मागणी होत आहे.

## नायब तहसिलदारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक

**मुंबई :** राज्यातील महसूल विभागातील नायब तहसिलदार (राजपत्रित वर्ग २) यांचे ग्रेड पे वाढविण्याबाबत शासन सकारात्मक आहे. त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू असून, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून निर्णय घेणार असल्याची माहिती महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी या विषयावर बोलताना दिली.

मंत्रालयात नायब तहसिलदार राजपत्रित वर्ग -२ यांचे ग्रेड पे बाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री श्री. विखे पाटील बोलत होते. बैठकीस विभागाचे अपर मुख्य सचिव नितिन करीर आणि महाराष्ट्र राज्य तहसिलदार व नायब तहसिलदार संघटनेचे कार्याध्यक्ष सुरेश बगळे यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

मंत्री विखे-पाटील म्हणाले, नायब तहसिलदार यांची प्रशासनाबाबत भूमिका सकारात्मक असून, कामेही पूर्ण आहेत. त्यांच्या कामाचा पूर्वेतिहास पाहता शासन त्यांच्या मागणीबाबत नैसर्गिक न्याय तत्वाचा अवलंब करीत आहे. त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी यापूर्वीच कार्यवाही सुरू केली असून, लवकरच याबाबत निर्णय होईल, असेही मंत्री श्री. विखे-पाटील यांनी यावेळी आश्वासित केले.


## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...



सुरेश राजाराम चिकणे
२८-०५-१९८५



कु. कार्तिक सुरेश चिकणे
२९-०५-२०१८



अक्षय शंकर करे
०४-०५-२००३

तुम्हाला लाभो उदंड आयुष्य, हीच मनात सदैव इच्छा
तुमच्या स्वप्नांना येऊ दे बहर, जन्मदिनी ह्याच शुभेच्छा !!!

-: शुभेच्छुक :-
कर्मचारी टाईम्स परिवार

## संपादकीय

### तर कामगार संघटनांना भवितव्य नसेल...

जागतिक कामगार दिनाच्या निमित्ताने आजच्या काळातील कामगार अथवा कर्मचारी वर्गाच्या वर्तमान परिस्थितीविषयी आपण विचार करणे गरजेचे आहे. कोणतीही चळवळ ही एका आर्थिक- सामाजिक- राजकीय परिस्थितीला समाजाने दिलेला प्रतिसाद असतो. गेटसभा- बंद-संप-मोर्चे लाठीमार-गोळीबार-दीर्घ तुरुंगवास-कलापथके- अभ्यासवर्ग हे त्या अनुषंगाने आलेच. मागील काही दशकांतील या परिस्थितींना कामगारांनी अनुभवले आहेच. पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस रशियात कामगार वर्गाच्या सत्तेसाठी क्रांती झाली होती. दोन महायुद्धांच्या दरम्यान सर्व युरोपात भांडवलशाहीला भीषण आर्थिक मंदीने ग्रासले होते. याचवेळी कम्युनिस्ट- समाजवादी- गांधीवादी ध्येयवादाने प्रेरित होऊन मध्यमवर्गातील शेकडो तरुणांनी कामगार चळवळीमध्ये किंवा सामाजिक चळवळीत आपली आयुष्ये वाहून टाकली. १९२६ पासून ते १९५० पर्यंत याच प्रक्रियेत घडलेल्या नेतृत्वाखाली मुंबईतील तसेच देशातील कामगार चळवळ होती. या काळाचा विचार केल्याशिवाय आजची कामगार चळवळ समजणे अशक्यच आहे. त्यासाठी खालील प्रक्रिया महत्त्वाच्या आहेत. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतरदेखील शासकीय कर्मचारी वर्गाची चळवळ आपल्या न्याय्य हक्कांविषयी सुरु झाली. शासकीय कर्मचारी वर्गाच्या चळवळीत स्व. र. ग. कर्णिक यांचे मोलाचे योगदान आहे. त्यामुळेच आज शासकीय कर्मचारी सुस्थितीत आहे. पण आज भोवतालची परिस्थिती पाहिली तर कामगार चळवळीची कोंडी होऊ लागलेली आहे. आज मोठ्या प्रमाणावर बाह्यस्त्रोताद्वारे करण्यात येणारी भरती तसेच कंत्राटी पद्धती कर्मचारी वर्गाची नियुक्ती करण्याची पद्धत सर्रासपणे अवलंबिली जात आहे. त्यामुळे येत्या काळात शासकीय अथवा खासगी संस्थांमध्ये कामगार चळवळी संपुष्टात येतील, अशी शक्यता आहे. याबाबत आपण अधिक गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. कर्मचारी वर्गाच्या मागण्या प्रलंबित राहिल्या आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी चालढकल करण्यात येत आहे. याचाच अर्थ हे प्रश्न सोडविण्याची मानसिकता राहिलेली नाही, त्यामुळे आता सध्या कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची ही अखेरची पिढी ठरेल की काय, अशीही भीती कामगार वर्गात निर्माण झाली आहे. पण हे केवळ परिस्थितीने नाही, तर कामगारांचा विचार, त्या त्या उद्योगाच्या पातळीवर, एक वर्ग म्हणून करण्याच्या मूळ दृष्टिकोनाला तिलांजली दिल्यामुळेच झालेली आहे. कामगार चळवळींचे यश अनेक मर्यादांनी ग्रस्त होते. हेही आपण विचारात घेतले पाहिजे. आपणदेखील आत्मपरीक्षण केले पाहिजे. कामगार चळवळ प्रभावी आणि आक्रमक होत आहे, असे दिसू लागले, तसे १९८० नंतर व्यवस्थापनांनी कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन कारखान्यांत हजारो हंगामी कामगार-कंत्राटी कामगार नेमण्यास सुरुवात केली. एकाच ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांमध्ये सरळसरळ दोन स्तर निर्माण झाले. एक संरक्षित-संघटित कायम कामगारांचा, तर दुसरा असंरक्षित हंगामी कामगारांचा. या असंरक्षित कामगारांची तसेच त्या त्या मोठ्या कारखान्यांच्या पुरवठादार हजारो छोट्या उद्योगांतील कामगारांचे वेतन मात्र त्या तुलनेत निम्म्यावर राहिले. कामगार आणि कर्मचारी वर्गाच्या अनेक समस्या त्यातून निर्माण झाल्या आहेत. परिस्थितीत बदल होत गेला तसे कामगारांच्या समस्यांमध्येही वैविध्य आले. प्रत्येक पातळ्यांवर करावा लागणारा संघर्ष काही बदलला नाही. एकंदरीत कामगार आणि कर्मचारी वर्गाच्या चळवळीचे स्वरुप बदलले गेले. जागतिक कामगार दिन १ मे रोजी साजरा होत असताना या सर्वांचा प्रत्यय आपल्या दरवर्षी वेगवेगळ्या पद्धतीने अनुभवण्यास मिळतो तसेच त्याची उजळणीदेखील होताना दिसून येते. आपण यापूर्वीच्या कामगार चळवळींचा इतिहास पाहिला तर पूर्वीची कामगार वर्गाची चळवळ एकेका कारखान्यातील कामगारांची संघटना झाली. शासकीय तसेच निमशासकीय आस्थापनांमध्येदेखील अशाप्रकारे परिस्थिती निर्माण झाली. शासकीय आस्थापनांचा प्रामुख्याने विचार केला तर इथे कारखानदार नव्हे तर सत्ताधारी किंवा प्रशासकीय यंत्रणा त्यानुसार विचार करू लागली आहे. सरकारी उद्योगांचे खाजगीकरणदेखील मोठ्या प्रमाणावर होत आहे. कंत्राटी कामगार-असंरक्षित कामगार हिच आज प्रत्येक क्षेत्रात कामगारांची ओळख आहे. कायम कामगार हा नियम नसून अपवाद झाला आहे. कंत्राटी कामगार-हंगामी कामगार- छोट्या कारखान्यातील कामगार असे पूर्ण विभाजन संघटनांच्या मागण्यांच्या लढ्यांच्या पातळीवर होत आहे. त्यातून बाहेर पडल्याशिवाय आजच्या संरक्षित कामगारांच्या मर्यादित चळवळीला भवितव्य राहणार नाही. केवळ वेतन वाढवून घेण्यासाठी संघटना असे स्वरूप न ठेवता, त्यांच्या क्षेत्राचा सामाजिक, आर्थिक संदर्भ, त्याचे एकूण अर्थशास्त्र, त्यांच्या कामातून निर्माण होणारे कर्मचाऱ्यांचे सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक प्रश्न, त्याची सोडवणूक करण्यासाठी पर्यायी रचना-प्रयोग या आधारावर त्यांची संघटना निर्माण करावी लागेल. सध्या कामगार चळवळ ज्या सभासदांच्या जोरावर उभी आहे, त्या कायम कामगारांचे सध्याचे सरासरी वय लक्षात घेता, त्यांची संख्या येत्या काही वर्षांत झपाट्ययाने कमी होईल, याची शक्यता नाकारता येत नाही. नंतरच्या काळात कायम कामगारांच्या छोट्या गटापुरत्या मर्यादित असणाऱ्या कामगार संघटनांना काहीही भवितव्य राहणार नाही. शासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. जुन्या पेन्शन योजनेच्या बाबतीत नुकत्याच झालेल्या राज्यव्यापी आंदोलनाच्या निमित्ताने सर्वसामान्य जनतेला या प्रश्नांची माहिती मिळाली. पेन्शनचा प्रश्न हा महत्वाचा आहेच परंतु इतरही अनेक मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून त्यांची सोडवणूक झालेली नाही. त्यामुळे कर्मचारी वर्ग अस्वस्थ आहे. त्याची जाणीव यानिमित्ताने झाली. येणाऱ्या काळात शासन सरळसेवा पद्धतीने भरती करणे टाळणार आहे. त्यामुळे संघर्ष तर आहेच परंतु बदलत्या परिस्थितीची आव्हानेदेखील संघटनांसमोर आहेत. ही आव्हाने वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या पद्धतीने समोर येत असतात. त्यामुळे सत्ताधारी, संघटना आणि कर्मचारी यांनी परस्परांविषयी अनुकूलता दर्शवून मार्ग काढण्याची मानसिकता आणि भूमिका ठेवणेच इष्ट राहणार आहे, हेही तितकेच गरजेचे आहे.

# हुतात्मा स्मारकाचं महात्म्य...

दोन मराठी माणसं वर्षानुवर्षे एकत्र रहाण्याचं एकमेव ठिकाण म्हणजे हुतात्मा स्मारक होय. मराठी माणसाचं असं एकत्र येणं राहणं आत संपलयं...

या इथल्या मराठी माणसाला मधासारखं गोड परिणाम हवे असतील तर, मधमाश्यांसारखं एकत्र रहायला हवं.

एकेकाळी हाच इथला सर्वसामान्य कामगार शेतकरी एकत्र येऊन गरजला होता, अगदी प्राणपणाने गरजला होता. संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे आणि तो महाराष्ट्र झालाही. या महाराष्ट्राला दैदिप्यमान इतिहासासोबत वैभवशाली असा भूभाग जो दऱ्याखोऱ्यांनी, पर्वतगिरी शिखरांनी, मोठमोठ्या नद्यांनी, वृक्षराजींच्या वनांनी समृध्द आहे. हाच समृध्द भूभाग महाराष्ट्राला लाभला आहे आणि याच समृध्द भौगोलिकतेचा पुरेपूर उपयोग करून या मातीत जन्मलेल्या शिवाजी महाराजांनी देखणं स्वराज्य उभं करून, इथल्या मातीतल्या मावळ्याला ताठ मानेनं जगायला शिकवलं. पुढे जाऊन याच मावळ्याने अगदी अटकेपार झेंडा लावल्याचा इतिहास या महाराष्ट्राचा आहे.

आज महाराष्ट्र दिन साजरा होतोय, तो झालाचं पाहिजे, तो इथल्या मातीचा ज्वलंत हुंकार आहेच. शैक्षणिक, सामाजिक, कृषी, सहकार अशा सर्वच आघाड्यांवर महाराष्ट्राने आज विशेष प्रगती केली असली तरी आज महाराष्ट्रात मराठी माणूस दीन आहे, हा दुखरा कोपरा अस्वस्थ करणारा आहे.

मराठी शाळा बंद पडत चालल्या आहेत, नव्हे बंद झाल्याच आहेत. इथल्या शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची व्हायला हवी, पण ती पर्यायी भाषा झाल्याचे दिसत आहे. हुतात्मा स्माराकासारखी जीवंत स्मारकं आपल्या हुतात्म्यांनी केलेल्या निस्सिम त्यागाची सदैव आठवण करून देत आहेत. आपल्याला महाराष्ट्र कोणी आंदण दिलेला नाही, तर तो आपल्या कामगार, शेतकरी या सर्व कष्टकऱ्यांनी लढून प्रसंगी रक्ताचा सडा पाडून हा ताठ कण्याचा दिलदार बाण्याचा महाराष्ट्र मिळवलेला आहे.

लढून, मरून आणि शौर्य करून मिळवलेला हा महाराष्ट्र आणि या महाराष्ट्राची प्राचीन गौरवशाली परंपरा इतिहासकारांच्या मते ही प्राचीनता इसवी सन पूर्व ६०० पर्यंत मागे जाते. विदर्भ, अश्मक, कुंतल, अपरांत, बोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र अशा विभिन्न घटक विभागात महाराष्ट्र संस्कृतीची जोपासना होत होती.

जसं महाराष्ट्राला प्राचीन परंपरा आहे तशीच महाराष्ट्र या शब्दात ही एकेकाळी दिल्लीला धडक देण्याची जरब होती. 'दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा।' याच दिल्लीते तख्त राखणाऱ्या महाराष्ट्राचे सातवाहनांच्या शिलालेखात 'महारठी' हे नाव आढळते. या वरूनच या प्रदेशाला महारठ म्हटले जाऊ लागले आणि त्याचे संस्कृत रूप म्हणून पुढे 'महाराष्ट्र' हे नाव प्रचलित झाले. वररुपी, वात्सायन, भरतमुनींच्या ग्रंथात नाव आढळणाऱ्या महाराष्ट्राचे किमान दोन हजार वर्षे महाराष्ट्र हे नाव प्रचलित आहे. इथल्या संतपरंपरेने इथल्या माणसांना, राष्ट्राला, भक्तीचा, भक्तीसाक्षरतेचा मंत्र देऊन भक्तीची निखळ गंगा इथल्या मातीत कायम ठेवली. संत फक्त भक्ती सांगून थांबले नाहीत तर सावतामाळ्याच्या शेतातून ती भक्ती फुलली, जनाईच्या भक्तीतून त्या भक्तीला धुमारे फुटले, गोरावुंभाराच्या मातीत ती रमली, ज्ञानेश्वरांच्या ठायी त्या भक्तीचा गजर झाला, तुकारामांच्या रूपाने त्या भक्तीतला परमेश्वर इथल्या दारोदारी सादर झाला. हातातल्या झाडूने गाडगेमहाराजांनी ती भक्ती प्रत्यक्ष कार्यात उतरवून दाखवली आणि तुकडोजी महाराजांनी ती भक्ती गावगाड्यातून मंथरून दाखवली, अशी किती नाव घेऊ, महाराष्ट्रातल्या



या थोर संतांची, या संतानीच इथलं समाजमन जागृत करून सशक्त विचारांच्या प्रेरणेने स्वराज्य भक्कम पायावर आतून उभं केलं.

आजही पंढरपुरातल्या गोदातिरीच्या वाळवंटी फुलून येणारा भक्तीमळा, हा या महाराष्ट्राच्या मातीत संतपरंपरा ठायीठायी जिवंत असण्याचे लक्षण आहे.

प्रजाहितदक्ष, कलासक्त, सुसंस्कृत असणाऱ्या सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकट, यादव या महत्त्वाच्या घराण्यांनी महाराष्ट्रावर राज्य केले. याच काळात कला, नृत्य, संगीताच्या उत्कर्षाने महाराष्ट्र संस्कृती भरभराटीस आली. त्यानंतर इ.स. १३१८ साली यादवांच्या सत्ता संपुष्टीने परकीयांचे आक्रमण या महाराष्ट्र भूवर झाल्याने इथले लोकजीवन व संस्कृतीवर फार मोठे आघात झाले. निर्माण झालेल्या सामाजिक, राजकिय अस्थिरतेतून समाजमन मुक्त करण्यासाठी इथे संत चळवळ जन्माला आली, आणि या संतपरंपरेच्याही आधी महाराष्ट्राला समृध्द करणारी जाता जाता काहीतरी शिकवणारी, प्रबोधन करणारी लोककला, लोकपरंपरा इथे उभी राहिली. पहाट जागवत येणारा वासुदेव, वाघ्या-मुरळी, भराडी, गोंधळी, कोल्हाटी, फकीर, मानभाव, दरवेशी, पिंगुळा या साऱ्या माणसांनी गावगाडा जागता ठेवला. या माणसांसोबत भारूड, गण-गौळण, पोवाडा, लावणी, कटाव या लोककलांनी इथलं समाजमन ढवळून काढलं. नाटकांनी इथल्या माणसांना खिळवून ठेवलं. दशावतार, गोंधळ, जागरण किर्तनांनी इथल्या लोकधर्माला जागवलं. पोवाड्यांनी इथल्या मातीतून विरश्री फुलवली, तर तमाश्याने मनोरंजन केलं. किर्तनाने इथला समाज सुधारला नाही आणि तमाश्याने बिघडलाही नाही हे वाक्य गंमतीचं असलं तरी ज्या गावाने किर्तन आणि तमाशा पाहिलं नाही, असं महाराष्ट्रात एकही गाव नाही. असा हा महाराष्ट्रीयन माणूस नाटक, संगीत, भजनात, ओतप्रोत रमला, पण त्याचवेळी त्याने आपले समाजभान ढळू न देता ते कायम प्रज्वलित ठेवलं. म्हणून तर 'महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले। महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले।', 'खरा वीर वैरी पराधीनतेचा। महाराष्ट्र आधार हा भारताचा।' या सेनापती बापटांच्या ओळी खऱ्या अर्थाने सार्थ वाटतात.

संकुचित अशी भूमिका महाराष्ट्राने कधीच ठेवली नाही, उलट देशावर जेव्हा जेव्हा संकटे आली तेव्हा तेव्हा हा सह्याद्री धाावून गेल्याची नोंद अनेक ठिकाणी आढळून येते. महाराष्ट्रात जे पेरल जातं ते देशात उगवतं, अगदी स्वच्छता मोहिमांपासून ते रोजगार हमी योजना, सहकारापर्यंत महाराष्ट्राचे अग्रेसर पाऊल पडत आलेले आहे.

'माझी मैना गावाकडं राहिली। माझ्या जिवाची होतीया काहिली।।' म्हणत लोकशाहिर अण्णाभाऊ साठे सारख्या शाहिरांनी शब्दांतून अंगार फुलवला हा अंगार फुलवताना आपण काहीतरी गमावतोय, गमवलयं याची ज्वलंत आठवण करून दिली. महाराष्ट्र ही महान व्यक्तींची जन्मभूमी आहे. महान कृतींची कर्मभूमी आहे, अभंग उक्तीची स्फूर्तीभूमी आहे आणि अलौकिक त्यागाची व सेवेची यज्ञभूमी आहे, हे आचार्य अत्रे याचं विधान किती यथार्थ आहे लक्षात येतं आणि त्याचं यथार्थपण हुतात्मा स्मारकाची आठवण करून देतं.

इग्रंजांच्या काळात भाषावर प्रांतरचना नव्हती. प्रशासन चालवणे सोपे जाईल यादृष्टीने, स्वातंत्र्यानंतर भाषावर प्रांतरचनेचा प्रस्ताव तत्कालीन सरकारने मांडला. त्यातून पुढे बहुभाषिक मुंबई कुणाची हा वाद उभा राहिला. संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, या भीम गर्जनेसह साहित्यिक, सांस्कृतिक, वैचारिक, राजकीय या सर्वच अंगानी ही संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी राहिली. या महाराष्ट्र मातीतला माणूस तनामनाने पेटून या चळवळीत उतरला. नेमकं त्याचवेळी राज्य पुर्नरजना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारले, या अन्यायाने मुंबईसह महाराष्ट्र खवळून उठला. मुंबईतल्या सव्वाशे कापड गिरण्यातला कामगार, इथला सामान्य माणूस रत्यावर उतरला, प्रचंड मोर्चा निघाला. फोर्ट भागात जमावबंदी असतानाही हा कामगार फ्लोरा फाऊंटनकडे जमू लागला. चौकात सत्याग्रहासाठी ठाण मांडून बसला, पण याच सत्याग्रहींना उधळून लावण्यासाठी करण्यात आलेल्या लाठीमारात ते हटत नाहीत, हे पाहून मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश दिले. फ्लोरा फाऊंटनचा परिसर त्यादिवशी रक्ताने माखला होता, कांरज्यातून पाण्याऐवजी रक्ताचे फवारे उडत होते, निदर्शकांच्या रक्तांच्या चिळकांड्या रस्त्यांवर उडाल्या. या सर्व हुताम्यांच्या बलिदानाने, आंदोलनाने तत्कालीन सरकारने नमते घेऊन १ मे, १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली.

इ.स.१९६५ मध्ये हुतात्मा स्मारक उभं राहिलं. फोर्ट परिसरात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्टेशनपासून हाकेच्या अंतरावर व चर्चगेट स्टेशनपासून अगदी नाकासमोर,दक्षिण मुंबईतल्या महत्त्वाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेलं हे स्मारक आम्हाला आमची मुंबई आमचा महाराष्ट्र आमच्या लोकांनी कसा मिळवला याची आठवण करुन देतं. फक्त ही आठवण या महाराष्ट्र दिनापासून त्या महाराष्ट्र दिनापर्यंतचं मर्यादित राहू नये, त्या हुतात्मा स्मारकाचं देखणेपण डोळ्यात भरताना त्याच्यासाठी कित्येकांचे देह धारातीर्थी पडलेत याची मनात आठवण येणे ही सुध्दा मोठी गोष्ट आहे.

ज्या १०६ हुतात्म्यांनी आपल्यावर उपकार केलेत, ही मायानगरी मुंबई हा महाराष्ट्र आपल्याला लढून मिळवून दिलेला आहे. त्यासाठी इथला सर्वसामान्य माणूस प्राणपणाने लढला. ही संयुक्त महाराष्ट्राची चळवळ कुणा पुढाऱ्याची नव्हती, तर ती होती इथल्या कष्टकऱ्यांची. त्यांची स्मृती म्हणून पेटती मशाल हाती घेतलेला शेतकरी डावीकडे तर कामगार उजवीकडे असलेलं हे स्मारक आपल्याला त्यांच्या हौताम्याची सदैव आठवण करून देतं.

हुतात्मा स्मारकातली ही मशाल आपल्याला अंर्तबाह्य पेटती ठेवायची आहे. तिला सदैव तेवत ठेवणे हेच आपले या संयुक्त महाराष्ट्रातल्या आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे, तीच खरी महाराष्ट्राला आणि १०६ हुतात्म्यांना आपली मानवंदना ठरेल.

**- अनुज केसरकर**

# कामगार चळवळीपुढे आव्हाने

काळाचे आव्हान कामगार चळवळीने स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याच्या व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो.

जागतिक कामगार दिन जगामध्ये सर्वत्र सर्व पातळ्यांवर साजरा केला जातो. जागतिकीकरणाची लाट आल्यानंतर कामगार चळवळीसंबंधी जगातच नव्याने विचार होऊ लागला व एकविसाव्या शतकातील कामगार चळवळीपुढील बदललेल्या परिस्थितीतील नव्या आव्हानांचा विचार सुरू झाला. जागतिक कामगार संघटनांचे अधिवेशन झाले व त्यातून एक घोषणापत्र प्रसिद्ध झाले. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (आयएलओ) संयुक्त राष्ट्रसंघाशी संलग्न आहे. या संघटनेच्या रेट्यामुळे कोपनहेगन येथे संयुक्त राष्ट्र संघटनेने एक शिखर परिषद भरवली. त्याचेही एक घोषणा पत्र आहे. आयएलओचेही एक घोषणापत्र आहे. त्यानुसार कामगारांच्या हितांविषयक धोरणांचाही प्रत्यय समजून येतो.

भारतामध्ये महाराष्ट्रातील श्रमिक प्रतिष्ठानने देशातील अठ्ठावीस कामगार संघटनांची एक परिषद घेतली. या परिषदेनेही आपले एक घोषणापत्र प्रसिद्ध केले. या सर्व घोषणापत्रांमध्ये एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी कामगार चळवळीची काय परिस्थिती आहे व भविष्यामध्ये कोणती आव्हाने आहेत, याचे चिंतन केले आहे. या सर्व चिंतनातून समान मुद्दे व परिस्थितीचे समान आकलन प्रत्ययाला येते. एक सर्वसाधारण समज पसरवण्यात आला आहे की, कामगार चळवळ जागतिकीकरण प्रक्रियेच्या संपूर्ण विरोधात राहिली आहे. परंतु या घोषणापत्रामध्ये राष्ट्रीय सार्वभौमत्व, आर्थिक स्वातंत्र्य, राष्ट्रा-राष्ट्राचे परस्परपूरक हितसंवर्धन, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घोषणापत्राशी बांधिलकी, मानवी हक्क सनदेशी बांधिलकी, राष्ट्रा-राष्ट्रातील समानता या सिद्धांतावर आधारित आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य व त्या अनुषंगाने एक नवीन जागतिक अर्थव्यवस्था यावर जागतिक कामगार संघटनेने घोषणापत्रामध्ये विश्वास व्यक्त केलेला आहे.

आयएलओच्या घोषणापत्रामध्ये सर्व प्रकारच्या आर्थिक निर्णयाचा उद्देश बेकारी व दारिद्र निर्मूलनाचा असायला पाहिजे आणि त्याला सामाजिक आशय असला पाहिजे. वैज्ञानिक व तंत्रज्ञानातील गुंत्यामुळे ज्या नव्या उत्पादन पद्धती अस्तित्वात आल्या, त्याचा उपयोग याच उद्दिष्टासाठी झाला पाहिजे. आयएलओच्या या सिद्धांताला कोपनहेगन शिखर परिषदेमध्ये मान्यता देण्यात आली. परंतु नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग नफ्यासाठी होत आहे; जनतेचे राहणीमान वाढवण्यासाठी नाही, याकडे या शिखर परिषदेमध्ये सहभागी होणाऱ्या राष्ट्रांनी दुर्लक्ष केले. आयएलओच्या घोषणापत्रामध्ये जागतिकीकरणामुळे जगातील कामगारांना हलाखीला तोंड द्यावे लागत आहे, बेरोजगारी व सामाजिक सुरक्षेच्या घसरणीला तोंड द्यावे लागत आहे, हे कटू वास्तव नमूद करण्यात आले. सर्व राष्ट्रांतून राष्ट्रीय सरकारांचे अधिकार संकुचित होत असून बाजारशक्ती प्रभावी होत आहे व सर्वत्र वित्तीय भांडवलाची पकड मजबूत होत आहे. भांडवलशाही दिवसेंदिवस उग्र रुप धारण करत असल्यामुळे वारंवार कामगारांना त्याची झळ पोहचत असल्याची अनेक उदाहरणे आपल्याला भोवताली दिसून येतात. कामगारांच्या हितासाठी कामगार चळवळींनी सातत्याने प्रयत्न केलेला आहे. जगातील सर्व कामगार आपल्या हक्कासाठी व न्याय्य अशा सामाजिक व्यवस्थेसाठी झगडत आहेत. जनतेच्या व श्रमिकांच्या हित संरक्षणासाठी व नागरिकांच्या सामाजिक सुरक्षेसाठी शासनाची सकारात्मक भूमिका व हस्तक्षेप महत्त्वाचा आहे, अशी भूमिका जगातील सर्वच कामगार संघटनांनी घेतलेली आहे. काळाचे आव्हान कामगार चळवळीने स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याच्या हक्काला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीच्या चळवळीचे भेद होऊ शकतो. पुरोगामी बुद्धिजीवी वर्ग, शेतकरी वर्ग व लहान उद्योजक हे लोकशाही शक्तीचे विभाग आहेत. हे सर्व होण्यासाठी वर्ग जागृतीची गरज आहे. कामगार शक्तीच्या कुवतीचा आत्मविश्वास कामगारामध्ये निर्माण होण्याने चळवळीला धार येऊ शकते. जागतिक कामगार संघटनेच्या काँग्रेसने आपल्या घोषणापत्रावर विश्वास व्यक्त केलेला आहे. याच घोषणापत्रामध्ये काँग्रेसने असा विश्वास व्यक्त केला आहे, की जागतिक, राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर कामगार संघटनांमध्ये एक प्रकारचा भक्कम भातृभाव निर्माण करून आपले स्वतंत्र व्यासपीठ भक्कम उभे करून अर्थनिर्भर अर्थकारण व शाश्वत विकास या मागण्यांसाठी शक्ती उभी करावी. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण-बाजारीकरण नाकारून जनताभिमुख नव्या आर्थिक नीतीचा पर्याय निर्माण करावा. नवे शतक हे आपले शतक आहे. ते वित्त भांडवलाचे, साम्राज्यवादाचे किंवा मोठ्या कॉर्पोरेशनचे राहणार नाही, असा आशावादही या घोषणापत्रामध्ये व्यक्त केलेला आहे. महाराष्ट्रामधील श्रमिक प्रतिष्ठानानेही जे घोषणापत्र प्रसिद्ध केले, त्यामध्ये हिच सूत्रे आधारभूत मानलेली आहेत. संघटित कामगार चळवळीची घसरण होत आहे, याची चिंता त्यामध्ये व्यक्त होते. या घसरणीच्या कारणांचा शोध घेणे व त्या दृष्टीने चळवळीची दिशा व आखणी निश्चित करण्याची निकड असल्याचे प्रतिपादन केलेले आहे. आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था विकसित देशाच्या व त्यातील बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कलाने चालतात. परंतु आपल्यासारख्या अविकसित देशाच्या दृष्टीने याच धोरणाने देशातील आजारी उद्योग वाढत आहेत आणि बेकारी, दारिद्र्य वाढत आहे. देशांतर्गत व देशा-देशांमध्ये विषमतेची दरी वाढतच आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया अपरिहार्य होत असताना नफा हे लक्ष न ठेवता जनता हे लक्ष्य ठेवून राष्ट्राराष्ट्रातील विषमता व राष्ट्राअंतर्गत विषमता कमी करण्यावर भर असावा अशी आर्थिक नीती असावी, यावर कामगार चळवळीने भर देण्याची गरज आहे. जागतिकीकरणाच्या धोरणामुळे शासनाच्या धोरण, नीती व दृष्टिकोनामध्ये आमूलाग्र बदल झालेला आहे. कामगारांच्या व श्रमिकांच्या शोषणाविरुद्ध पावले उचलण्याऐवजी शोषणासाठी मालकांना मुक्त परवाना मिळत आहे. मुक्त स्पर्धेसाठी मालकांना विविध सवलती दिल्या जात आहेत. कामगार कपात व कारखाने बंद करण्याची मुभा देण्यात येत आहे. कामगार कायदे जे कामगारांच्या लढ्यातून निर्माण झालेले आहेत, निष्प्रभ करण्यात येत आहेत. खासगीकरणासाठी व बाजारीकरणासाठी सार्वजनिक उद्योगक्षेत्र गुंडाळले जात आहे. असे सार्वजनिक क्षेत्र देशाच्या स्वयंपूर्ण अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी गरजेचे आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे उत्पादन प्रक्रियेचे मालकी, प्रकार व स्वरूप बदलत असून राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांची यातून अनियंत्रित मक्तेदारी वाढत आहे. त्यामुळे कामगार व मालक यांच्यातील परस्पर संबंधांवर प्रतिकूल परिणाम होत आहे. कामगारांपुढे ही एक चिंतनीय व आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झालेली आहे. जागतिकीकरणाच्या धोरणाला पर्याय नाही, असा भ्रम सरकारकडून पसरवण्यात येत आहे. कामगार चळवळीला पर्यायी आर्थिक नीतीचे प्रारूप तयार करून जनतेसमोर ठेवणे आवश्यक आहे. आपले मतभेद बाजूला ठेवून कामगारांच्या हक्कावरील व कामगार चळवळीवरील हल्ल्याविरुद्ध लढण्यासाठी एकत्रित कामगार चळवळीची गरज आहे. आज याची जाणीव देशातील कामगार संघटनांना झाल्याचे प्रत्ययाला आले, याचे समाधान आहे. कामगार चळवळीच्या इतिहासात अभूतपूर्व कामगार एकजुटीचे व एकत्रित क्रांतीचे दर्शन नुकत्याच कामगार-कर्मचाऱ्यांच्या संपाने घडलेले आहे. हा आशेचा किरण आहे.

• • • •

## अनिल गणाचार्य यांच्या आठवणीतून - भाग १

*ज्येष्ठ कामगार नेते अनिल गुलाबराव गणाचार्य यांना कामगार चळवळीतील कामाचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्याचबरोबर अनेक संघटनांसमवेत त्यांनी काम केले आहे. त्यांच्या अनुभवांवरील आधारीत हे सदर 'कर्मचारी टाइम्स'च्या वाचकांसाठी देत आहोत....*

### श्रमिक उत्कर्ष सभा

श्रमिक उत्कर्ष सभेची स्थापना १८ नोव्हेंबर १९८२ रोजी कामगार नेते विजय कांबळे आणि कृष्णा मोकल यांच्या पुढाकाराने झाली. काँग्रेस नेते अॅड. रामराव आदिक यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. त्यावेळी लोकसत्ता दैनिकात कार्यरत असलेले पत्रकार प्रकाश कुळकर्णी यांनी संघटनेला ब्रीदवाक्य दिले ते म्हणजे निकोप कामगार चळवळ.

विजय कांबळे आणि कृष्णा मोकल हे प्रिमियर ऑटोमोबाईल या कारखान्यात काम करत असत. श्री. कांबळे कुर्ला प्लान्टमध्ये तर श्री. मोकल हे वडाळा फॉन्ड्रीमध्ये. दोघेही समवयस्क होते आणि कामगार नेते आर. जे. मेहता यांच्या मुंबई मजदूर सभेचे पदाधिकारी होते. मेहता नावाचा त्या काळात बोल-बाला होता. श्री. कांबळे हे १९६७ पासूनच कामगार चळवळीत अग्रणी होते. नंतरच्या काळात संघटनेच्या कार्यशैलीवरून मतभेद झाल्यामुळे श्री. कांबळे आणि श्री. मोकल यांनी राजीनामा देऊन कामगार उत्कर्ष सभेची स्थापना केली. त्यावेळी काँग्रेसचे मंत्री एच. आर. गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली व गुलाब जोशी यांच्या सहकार्याने युनियन सुरु झाली. गोल्डन टोबॅको, गॉडफ्रे फिलिप्स या सिगारेट बनविणाऱ्या मोठ्या कंपन्या, त्याचबरोबर पार्ले बिस्किट या कारखान्यांमधील कामगार या संघटनेचे सुरूवातीस सभासद झाले. युनियनचा फार मोठा दबदबा त्या काळात होता.

सोव्हिएत मैत्री संघाच्या वतीने १९८२ साली सोव्हिएत दौरा आयोजित करण्यात आला होता. यावेळी बी. ए. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली त्याचे नियोजन केले होते. त्यावेळी मी सेक्रेटरी होतो. या दौऱ्यात श्री. कांबळे तसेच वसंतराव ननावरे हेदेखील सहभागी झाले होते. त्या दरम्यान कामगार उत्कर्ष सभेत श्री. कांबळे विदेशात गेल्यामुळे मोठ्या प्रमाणावर उलाढाल सुरु झाली. संघटनेत गुलाब जोशी अध्यक्ष तर विजय कांबळे सरचिटणीस होते. मात्र वर्चस्वावरून दोघांमध्ये स्पर्धा होती. गुलाब जोशी यांच्याकडे मसल पावर होती तर विजय कांबळे यांच्याकडे कामगारांचे नेतृत्व करण्याची क्षमता होती. गुलाब जोशी यांना मालक वर्गाचा पाठिंबा होता. ते अशिक्षित होते तर विजय कांबळे शिक्षित होते. युनियनकडे मोठ्या प्रमाणावर पैशाचा ओघ वाहू लागला होता. त्यामुळे ही स्पर्धा अधिकच तीव्र झालेली होती.

अखेर या सर्व प्रकारानंतर विजय कांबळे यांनी राजीनामा दिला आणि ते बाहेर पडले. त्यांनी श्री. मोकल यांना सोबत घेऊन श्रमिक उत्कर्ष सभेची स्थापना केली. सुरूवातीला बांद्रा- खेरनगर येथील जुन्या घरी त्यांनी युनियनचे छोटे कार्यालय सुरु केले. या कार्यालयातूनच कामगारांच्या सर्व प्रश्नांची सोडवणूक होत गेली. संघटन कार्यदेखील होत होते.

त्यानंतर सहा महिन्यातच मी मे १९८३ मध्ये श्रमिक उत्कर्ष सभेत प्रवेश केला आणि संघटनेचे चिटणीसपद सांभाळण्यास सुरूवात केली. या पदाची जबाबदारी माझ्यावर येण्यामागेही एक किस्सा आहे. तो असा की, १९८० मध्ये मी भारतीय कम्युनिस्ट पक्ष सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. युवक काँग्रेस आणि जिल्हा काँग्रेसचे सक्रीय पदाधिकारी म्हणूनही मी कार्यरत होतो. कम्युनिस्ट व समाजवादी विचारसरणीमुळे रशियाच्या वतीने आयोजित कार्यक्रमांना माझी उपस्थिती असायची. याच विचारसरणीला मानणारा एक गट काँग्रेसमध्ये बी. ए. देसाई यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत होता. त्यांनी सोव्हिएत मैत्री संघाची स्थापना केली होती. मी त्याचा सेक्रेटरी म्हणूनही जबाबदारी सांभाळत होतो.

विजय कांबळे रशियाच्या दौऱ्यावरून परतल्यानंतर त्यांनी नवी संघटना स्थापना केली. मे १९८३ मध्ये रशियावरून भारताच्या दौऱ्यावर आलेल्या एका शिष्टमंडळाला इथल्या कामगारांना भेटायचे होते. त्यांचे प्रश्न जाणून घ्यायचे होते. त्यासाठी विजय कांबळे यांनी एका कार्यक्रमाचे आयोजन करावे, अशी त्यांना विनंती करण्यात आली. त्यांनी समाज मंदिर हॉल, बांद्रा पूर्व येथे या कार्यक्रमाचे आयोजन केले. रशियन शिष्टमंडळाचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्यावेळी रशियाचे उपराष्ट्रपतीदेखील उपस्थित होते.

या कार्यक्रमात विजय कांबळे यांनी मला विचारले की, मी कामगार क्षेत्रात काम केलेले आहे, या कामाचा अनुभव आहे तर त्यांच्या युनियनमध्ये सक्रीय व्हावे. त्यांच्या या विनंतीस मी तात्काळ होकार दिला. त्याचक्षणी भव्य कामगार मेळाव्यात माझ्या नावाची घोषणा संघटनेच्या चिटणीसपदी करण्यात आली. या कार्यक्रमात कामगार वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

ताबडतोब युनियनच्या नव्या जबाबदारीला सुरूवात झाली. मी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीमध्ये विकास अधिकारी म्हणून कार्यरत होतो. माझे तिथे फिल्ड वर्क असायचे. त्यामुळे रोज कार्यालयात बसून काम करण्याचे मला बंधन नव्हते. फक्त दिलेले टार्गेट पूर्ण करावे लागायचे. माझ्यासमवेत ५० एजंट असायचे. त्यांच्या कामावर मी लक्ष ठेवत असे. त्यांना मार्गदर्शन करणे तसेच बिझनेस करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करणे, अशा स्वरुपाचे माझे काम होते. सकाळी अर्धा दिवस किंवा सोयीप्रमाणे इन्शुरन्स काम व दुपारनंतर युनियनचे काम असा माझा दिनक्रम सुरु होता. श्री. कांबळे हे पूर्ण वेळ काम करायचे तर श्री. मोकल हे सकाळी त्यांच्या वडाळा येथील पहिल्या पाळीचे काम संपवून संध्याकाळी ४ वाजता युनियनच्या कार्यालयात यायचे. वडाळा ते दादर स्टेशन अशी त्यांना कंपनीची बस सोडायला असायची. कधी कधी मी त्यांना दादर स्टेशनवरून स्वतःच्या गाडीने युनियनच्या कार्यालयात घेऊन जात असे. संध्याकाळी ४ ते ८ किंवा काम संपेपर्यंत रात्री ९ वाजेपर्यंत युनियनच्या कार्यालयात थांबावे लागायचे. कामगारांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असायची. त्यामुळे त्यांचे प्रश्न सोडविताना वेळ होत असे. विजय कांबळे यांची छोटी केबिन होती. त्यात सात-आठ जण बसू शकायचे. कामगार किंवा व्यवस्थापनाचे प्रतिनिधी यांची तिथे मिटिंग व्हायची. बाहेरच्या खोलीत कृष्णा मोकल, अध्यक्षांचे आसन, माझी (सेक्रेटरी) तसेच खजिनदार काशिनाथ चौधरी यांची आसनव्यवस्था होती. सोबतच माधुरी, निलिमा, टायपिस्ट श्री. शेख हे देखील बसायचे. त्यांच्या मदतीला सुरेश गावडे असायचे. नंतर संजय वाळवे शिपायाचे काम करू लागले.

श्री. मोकल हे कामगारांच्या पगारवाढीचे करार बनविण्यासाठी उत्तम काम करत. त्यांनी बनविलेला करार अचूक आणि वाखाणण्याजोगा असायचा. श्री. कांबळे हे कामगारांच्या तक्रारी अथवा समस्या ऐकून घेत. त्यांना मार्गदर्शन करत. मी कामगारांना मिळालेल्या मेमोचे उत्तर तयार करत असे.

कारखान्यांच्या द्वारसभेत तिघांचीही भाषणे होत. मुंबई, ठाणे, तारापूर, गाजियाबाद, कोल्हापूर आदी ठिकाणचे कामगार हे संघटनेचे सभासद होते. त्यामुळे प्रवासदेखील करावा लागत असे. टाटा स्टील, एशियन पेंट्स अशा नामांकित कंपन्यांमध्ये ही संघटना कार्यरत होती.

*(पुढील अंकात सीप्झ लढा)*

## मंत्रालयातील कॅन्टीनमध्ये घराप्रमाणे सेवा बजावणारे शिवाजी सत्यवान आव्हाड



मंत्रालयात आपण कॅन्टीनमध्ये गेलात तर असाच समतोल आहार वाटपाचे काम आवडीने, जबाबदारीने एक पदवीधर कर्मचारी गेली १५ वर्षे सातत्याने सेवा देत आहे. या कर्मचाऱ्यांचे नाव आहे 'शिवाजी सत्यवान आव्हाड'. सध्या ते मंत्रालयात वेटर (वाढपी) आणि सहआचारी पदावर काम करीत आहे.

शिवाजी आव्हाड हे २१ जुलै २००८ रोजी मंत्रालयात सेवेत रूजू झाले. त्यांचा हसमुख चेहरा, जबाबदारीने काम करण्याची हातोटी वाखण्यासारखी आहे. मंत्रालयात येणाऱ्या कर्मचारी - अधिकारी जनता जनार्दन, पत्रकार यांना कधीही न कंटाळता ते घराप्रमाणे सेवा देत आहेत.

मंत्रालयातील कॅन्टीन म्हणजे त्यांचे घरच आहे आणि तेथे काम करणारे कर्मचारी हे जणू त्यांच्या घराचे सदस्य आहेत. त्यांच्या सुख:दुखात ते कुटुंबाप्रमाणे सहभागी होत असतात. त्यांचे मुंबईत घर नाही म्हणून ते आठवड्याचे पाच दिवस मंत्रालयातील कॅन्टीनमध्ये टेबलावर झोपतात. मुक्काम-पोस्ट दापूर, ता. सिन्नर, जि. नाशिक हे त्यांचे रहाते घर. ते मुंबईत सोमवारी येतात आणि शुक्रवारी आपल्या घरी कुटुंबासोबत दोन दिवस घालवितात. हा दिनक्रम ते १५ वर्षे सातत्याने करत आहेत.

शिवाजी सत्यवान आव्हाड यांचा जन्म अत्यंत गरीब कुटुंबात झाला. त्यांचे वडील सत्यवान म्हसुजी आव्हाड हे एस.टी. महामंडळात नोकरीला होते. घरी एक एकर शेती. यावरच त्यांच्या घरचा, कुटुंबाचा उदरनिर्वाह होता. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये झाले, तर माध्यमिक शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेमध्ये झाले. 'रयत

नोंद

शिक्षण संस्थेचे स्वावलंबी शिक्षण हेच ब्रीद' वाक्य त्यांच्या आजही मनात कोरले आहे. दहावी पास झाल्यानंतर अकरावीचे शिक्षण त्यांनी बाहेरून घेतले. तर बारावीचे शिक्षण जी.एम.डी. महाविद्यालय, ता. सिन्नर येथे झाले. त्यानंतर पुन्हा ते शेतीकडे वळले. शेती करत शिक्षण पूर्ण करून पदवीधर झाले.

पुढील शिक्षण घेण्याची इच्छा होती, पण गरीबी त्यांच्या नशिबी होती. मग त्यांनी नोकरी करण्याचा निर्णय घेतला. सर्वत्र प्रयत्न केल्यानंतर अखेर २००७ साली पदवी असतानादेखील बॉय वेटर पदासाठी मंत्रालयात अर्ज केला आणि ते मंत्रालयात वेटर/ सहआचारी पदावर आजपर्यंत काम करत आहेत.

मंत्रालयातील कॅन्टीनमधील खानपान सेवेमुळे कधी अधिकारी, कर्मचारी येणाऱ्या अभ्यागतांना बाधा झाली आहे असे कधीही मी पाहिलेले नाही. याचे श्रेय शिवाजी आव्हाड यांना जाते. कॅन्टीन महाव्यवस्थापकांनी कुठलीही जबाबदारी दिली की, ती पूर्वत्वाकडे नेण्याकडे नेहमी ते अग्रेसर आहेत. कॅन्टीनमध्ये नवीन नवीन पदार्थ देण्याकडे त्यांचा कल असतो. सध्या खमंग ढोकळा, अळूवडी त्याचबरोबर गोड बालूशाही हे पदार्थ कर्मचारी अधिकाऱ्यांना आवडले आहेत असा दावा त्यांनी केला आहे. एकदा पदार्थ बनविल्यानंतर सेवा देत असताना अधिकारी-कर्मचारी यांनी पदार्थामध्ये कमतरता काढली तर खूप वाईट वाटते. अशी खंत आव्हाडांनी बोलून दाखविली.

आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग काय असे त्यांना विचारले असता ते म्हणाले, ३० जून २०२२ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथविधी घेतल्यानंतर काही तासात मंत्रालयात कॅबिनेट बैठक होती. त्यावेळी महाव्यवस्थापकांनी दिलेल्या आदेशानुसार आव्हाड यांनी मंत्रालयातील सहाव्या मजल्याची चावी उघडली. घरी परतणाऱ्या साविंद्र साळुंखे याला चर्चगेटवरून मंत्रालयात बोलावले. तातडीने ४० ते ५० जणांची चहा बिस्किटची सेवा उपलब्ध करून दिली. त्यावेळी मंत्रालयाच्या बाहेर प्रचंड पाऊस पडत होता. हा प्रसंग माझ्या चांगल्याच लक्षात राहिल असे आव्हाड म्हणाले.

**- नासिकेत पानसरे**
**९९३०९९८९७८**

## कामगार वर्गातील अस्वस्थता

जागतिक कामगार दिवस म्हणून १ मे या दिवसाला कामगार चळवळीच्या इतिहासात एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. हिंदुस्थानातील संघटित कामगार चळवळीचा जन्म झाला तो १९२० मध्ये आयटकच्या स्थापनेने तर पहिला जागतिक कामगार दिन हिंदुस्थानात साजरा झाला तो १९२३ मध्ये. १९१७मध्ये रशियात क्रांती झाली आणि मार्क्सच्या तत्त्वज्ञानाच्या आधारे लेनीनने शोषणाच्या विरोधातील लढाईतून कामगार वर्गाचे राज्य स्थापन केले. याचा जगभरात अनेक देशांतील जनतेवर परिणाम झाला. ब्रिटिश वसाहतीच्या जोखडातून अनेक राष्ट्र स्वतंत्र झाली. पूर्व युरोपातील अनेक राष्ट्रांनी सोव्हिएत रशियाच्या मार्गाने प्रवास करत राज्यकारभार आपल्या हाती घेतला. जग दोन खांबी बनले होते. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स इत्यादी भांडवलशाहीचा पुरस्कार करणारी राष्ट्रे एका बाजूला तर सोव्हिएत रशिया, पोलंड, जर्मनी, युगोस्लाव्हिया इत्यादी कष्टकऱ्यांच्या शोषणाच्या विरोधात उभी राहणारी राष्ट्रे दुसऱ्या बाजूला मात्र पुढे भांडवलशाहीने जगाभोवती आपले पाश आवळायला सुरुवात केली होती. त्यातच सोव्हिएत रशिया आणि मित्र राष्ट्रात निर्माण झालेले अंतर्विरोध आर्थिक अवरुद्धता या पार्श्वभूमीवर सोव्हिएत रशियाचे अध्यक्ष म्हणून मिखाईल गार्बोचौव यांनी पेरेसोईका आणि ग्लासनोस्त या धोरणाचा अवलंब केला. त्यातून १९८८ ते १९९१ या दरम्यान सोव्हिएत रशियाचे विभाजन झाले. १९८९ मध्ये जर्मनीतील ऐतिहासिक भिंत कोसळली आणि पूर्व जर्मनी आणि पश्चिम जर्मनी एक झाले. याचा परिणाम म्हणून जग एकखांबी बनले. अमेरिकेने आंतरराष्ट्रीय सावकार (आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक) यांच्या मदतीने जगाभोवती आपले पाश आवळले व जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाचे धोरण एकेक करत जगात राबवले. हिंदुस्थानने १९९१ पासून या नवीन आर्थिक धोरणांचा मार्ग स्वीकारला.

ह्याच तो काळ होता, जेव्हा उत्पादन भांडवलाची जागा सुरुवातीला व्यापारी भांडवलाने घेतली, जी आता वित्तीय भांडवलाने घेतली आहे अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्राची जागा सुरुवातीला उत्पादक क्षेत्राने घेतली, मग ती जागा सेवा क्षेत्राने घेतली, जी आता किरकोळ क्षेत्राने घेतली आहे. अर्थव्यवस्थेतील बदलाचे पडसाद चळवळीवर पडलेले दिसतात.

या सगळ्या बदलात तंत्रज्ञानाने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे तंत्रज्ञान विकसित होत गेले. माहिती आणि दळणवळण यात प्रगती झाली. यामुळे जे बदल घडून आले त्यामुळे तर उत्पादनाची प्रक्रिया, सेवेचे स्वरूप बदलले तसे त्यातील कष्टकऱ्यांचे स्थान बदलले. आता तर कृत्रिम बुद्धिमत्ता मानव कष्टकऱ्यांना बेदखल करू पाहत आहे.

या सगळ्या बदलांचे पडसाद आज कामगार चळवळीवर पडत आहेत. सुरुवातीला उत्पादनाची प्रक्रिया एकाच छताखाली होती, त्या वेळी एकेका कारखान्यात हजारो कामगार काम करत होते. त्यातून त्यांचा एक दबाव गट निर्माण होत असे, त्यांची एक शक्ती बनत होती. पण आता उत्पादनाची प्रक्रिया विभाजित होत गेली तसतशी त्यांची शक्ती क्षीण झाली. दबाव कमी झाला. मालक वर्गात नफा वाढला पाहिजे, कामगार शक्ती क्षीण झाली पाहिजे यासाठी जाणतेपणी केलेले हे प्रयत्न होते. याशिवाय कामगार वर्ग म्हणून आकाराला येऊ नये यासाठी जाणतेपणी भाषा, प्रांत, जात, धर्म, लिंग या भेदाभेदांना खतपाणी घालून त्यांचे विभाजन घडवून आणले गेले. कामगारांनी व्यवस्थेला आव्हान देऊ नये, धोरणावर भूमिका घेऊ नये म्हणून अर्थवादात त्यांना अडकवले गेले त्यातच प्रत्येक राजकीय पक्षाने निवडणुकीत राजकारणात आपला प्रभाव वाढावा म्हणून कामगार वर्गाला स्वतःच्या हितसंबंधांसाठी वापरायला सुरुवात केली. त्यातून कामगार अधिक विभागला गेला आणि तो अधिक क्षीण होत गेला. मागील काही वर्षात श्रीमंत अधिक श्रीमंत झाले तर गरीब अधिक गरीब होत गेले. आर्थिक विषमतेने टोक गाठले. कष्टकऱ्यांच्या जीवनात अस्थैर्य आले, असुरक्षितता आली. वैफल्यग्रस्त कामगारांतील असंतोषाने जर वेडेवाकडे वळण घेतले, तर तो प्रश्न फक्त मजूर मालक संबंधापुरता मर्यादित राहणार नाही, तर समाजात असंतुलन, अस्थैर्य निर्माण करून हिंसेला निमंत्रण ठरू शकते, यामुळे समाजातील एका घटकाचा प्रश्न म्हणून जर राज्यकर्त्यांनी त्याची योग्य ती दखल घेतली नाही तर पुढे होणाऱ्या परिणामांची कल्पनाच न केलेली बरी!

**- देवीदास तुळजापूर**

## शासकीय अधिकारी कर्मचारी यांच्यातील प्रशासकीय गतिमानता वाढीस लागण्यासाठी...

भारतीय राज्यघटना व त्या अनुषंगाने निर्माण करण्यात आलेल्या विविध यंत्रणा यातील प्रशासन हे महत्वाचे अंग आहे. राज्यघटनेनुसार सामाजिक कल्याण या तत्वाचा आपण स्विकार केला आहे. सामाजिक कल्याणाचे तत्व राबवत असताना व्यापक लोकहिताची धोरणे, कार्यक्रम, योजना व निर्णय सरकार किंवा शासन घेत असते. अशी ही धोरणे, कार्यक्रम, योजना व निर्णय यांची अंमलबजावणी क्षेत्रीय स्तरावर करण्याचे काम प्रशासकीय यंत्रणा करत असते. शासन व्यवस्थेचे यश हे प्रशासकीय व्यवस्था किती कार्यक्षमतेने व गतिमानतेने काम करते यावर अवलंबून असते. राज्यात वीस लाख कर्मचारी व अधिकारी विविध विभागात काम करत आहेत. साहजिकच जनतेच्या प्रशासनाकडून रास्त वेळेत व विनासायास कामे व्हावीत ह्या अपेक्षा असतात आणि त्या पूर्ण करणे हे प्रशासकीय यंत्रणेचे आद्य कर्तव्य ठरते. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची पाच दिवसाचा आठवडा ही मागणी राज्य शासनाने मंजूर केली आहे. या अनुषंगाने शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे जनतेप्रती असलेले आपली वचनबद्धता व उतरदायित्व हे अधिक कार्यक्षम, पारदर्शक, लोकाभिमुख व जबाबदार पद्धतीने कसे पार पाडता येईल या बाबतचा उहापोह करण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. निश्चितच याचा उपयोग प्रशासकीय गतिमानता व कार्यक्षमता वृद्धिंगत करण्यासाठी होईल.

कार्यालयात उपलब्ध असणारी संसाधने विचारत घेवून जनतेला शासकीय सेवा व सुविधा विहित मुदतीत व विनासायास पुरवण्यासाठी आपण कटिबद्ध असायला हवे. प्रशासनाची कार्यक्षमता ही अनेक घटकांच्या व बाबींच्या समुच्चयावर अवलंबून असते. त्यासाठी प्रशासनाच्या प्रत्येक घटकाने आपले योगदान देणे आवश्यक ठरते. उदा मंत्रालय ते ग्रामपंचायत.

जबाबदारीची जाणीव प्रशासनातील प्रत्येक घटकाला हवी. त्यासाठी विहित वेळेत लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देणे आवश्यक ठरते. शासनाने माझी जबाबदारी घेतली आहे ही जाणीव जनतेच्या मनामध्ये निर्माण होण्यासाठी प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांची कामे तत्परतेने करून दिली पाहिजे उदा. वैयक्तीक लाभाच्या योजना.

आपले काम व आपले निर्णय हे कायदा, नियम व शासन निर्देश याच्याशी सुसंगत असायला हवेत. त्यासाठी कायदा व नियम याचे ज्ञान आत्मसाद करावे.

कार्यालयात काम करताना माहितीची उपलब्धता व आपल्या निर्णयात स्पष्टता आवश्यक आहे. यामुळे जनतेचा प्रशासकीय कार्यपद्धती बाबत विश्वास वाढतो. उदा. माहिती अधिकार अधिनियम

घेतलेले निर्णय व केलेले कामकाज याचे उतरदायित्व आपल्याकडे आहे. याची जाणीव नेहमी असायला हवी. त्यामुळे काळजीपूर्वक निर्णय आपल्या-कडून घेतले जातात व त्याची योग्य अंमलबजावणी करता येते. निर्णयक्षमता व कार्यक्षमतांचा परस्पर संबंध निश्चितच असतो. निर्णयक्षमता कमी झाली की कार्यक्षमता कमी होते. निर्णय क्षमता वाढवण्यासाठी ज्ञान व अनुभव याचा योग्य समन्वय साधावा लागतो.

कार्यालयीन कामकाज हे सांघिक काम असते. त्यामुळे कार्यालय प्रमुखांनी सांघिक काम विकसित केले की, कामाची गती वाढून कार्यक्षमता वाढते. यासाठी आपण संघ प्रमुख म्हणून कामकाज करावे लागते. लोकसेवा हक्क अधिनियम नुसार अधिसूचित केलेल्या सेवा ह्या विहित मुदतीत उपलब्ध करून देण्यास आपण कटिबध आहोत. त्यामुळे अधिसूचित सेवा पुरवण्याची विहित मुदत लक्षात घेवूनच कामकाज करावे.

माहिती अधिकार कायदा व अनुषंगाने प्रशासनात आलेली पारदर्शकता ही खूप जमेची बाजू आहे. माहिती अधिकार अर्ज कोणताही दुराग्रह न बाळगता हाताळणे व उपलब्ध असलेली माहिती मुदतीत दिल्याने कामकाजात व्यत्यय निर्माण होत नाही. सन्मानीय न्यायालयाचे आदेश, न्यायनिर्णय, स्थगिती आदेश याबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अतिदक्ष व जागरूक राहणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायालयाचे प्रतिकूल शेरे व न्यायालयाचा अवमान ह्या बाबी आपण टाळू शकतो.

कामाचा वाढता व्याप व त्यामुळे अधिकारी यांचे गावोगावी होणारे कमी क्षेत्रीय दौरे हा चिंतेचा विषय आहे. दौरे केल्याने जनतेशी संवाद वाढतो, त्यांचे प्रश्न समजून घेता येतात व जागेवरच त्यांची सोडवणूक करता येते. यामुळे निश्चितच प्रशासनाबाबत जनतेचा विश्वास वाढून कामकाजाला गती येते. माहिती तंत्रज्ञानाचा वापर प्रशासकीय गतिमानतेच्या दृष्टीने महत्वाचा आहे. त्यासाठी माहिती तंत्रज्ञान यातील नवे बदल आत्मसात करणे व त्याचा वापर करून प्रशासकीय गतिमानता वाढवणे शक्य होते.

अधिकारी व कर्मचारी यांच्यातील वाद व विसंवाद याचा प्रत्यक्ष परिणाम कार्यालयाच्या कार्यक्षमतेवर होतो. निश्चितच अधिकारी व कर्मचारी यांच्यात सौहार्दपूर्ण वातावरण जाणीव पूर्वक निर्माण करणे आवश्यक ठरते. उदा. खाजगी समारंभ सहभाग.

वंचितांना न्याय देणे व त्यांचे हक्क अबाधित राखणेची जबाबदारी प्रशासनावर आहे. त्यामुळे आपण काम करत असताना वंचित व दुर्बल घटकांचे हक्क हिरावून घेतले जात नाहीत ना? याची जाणीव प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांना असायला हवी.

अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे कोणते कामकाज सोपवले आहे, याबाबत कार्यालयीन सुस्पष्ट आदेश असावेत व त्याची त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे आवश्यक असते. यासाठी तक्ता स्वरूपात अशी कामाची यादी कार्यालयाबाहेर व कार्यालयात दर्शनी भागात लावणे आवश्यक आहे. तसेच ती शाखा व ते कामकाज करणारा व सेवा पुरवणारा अधिकारी व कर्मचारी यांचा स्पष्ट उल्लेख त्यावर असणे आवश्यक आहे. बऱ्याच वेळा आदेश एका कर्मचाऱ्याच्या नावे व कामकाज दुसरा कर्मचारी करतो ही बाब कटाक्षाने टाळायला हवी.

कार्यालयात प्रवेश करणाऱ्या व्यक्तीला माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी कार्यालयातील उत्तम संवाद कौशल्य असलेल्या व्यक्तीला आपण जनसंपर्क अधिकारी (पीआरओ) नेमावे.

कामानिमित्त अनेक अभ्यागत कार्यालयास भेट देत असतात. या अभ्यागताच्या नोंदी कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने आपल्याला कोणत्या शाखेकडे सर्वात जास्त लोक भेटी देतात हे कळते. त्या प्रमाणे कामकाजाचे सुयोग्य व्यवस्थापन शक्य होते.

संवाद ही कोणत्याही कामकाजाची अथवा सेवेची पहिली पायरी आहे. त्यासाठी येणाऱ्या व्यक्तीशी सुलभ, सोपा व संयुक्तिक संवाद होणे आवश्यक आहे. यासाठी अधिकारी व कर्मचारी यांनी संवाद कौशल्य कसे वृद्धिंगत करता येतील यावर भर देणे आवश्यक आहे.

प्रशासकीय यंत्रणेने काम टाळले व पुढे ढकलेले की योजनांचे लाभार्थी एजंटच्या भूलथापांना बळी पडतात. असे अनिधिकृत एजंट आपली व प्रशासनाची प्रतिमा मलीन करण्याचे काम करत असतात. कारण आपली प्रतिमा मलीन केली की, त्यांचे काम सोपे होते. वास्तविक योग्य संवाद कौशल्य निर्माण करून योग्य वेळी जनतेचे काम करून दिले की, प्रशासनाची छबी लोकमानसात सुधारते. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी नोकरी सोबतच आपला विभाग व विषय याच्या अनुषंगाने दुरस्त शिक्षण विषयक पदवी व पदविका पूर्ण करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. त्यामुळे दृष्टीकोनात योग्य असा बदल होतोच शिवाय आत्मविश्वासही वाढतो.

कार्यालय प्रमुख म्हणून इतर विभाग सोबत समन्वय हा प्रशासकीय कार्यक्षमतेचा एक भाग असतो. त्या अनुषंगाने इतर कार्यालयांचे प्रमुखांना भेटणे, माहितीचे आदान प्रदान करणे, संवाद साधने या बाबी करायला हव्यात. योजनांचे व कार्यक्रमांचे सामाजिक अंकेक्षण व मूल्यमापन केल्याने अंमलबजावणीतील त्रुटी निदर्शनास येतात व त्या अनुषंगाने उपाययोजना करून अंमलबजावणीत गतिमानता आणता येते.

शासनाकडील सूचना व निर्देशानुसार आपण काम करतच असतो. मात्र या कामकाजासोबत आपण समाजपयोगी व लोकोपयोगी नाविन्यपूर्ण उपक्रम आपल्या कार्यक्षेत्रात राबवयाला हवेत, त्यामुळे जनतेचा शासनाप्रती असलेला विश्वास अजून वृद्धींगत होतो. उपरोक्त घटक व बाबी या लक्षात घेत असतांना अस्तित्वात असलेल्या नकारात्मक घटक, बाबी त्यांकडे आपणांस दुर्लक्ष करावे लागणार आहे. कामकाजाचे सुयोग्य नियोजन व जलद अंमलबजावणी करून अधिक कार्यक्षम , पारदर्शक, लोकाभिमुख व जबाबदार सूप्रशासन देण्यास प्रशासनातील प्रत्येक अधिकारी व कर्मचारी बांधील आहोत याची आपण जाणीव ठेवून हमी देवूया.

**- राजू नंदकर**
**९९७०२४६४१७**

# ईपीएस ९५ पेन्शनर्सचा खासदारांच्या कार्यालयासमोर बैठा सत्याग्रह

**अहमदनगर** : ईपीएस ९५ पेन्शनर्सची पेन्शनवाढ होण्यासाठी लोकसभेत प्रश्न उपस्थित करुन हा प्रश्न सोडविण्याच्या मागणीसाठी ईपीएस ९५ राष्ट्रीय संघर्ष समिती व ईपीएस ९५ पेन्शननर कल्याणकारी संघटनेच्या (महाराष्ट्र राज्य) शहरातील पॉलिटेक्निक महाविद्यालय येथील खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या कार्यालयासमोर बैठा सत्याग्रह करण्यात आला.

या आंदोलनात पेन्शनवाढ करण्याच्या मागणीच्या जोरदार घोषणा दिल्या गेल्या. तर दिवसभर चाललेल्या या सत्याग्रहात प्रवचनासह भजन-कीर्तनही रंगले होते.

या आंदोलनात ईपीएस ९५ राष्ट्रीय संघर्ष समितीचे पश्चिम भारत संघटक सुभाषराव पोखरकर, शहराध्यक्ष संजय मुनोत, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष भगवंत वाळके, महिला आघाडीच्या अध्यक्षा आशाताई शिदे, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष भगवंत वाळके, महिला आघाडीच्या अध्यक्षा आशाताई शिदे आदींसह मोठ्या संख्येने ईपीएस ९५ पेन्शनर्स सहभागी झाले होते.

या आंदोलनात भजनाचा कार्यक्रम रंगला होता. पेन्शनवर ह.भ.प.दशरथ शेलार यांनी प्रवचन केले. ईपीएस ९५ च्या पेन्शनवाढ व प्रलंबीत मागण्यांसाठी बैठकीत निर्णय न घेतल्यास श्रमशक्ती भवन येथे आंदोलन करण्याची नोटीस संघटनेच्या वतीने केंद्र सरकारला देण्यात आली होती. मात्र नियोजित आंदोलन सुरु करण्याअगोदरच ईपीएस ९५ राष्ट्रीय संघर्ष समितीच्या नेत्यांची धरपकड करून केंद्र सरकारच्या आदेशाने दिल्ली पोलिसांनी आंदोलन चिरडून टाकले. या निषेधार्थ देशातील सर्व खासदारांच्या कार्यालयासमोर सत्याग्रह सुरु असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

७० लाख औद्योगिक, सार्वजनिक, सहकार, खाजगी क्षेत्रातील सेवानिवृत्त ईपीएस ९५ पेन्शनधारकांनी आपल्या देशाच्या विकासासाठी योगदान दिले आहे. महागाईच्या काळात अत्यल्प पेन्शनमुळे त्यांना जीवन जगणे अवघड झाले असून, त्यांचे भवितव्य अंधकारमय बनले आहे. पेन्शनर्सच्या पेन्शनमधून पती-पत्नीचा वैद्यकीय खर्चदेखील भागत नसून, उदरनिर्वाहाचा प्रश्न बिकट बनला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

ईपीएस ९५ पेन्शनर्सना सन्मानाने जगण्यासाठी पेन्शन वाढ करावी, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार भेदभाव न करता सर्वांना हायर पेन्शन लागू करा, पेन्शनर्स दाम्पत्यांना मोफत वैद्यकीय सुविधा पुरवण्यात याव्यात व अन्य मागण्या पूर्ण करण्याची मागणी केली आहे.



**वैद्यकीय प्रशासकीय अधिकारी कार्यालयाच्या छत्रपती संभाजी नगर, नवीन इमारतीमध्ये स्थलांतर सोहळा श्री. वरुडकर, संचालक राजश्री जवादे तसेच मान्यवर यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी विविध मान्यवर तसेच कर्मचारी उपस्थित होते.**

# निवृत्ती जवळ आली तरी मिळेना पदोन्नती

**अहमदनगर**: राज्यातील पोलिस निरीक्षकांना उपअधीक्षकपदी पदोन्नती देण्याचा निर्णय गत डिसेंबरमध्ये झाला होता. या घटनेला सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेला. मात्र, अद्यापही पोलिस निरीक्षकांच्या पदोन्नतीचा आदेश निघालेला नाही. त्यामुळे राज्यातील १६२ पोलिस निरीक्षक पदोन्नतीच्या प्रतीक्षेत आहेत. यावर कळस असा की, यापैकी काहीजण सेवानिवृत्तदेखील झाले आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांवरून रणकंदन माजले होते. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकार पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत सावध भूमिका घेताना दिसत आहे. पोलिस शिपायांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंतच्या बदल्यांच्या फाइलींची गती मंदावली आहे. सरकारच्या या भूमिकेचा फटका राज्यातील १६२ पोलिस निरीक्षकांना बसला आहे, असे बोलले जात आहे.

# एसटी कर्मचारी वेतनाच्या प्रतीक्षेत

**मुंबई** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचारी व अधिकारी यांना दहा तारीख उलटली तरी वेतन मिळाले नाही. सरकारने १६५ कोटी रुपये निधी मंजूर केला. मात्र, हा निधी खात्यात जमा झालेला नाही, असा आरोप कर्मचारी संघटनांनी केला आहे.

महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे म्हणाले की, एसटी महामंडळाला वेतनासाठी दर महिन्याला ३६० कोटी रुपये इतक्या निधीची गरज असताना फक्त १६५ कोटी इतकी रक्कम महामंडळाला दिली जाते. तीही सवलत मूल्य रकमेतून देणे ही फसवणूक आहे. कारण वेतनाला लागणारी पूर्ण रक्कम बजेटमध्ये तरतूद करून देण्याचे आश्वासन सरकारने संप काळात दिले होते. त्याकरिता स्वतंत्र वेगळा निधी देणे गरजेचे असताना त्याचा विसर सरकारला पडला आहे, असा आरोप बरगे यांनी केला आहे.

महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेने अनियमित वेतनामुळे यापूर्वीच दावा दाखल केला आहे. न्यायालयाने ठरलेल्या तारखेस वेतन करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, तरीही वेळेवर वेतन मिळत नव्हते. त्यामुळे संघटनेने फौजदारी अवमान याचिका दाखल करण्याचा निर्णय घेऊन १६ फेब्रुवारीला दावाही दाखल केला आहे. तरीही आज १० तारीख उलटून गेली तरी वेतन मिळाले नाही. वेतन न झाल्यास आंदोलनाचा इशारा महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी दिला आहे.

एसटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासन गंभीर नाही. अनेक प्रश्न प्रलंबित असून सोडविण्यासाठीही योग्य प्रकारे कार्यवाही होत नाही. त्याचबरोबर मागण्यांची पूर्तता करण्याबाबत नेहमीच शासनाकडून चालढकल करण्यात येते. त्यामुळे कर्मचारी वर्गात असंतोष आहे. यापूर्वी झालेल्या आंदोलनाची भविष्यात पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी शासनानेच आता खबरदारी घेण्याची गरज आहे, असे मतही संघटनांच्या प्रतिनिधींनी यावेळी व्यक्त केले.

# प्रकल्प गतिमान करण्यासाठी सिडकोमध्ये मोठी पदभरती

**नवी मुंबई** : सिडकोच्या गृहप्रकल्पाची वाढलेली व्याप्ती त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प आदी प्रकल्पांचा वेगवान आणि विहित वेळेत पूर्तता आवश्यक आहे. मात्र गेल्या काही वर्षांत अनेक कर्मचारी निवृत्त झाले असून, येत्या काळातही होणार आहेत. सद्य:स्थितीत आहे त्यापेक्षा अधिक मनुष्यबळाची गरज पाहता भरती प्रक्रिया राबवली जात आहे.

सिडको महामंडळाने नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक विकास प्रकल्प राबवून नवी मुंबईच्या नागरिकांना एक उच्च जीवन शैलीची अनुभूती प्रदान केली आहे. पायाभूत सुविधांबरोबरच सामाजिक शैक्षिणक आरोग्य सुविधांच्या सुयोग्य नियोजनावर सिडकोने नेहमीच भर दिला आहे. याच अनुषंगाने सिडको महामंडळात कार्यकारी अभियंता, सहायक कार्यकारी अभियंता, सहायक परिवहन अभियंता, वरिष्ठ नियोजनकार, अर्थशास्त्रज्ञ, सहाय्यक विधी अधिकारी इ. वर्ग-१ श्रेणीतील पदांकरिता भरती प्रक्रिया राबविली जाणार आहे. सिडकोतर्फे वर्ग-१ श्रेणीतील कार्यकारी अभियंता (स्थापत्य), सहाय्यक कार्यकारी अभियंता (स्थापत्य), कार्यकारी अभियंता (विद्युत), सहाय्यक कार्यकारी अभियंता (विद्युत), सहाय्यक परिवहन अभियंता, वरिष्ठ नियोजनकार, अर्थशास्त्रज्ञ आणि सहाय्यक विधी अधिकारी अशा विविध पदांची भरती करण्यात करण्यात येत आहे. सदर भरतीसंबंधीची जाहिरात वर्तमानपत्रांध्ये प्रसिद्ध झाली असून www.cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर "Career" सेक्शन अंतर्गत विस्तृत जाहिरात, पात्रता निकष आणि अटी व शर्ती इ. माहिती उपलब्ध असून उमेदवारांनी या संकेतस्थळास भेट द्यावी असे सिडकोतर्फे कळविण्यात आले आहे.

सिडकोचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, महागृहनिर्माण योजना, नवी मुंबई मेट्रो, नैना, कॉर्पोरेट पार्क असे महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांद्वारे नवी मुंबईचे रूपांतर परिपूर्ण आंतरराष्ट्रीय शहरामध्ये करण्याबरोबरच शहरातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यावर शासनाचा भर आहे. सदर भरती प्रक्रियेमुळे या प्रकल्पांच्या कामांना अधिक गती मिळणार आहे. त्याशिवाय सिडकोतर्फे देण्यात येणाऱ्या सेवा नवी मुंबईकरांना अधिक वेगवान आणि कार्यक्षमतेने मिळतील. एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री, सिडको महामंडळापुढे हाती घेतलेले विविध प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचे आव्हान असून यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली 'सिडको' मध्ये विविध विभागातील पदांवर वर्ग-१ अधिकाऱ्यांची भरती करण्यात येत आहे. यामुळे सिडकोच्या कारभारात अधिकाधिक गती येईल आणि कामे प्रभावीपणे होऊ शकतील, त्यामुळे या भरती प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन राज्याच्या विकासाचे साक्षीदार व्हा, असे आवाहन 'सिडको'च्या वतीने करण्यात येत आहे.

## शासकीय कार्यालयात पाण्याचा अभाव

**वाशिम** : शहरातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याचा अभाव असल्याचे पहावयास मिळत आहे. विकतच्या पाण्यावरच अधिकारी व कर्मचाऱ्यांना भर द्यावा लागत आहे. नागरिकांना मात्र अडचण निर्माण होत आहे.

ढगाळ वातावरणानंतर दोन दिवसांपासून उन्हाचा चटका वाढू लागला आहे. त्यामुळे जिवाची लाहीलाही होत आहे. घसा कोरडा पडत असल्याने वारंवार पाणी पिणे आवश्यक ठरत आहे. शासकीय कार्यालयात कामानिमित्त आलेल्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने अडचणींचा सामना कराव लागत आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यालयात पाणी उपलब्ध करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# सरकारवर अवलंबून राहण्यापेक्षा उत्पन्न वाढवा; राज्य शासनाची भूमिका

**मुंबई** : एसटीने वेतनासाठी राज्य सरकारवर कायमस्वरूपी अवलंबून राहू नये. कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्चाची व प्रलंबित देणी भागवण्याची जबाबदारी एसटी महामंडळाची आहे. सध्याच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रयत्न करावे, अशा सूचना राज्य सरकारने शासन निर्णयातून दिल्या आहेत.

एसटी महामंडळाची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन किमान पुढील ४ वर्षांसाठी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, असे राज्य सरकारने संपकाळात प्रतिज्ञापत्राद्वारे उच्च न्यायालयात सांगितले होते. त्याबाबतचा शासननिर्णय १० एप्रिल रोजी काढण्यात आला.

शासन निर्णयानुसार म्हटले की, एसटी महामंडळाच्या दरमहा उत्पन्नातून वेतनासह इतर खर्च भागविण्यासाठी दर महिना जेवढ्या रकमेची तूट निर्माण होत आहे. तेवढी रक्कम महामंडळाला राज्य सरकारकडून अर्थसहाय्य म्हणून देण्यात येईल. तसेच, हे अर्थसहाय्य ३१ मार्च २०२४ पर्यंत लागू राहणार आहे. तसेच, महामंडळाच्या उत्पन्न व खर्चाचा दर तिमाही आढावा घेऊन वेतनासाठी आर्थिक सहाय्य पुढे सुरू ठेवावे किंवा कसे याबाबत निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे, पुढील ४ वर्षांपर्यंत अर्थसहाय्य सुरू राहणार की नाही, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. महामंडळास खर्च भागवण्यासाठी जितक्या रकमेची तूट निर्माण होत आहे ती भरून काढण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच, सध्याच्या उत्पन्नात वाढ करून महामंडळ स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावे, असे शासन निर्णयात म्हटले आहे. मात्र, १२,५०० कोटी रुपये एसटीचा संचित तोटा, नवीन गाड्या खरेदीची रखडलेली प्रक्रिया, एसटी टोल मुक्त करण्याचा निर्णय सरकारने घेणे आवश्यक असताना राज्य सरकार उपदेशाचे डोस पाजत आहे अशी टीका एसटी कामगार संघटनांनी केली आहे.

कामगार संघटनांचे प्रतिनिधी संदीप शिंदे आणि श्रीरंग बरगे यांनीही आपले विचार व्यक्त केले.

## भरती प्रक्रिया विलंबाने ग्रामविकासात नाराजी

**मुंबई** : ७५ हजार पदांची सरळसेवेने भरती करण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषदांमध्ये सुमारे १९ हजार पदे भरण्यात येणार आहेत. पण, ही प्रक्रिया सुरू झाली नसल्याने ग्रामविकास विभागाने नाराजी व्यक्त करीत भरतीला प्राधान्य देण्याचा आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

ग्रामविकास विभागाने राज्यातील जिल्हा परिषदांतील 'क' वर्गातील १८ हजार ९३९ पदे सरळसेवेने भरण्याचा निर्णय घेतला. भरतीचा कृती आराखडा तयार करून ग्रामविकास विभागाने भरतीसाठी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली. तसेच भरती प्रक्रिया पूर्ण करून निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द होईपर्यत एक 'हेल्पलाईन' सुरू करून त्याची माहिती उमेदवारांनी द्यावी. प्रक्रियेचा आराखडा हा कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावा, अशी मागणी होत आहे.

# पाटबंधारे कर्मचारी सहकारी पतसंस्था पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**अहमदनगर** : पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सभासदांनी मोठ्या विश्वासाने काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे त्या माध्यमातून सभासदांच्या हिताचे निर्णय घेऊन सभासदांचा विश्वास सार्थ ठरावा कर्मचाऱ्यांची पतसंस्था ही कामधेनू आहे. सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांना कर्जरूपी तातडीची मदत मिळत असते. त्या माध्यमातून सभासदाला अडीअडचणीच्या काळात मदत होत असते. याचबरोबर मुलामुलींच्या शिक्षणाचा प्रश्न तसेच लग्न समारंभासाठी मदत होत असते यासाठी सहकारी संस्थांनी भरारी घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

अहमदनगर पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार आमदार संग्राम जगताप यांनी केला यावेळी चेअरमन किशोर गांगुर्डे, व्हाईस चेअरमन दीपक वाघ, संचालक संभाजी निमसे, रवींद्र यादव, विशाल सरोदे, अमृता पोळ, अर्चना निकाळजे, संदीप शेरकर, जगदीश वाघ, संतोष जायभाय, गणेश कवडे, महेश भावसार, किशोर सांगळे, सुरेश ढोनसे, दत्तात्रेय आवारी, अशोक राशिनकर, देविदास शेटे, संदीप पवार, अरविंद वाव्हळ, तज्ञ संचालक दत्तात्रय गडाख, राजेंद्र चौबे, सुदाम गावडे, कार्यकर्ते संभाजी पवार, नगरसेवक अजिंक्य बोरकर, गणेश आनंदकर आदी उपस्थित होते.

यावेळी चेअरमन किशोर गांगुर्डे मनोगतात म्हणाले की, सभासदांच्या विश्वासाला पात्र राहून आम्ही सर्व संचालक मंडळ अहमदनगर पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे कामकाज पारदर्शक करु व सभासदांच्या हिताचे निर्णय घेऊ.

## परीक्षा प्रादेशिक भाषांमध्येही घेण्याच्या निर्णयाची प्रशंसा

**नवी दिल्ली** : केंद्रीय सशस्त्र पोलीस दलासाठी (CAPF) कॉन्स्टेबल जनरल (ड्युटी) पदासाठीच्या परीक्षा १३ प्रादेशिक भाषांमध्ये देखील घेण्याचा गृह मंत्रालयाचा निर्णय परिवर्तनात्मक असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. केंद्रीय गृहमंत्री कार्यालयाने केलेल्या ट्विटला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यानुसार सकारात्मक उत्तर दिले आहे.

# 'रोहयो' कामांवर बीडीओंचा बहिष्कार

**कळमनुरी** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची संबंधित सर्व कामे करण्यास महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित संघटनेच्या वतीने बहिष्कार टाकण्यात आला आहे. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

मजुरांच्या उपस्थितीबाबत गटविकास अधिकारी हे जबाबदार राहणार नाहीत, याबाबत शासन निर्णय निर्गमित करावे, रोहयोच्या कामाबाबत ग्रामपंचायत स्तरावरील यंत्रणांची जबाबदारी निश्चित करावी, राज्यस्तरावरून मंजूर करण्यात येत असलेल्या कामांच्या बाबतीत व मंजुरीबाबत ६०:४० चे प्रमाण राखण्याचे गटविकास अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येऊ नये, या सर्व मुद्द्यांबाबतीत संघटनेच्या बैठका दरम्यान सकारात्मक चर्चा झाली होती. याबाबतीत आपण योग्य ते शासन निर्णय निर्गमित करण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. याबाबतीत मात्र कोणताही शासन निर्णय निर्गमित झालेला नाही. रोहयोची कामे करण्याबाबत नकार देत असल्याचे निवेदन यापूर्वीच देण्यात आले होते. परंतु अद्याप पर्यंतही संघटनेच्या मागण्यांबाबत कोणताही सकारात्मक निर्णय झालेला नाही. या सर्व बाबींचा विचार करून संघटनेच्या वतीने रोहयो संबंधित सर्व कामे न करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. निवेदनावर अनुप शेगुलवार, नामदेव केंद्रे, अनंतकुमार कुंभार, गटविकास अधिकारी यू.टी.तोटावाड, जी.पी.बोथीकर, माधव कोकाटे, प्रदीप बोंढारे, डॉ. आदिनाथ आंधळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ योजना

**अकोला** : अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाची योजना फसवी असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडी प्रणीत मातंग समाज समन्वय समितीने केला. याविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. महामंडळाने एक लाख थेट कर्ज योजना अंमलात आणली. मात्र, या योजनेसाठी काढलेल्या परिपत्रकात लाभार्थ्यांना मिळणाऱ्या लाभाच्या नियमांमध्ये जाचक अटी असून, अनेक नियमांत जाचक अटी असून, अनेक नियमांत विसंगती दिसते, असा आरोप मातंग समाज समन्वय समितीचे गजानन तायडे यांनी केला. आंदोलनात गोपाल अंजरकर, गंगाधर सावळे, प्रभाकर बोरकर, हर्षल लोखंडे आदी सहभागी झाले होते.

### 'कर्मचारी टाइम्स' चे कार्यालयीन प्रतिनिधी

१. भाऊसाहेब पठाण
२. सुरेश आहेरकर
३. अशोक शिंदे
४. छाया करे
५. रिध्दी कुबल
६. गुरुदत्त वाकदेकर

## वर्गणीदारांसाठी सूचना

१. **'कर्मचारी टाइम्स'** अंकाची वर्षिक वर्गणी ३०० रुपये असून कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होऊ शकता.
२. वर्गणी मनीऑर्डर, धनादेश, डिमांड ड्राफ्ट, ऑनलाईन किंवा युपीआयद्वारे स्वीकारली जाते. कार्यालयात प्रत्यक्ष रोख रक्कम भरूनही वर्गणीदार होता येते.
३. वर्गणी भरताना सोबत स्वत:चे नाव, पत्ता सुवाच्च अक्षरात नोंद करणे, ही वर्गणीदाराची जबाबदारी आहे.
४. मनीऑर्डर स्लीप भरताना त्यावर संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहावा.
५. **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयात वर्गणी प्राप्त झाल्यानंतर उशीरात उशीरा २ महिन्यांच्या आत आपला अंक सुरु करण्यात येतो.
६. **'कर्मचारी टाइम्स'** चे सर्व अंक दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बहुधा १ तारखेलाच पोस्टात दिले जातात. तेव्हा १५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास १ तारखेपूर्वी स्थानिक टपाल कचेरीत तक्रार नोंदवून त्या तक्रार प्रतीसह **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयास कळवावे. अंक पाठविण्यात येईल. तक्रारीत वर्गणीदार क्रमांक कळविणे आवश्यक आहे.
७. एक महिना उलटून गेल्यानंतर आलेल्या तक्रारी, टपाल कचेरीत तक्रार न नोंदविता आलेल्या तक्रारी, दूरध्वनीवरील तोंडी तक्रारी यांची नोंद घेतली जाणार नाही.
८. लेखी तक्रार नोंदवूनही दखल घेतली जात नाही, वारंवार कळवूनही पत्ता बदलला जात नाही, वर्गणीची मुदत संपण्यापूर्वी अंक बंद झाला, अशा स्वरुपाच्या तक्रारी आपण संपादकांकडे अवश्य करू शकता, त्याची दखल घेतली जाईल.
९. अर्धवट पत्त्यामुळे बऱ्याच वर्गणीदारांचे अंक परत येत असतात, यापुढे सलग तीन महिने अंक परत येतील, त्यांची वर्गणी संबंधित वर्गणीदार जोपर्यंत लेखी तक्रार नोंदवून पूर्ण पत्ता कळवत नाही, तोपर्यंत स्थगित ठेवण्यात येईल.
१०. **'कर्मचारी टाइम्स'** चे अंक किरकोळ विक्रीसाठी **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयात उपलब्ध असतात, याची नोंद घ्यावी.

**संपर्क** : राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळ मजला,
मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई - ४०००३२.

**संपर्क** : ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६

**ईमेल** : karmacharitimes@gmail.com

**वेबसाईट** : www.karmacharitimes.com

## आवाहन

**'कर्मचारी टाइम्स'** मध्ये सर्व संवर्गातील शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची संबंधीची माहिती, बातम्या तसेच घडामोडी यांची माहिती प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या बातम्या, घडामोडी, लेख प्रसिद्धीसाठी पाठवावेत. जाहिरातीसाठी देखील आवाहन करण्यात येत आहे. संपर्क **संपादक : 'कर्मचारी टाइम्स', द्वारा राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळ मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२.भ्रमणध्वनी: ९८९०९१६५८८**

**ईमेल : karmacharitimes @gmail.com**

♦♦♦

# मंत्रालय क्रेडिट सोसायटीची दिवंगत सदस्य कुटुंबाला मदत

**नवी मुंबई** : मंत्रालय को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या कोकण भवन शाखेने दिवंगत शासकीय कर्मचारी कै. संजय कोळी यांच्या कुटुंबियांना २० हजार रुपयांची मदत केली.



विभागीय माहिती कार्यालयातील कर्मचारी कै. संजय नबल कोळी यांचे अल्पश: आजाराने निधन झाले होते. कै. कोळी हे मंत्रालय को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या कोकण भवन शाखेचे सभासद होते. आज कै. कोळी यांच्या पत्नी श्रीमती इंदुमती संजय कोळी आणि त्यांचा मुलगा तुषार संजय कोळी यांना कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांच्या उपस्थितीत मंत्रालय को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे पालक संचालक अजित न्यायनिरगुणे व खजिनदार सुधीर केळवणकर यांच्या हस्ते रुपये २० हजार रोख देण्यात आले.

मंत्रालय को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या ऑगस्ट २०२२ मध्ये झालेल्या संचालक मंडळाच्या निवडणूकीत एकता पॅनल निवडून आले होते. पॅनलचे उपाध्यक्ष भाऊसाहेब पठाण, सहाय्यक व्यवस्थापक अनिल भगते, चेअरमन रमेश लव्हांडे आणि सचिव शशिकांत साखरकर यांच्या संकल्पनेतून क्रेडिट सोसायटीच्या सभासदांचा आकस्मित मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना रुपये २० हजार मदत म्हणून देण्याची योजना सन २०२३ पासून राबविण्यात सुरुवात झाली आहे. नवनियुक्त पॅनलचा हा निर्णय कौतुकास्पद आहे.

मंत्रालय को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी सध्याच्या संचालक मंडळाच्या नेतृत्वाखाली अधिकाधिक लोकाभिमुख होत असल्याची ही प्रचिती आहे.

# ६४५ रोजंदारी कर्मचारी सेवेत नियमित

**नंदुरबार** : राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या १० वर्षांहून अधिक सेवा बजावलेल्या वर्ग तीन व वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांना ६ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार सेवेत नियमित करण्याचा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतला आहे.

या निर्णयांमुळे राज्यातील ६४५ कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्यात आल्याचे प्रतिपादन, राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी केले.

नंदुरबार येथे एकलव्य मॉडेल रेसिडेन्सियल स्कूल येथील प्रांगणात रोजंदारी पदावर काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्यात आल्याचे नियुक्ती आदेशाच्या वाटपाचा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खा. डॉ. हिना गावित, प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी मीनल करणवाल, माजी नगरसेवक संतोष वसईकर आदी उपस्थित होते.

नंदुरबार, नवापूर, शहादा येथील ११३ वर्ग-चार कर्मचाऱ्यांना कायम नियुक्तींचे आदेशाचे वाटप करण्यात आले. कर्मचाऱ्यांना किमान वेतनस्तरावर वेतननिश्चिती करुन लाभ मिळणार आहे. कर्मचाऱ्यांना सेवाज्येष्ठता नियमितीकरणाच्या दिनांकापासून लागू करण्यात येईल. मागील काळात वैद्यकीय शिक्षण मंत्री असताना मोठ्या प्रमाणात कंत्राटी डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले होते तर सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री असताना राज्यातील १ लाख ३५ हजार अनुशेषाची रिक्त पदे भरण्यात आली होती. ५० हजार कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आल्याचेही पालकमंत्री डॉ. गावित यांनी सांगितले. तसेच उर्वरित कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आदिवासी विकास विभागातील सर्व रिक्त पदे ऑगस्टपर्यंत भरणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## नियमबाह्य नियुक्ती रद्द करण्याची मागणी

**कोंढा - कोसरा** : पवनी तालुक्यातील आकोट येथे ग्रामस्थ ग्रामपंचायत सत्यकालीन सरपंच व सचिव यांनी कार्यालयात लिपिक व रोजगार सेवकांची नियुक्ती केली. ही नियुक्ती नियमबाह्य अवैध असल्याने रद्द करावी, अशी मागणी होत आहे.

ग्रामपंचायत आकोट येथे लिपिकाचे पद रिक्त होते. आकृतीबंधनानुसार मंजूर पदावर पदभरती करणे आवश्यक होते. पण तशी भरती न करता सरपंच व सचिव यांनी कमलेश विनोद लांजेवार यांची लिपिक पदावर अवैध्यरीत्या ६ ऑक्टोबर २०२२ ला नियुक्ती केली. नियुक्ती करताना ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत विषय न घेता अध्यक्षांच्या परवानगीने ठराव घेतला. तसेच यासाठी कोणत्याही प्रकारची जाहिरातही दिली नाही.

## शिक्षकांना वाढीव पगार मिळाला का?

**गोंदिया** : सध्या शाळा, पालक, विद्यार्थी आणि शिक्षकही आधार व्हॅलिडेशनमुळे त्रस्त आहेत. आधार व्हॅलिडेशन नसल्यामुळे शिक्षण विभागाने शाळांना संचमान्यता नसल्यामुळे शिक्षकांची पदे मंजूर नसल्यामुळे वाढीव अनुदानाचा टप्पा शाळांना मिळालेला नाही. ज्या शाळा २० टक्क्यांवरून ४० टक्क्यांवर गेल्या आहेत. ज्या ४० वरून ६० वर गेल्या आहेत किंवा ज्या नव्याने २० टक्क्यांवर आल्या आहेत अशा १४७ शाळांतील २०६ शिक्षकांना वाढीव वेतन मिळणार आहे. शासनाने ३० एप्रिलपर्यंत आधार व्हॅलिडेशन करण्यासाठी अंतिम मुदत दिली आहे. विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड आहेत; पण ते अपडेट नसल्याने आधार अपडेट करण्यासाठी पालकांची चांगलीच धावपळ होत आहे. बहुतांश शालेय विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड आहे; पण ते अपडेट नाहीत. पालकांच्या व्हॉट्सअॅपवर आधार अपडेट नसल्याची यादी टाकण्यात येत आहे.

राज्य सरकारकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर विभागाने संबंधित शाळांना आधार अपडेट करण्यासंदर्भात सूचित केले आहे. ३० एप्रिलपर्यंत विद्यार्थ्यांचे आधार व्हॅलिडेशन होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना आधारमुळे प्रवेशापासून वंचित ठेवता येणार नाही, असा निर्णय न्यायालयाने दिला आहे; परंतु शालेय शिक्षण विभागाने आधार नोंदणीनुसारच संचमान्यता दिली जाईल, असे जाहीर केले आहे. मात्र, यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिल्यास आणि शिक्षण अतिरिक्त झाल्यास आधारवरील संचमान्यतेला न्यायालयात आव्हान देण्याचा निर्णय संघटना घेत आहे.

## तहसीलदारांच्या बदल्यांची तक्रार

**पुणे** : कोरोना महामारीमुळे लांबलेल्या तहसीलदारांच्या बदल्यांना अखेर मुहूर्त मिळाला. महसूल विभागाने मुदत पूर्ण झालेल्या पुणे विभागातील जवळपास २२ तहसीलदारांच्या बदल्या केल्या आहेत.

आंबेगावचे तहसीलदार रमा जोशी यांची थेट अमरावतीत बदली करण्यात आली आहे. शिवसेनेचे नेते आणि शिंदे गटाचे आंबेगांव तालुकाप्रमुख अरूण गिरे यांनी मुख्यमंत्र्यांकडे जोशी यांच्या कारभाराविरोधात नाराजी व्यक्त केली होती. तहसीलदार जोशी यांच्या बदलीची गळदेखील घालण्यात आली होती. त्यानुसार रमा जोशी यांना अशी पोस्टिंग देण्यात आल्याची तसेच इतरही त्या अनुषंगाने तालुक्याच्या वर्तुळात दबक्या आवाजात चर्चा ऐकायला मिळत आहेत.

## कोकणात शिक्षकांची पाच हजार पदे रिक्त
# भरती जाहीर झाली तरी प्रक्रिया संथगतीने

**गुहागर** : एका बाजूला नवीन शैक्षणिक धोरण जून २०२४ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे; तर दुसऱ्या बाजूला शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील शिक्षणाचा प्रश्न जटिल झाला आहे.

दरम्यान या परिस्थितीनंतर ही भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली खरी, मात्र ही लांबलेली आणि वेळखाऊ प्रक्रिया पाहता जूनमध्येही शिक्षक मिळण्याची आशा मंदावली आहे. कोकणात जवळपास ५ हजार शिक्षकांची पदे रिक्त आहेत. हे शिक्षक न मिळाल्यास ग्रामीण भागातील शाळा पुन्हा एकदा अपुऱ्या शिक्षकांवर सुरू होतील, अशी स्थिती आहे.

कोकणातील पाच जिल्ह्यांत शिक्षकांनी जवळपास ५ हजार पदे रिक्त आहेत. सर्वाधिक रिक्त पदे पालघर जिल्ह्यात असून ती १९५० एवढी आहेत. तर त्या खालोखाल रायगड मध्ये ११२५ शिक्षकांची पदे रिक्त आहेत. रत्नागिरीत ९४०, तर सिंधुदुर्गात ६०२ एवढी पदे रिक्त आहेत. अता शिक्षक भरती प्रक्रियाही केंद्रीय पद्धतीने होणार असल्याने ही भरती प्रक्रिया जटिल झाली आहे. टीईटी परीक्षेतील घोटाळ्यामुळे भरती प्रक्रियेत निवड झालेल्या ७०० शिक्षकांची पदे रद्द झाली.

मात्र, यात कोकणातील शिक्षकांचे प्रमाण कमी असले तरी रद्द झालेल्या शिक्षकांमुळे रिक्त पदांची संख्या वाढली आहे. शासनाने शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टल तयार केले आहे. या पोर्टलवर गुणवत्ता यादी प्रसिद्ध करून शिक्षक निवड प्रक्रिया होईल. त्यानंतर जिल्हा परिषदांमध्ये तोंडी परीक्षा होतील. त्यानंतर ही भरती प्रक्रिया होईल. मात्र, ही प्रक्रिया व्हायला चार ते पाच महिन्याचा कालावधी लागणार असल्याने पुढील शैक्षणिक वर्षातही योग्य आणि पुरेशा प्रमाणामध्ये शिक्षक मिळणे अत्यंत अवघड झाले आहे.

ग्रामीण भागात बदली झालेले शिक्षक रूजू होण्यास तयार नसतात. त्यामुळे अनेकदा शिक्षकांची पदे रिक्ते राहतात. त्याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर होत आहे. प्राथमिक विभागाबरोबर माध्यमिक विभागातही अनेक पदे रिक्त आहेत.

ही पदे, भरण्याची प्रक्रियाही किचकट करण्यात आल्याने ही प्रक्रिया पुढे सरकलेली नाही. त्यामुळे भरती जाहीर झाली, तरी शिक्षक कधी मिळणार याचा थांगपत्ता अद्याप कोणाला निश्चितपणे सांगता येत नाही.

नवीन शैक्षणिक धोरणांमध्ये आता क्रेडिट सिस्टम लागू होणार आहे. यामध्ये १२०० शैक्षणिक तासांसाठी ४० क्रेडिट दिले जाणार आहे. ८०० तासांना २७ क्रेडिट, तर १००० तासांसाठी ३३ क्रेडिट दिले जाणार आहेत. मात्र नवे शिक्षण धोरण राबविण्यासाठी आवश्यक असलेल शिक्षकच मिळाले नाही, तर विद्यार्थ्यांची पाटी कोरी राहण्याची भिती आहे.

दरम्यान, राज्यात शिक्षकांची कमतरता असून त्यांची लवकरात लवकर भरती करण्यात यावी. आता नवे शैक्षणिक वर्षदेखील सुरु होत असून ही भरती वेळेत होण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासकीय स्तरावरून लवकरात लवकर कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# कर्मचाऱ्यांच्या जिल्ह्यांतर्गत बदल्या होणार का?

**गोंदिया** : जिल्हा परिषद सर्व समग्र शिक्षा अभियानात तालुकास्तरावर व डायट अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्याही प्रशासकीय बदल्या करण्याबाबत जिल्हा परिषदेने सन २०१९ मध्ये मार्गदर्शन मागितले होते. त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (मुंबई) कडून स्पष्ट निर्देश देत जिल्हांतर्गत प्रशासकीय बदल्या शक्यतो एप्रिल व मे महिन्यांत कराव्या व ते संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाच आहेत, असे म्हटले होते. परंतु मागील चार वर्षापासून या मार्गदर्शन पत्रावर जिल्हा परिषदेने अंमलबजावणी केली नाही. परिणामी, मागील १२ ते १५ वर्षापासून एकाच तालुक्यात बहुतांश लोक आहेत.

लेखापाल, डाटा एन्ट्री ऑपरेटर, विषयतज्ज्ञ, विषय साधनव्यक्ती, समन्वयक, अपंग समावेशीत तज्ज्ञ यांच्या प्रशासकीय बदल्या यावर्षी करण्याची मागणी होत आहे. दरवर्षी देवरी, सालकसा, आमगाव, अर्जुनी-मोरगाव, सडक-अर्जुनी या तालुक्यांत कार्यरत कर्मचारी जिल्हा परिषदेला बदलीबाबत निवेदन देतात. परंतु गोंदिया, गोरेगाव, तिरोडा, या साधारण क्षेत्रात कार्यरत कर्मचारी स्थानिक राजकीय नेते मंडळीकडे जाऊन जिल्हा परिषदेवर बदल्या न करण्याबाबत दबाव आणतात, त्यामुळे मागील चार वर्षांपासून जिल्हांतर्गत बदल्या थांबल्या आहेत. मागील चार वर्षांपासून जिल्हांतर्गत बदल्या करण्याबाबत जिल्हा परिषदेने कार्यवाही करण्यास डायटकडे पत्रव्यवहार केला होता. परंतु ज्या कर्मचाऱ्यांना बदल्याच नकोत त्यांनी प्राचार्यांना निवेदन सादर करून कार्यवाही न करण्यास भाग पाडले. त्यामुळे डायटकडून बदल्यांबाबत कार्यवाही करण्यात आले नाही.

## अचलपूरची फिन्ले मिल्स लवकरच सुरू

**अमरावती** : अचलपूर येथील फिन्ले मिल्स हा ग्रामीण भागातील उद्योग असून अनेक कामगार येथे काम करत होते. कोव्हिड काळातील अडचणीमुळे मील बंद झाल्याने अनेकांच्या रोजगारांचा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे ही मिल सुरू करणे आवश्यक आहे. यासंदर्भात केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री यांच्याशी चर्चा करून राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

वस्त्रोद्योग मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती जिल्ह्यातील अचलपूर येथील फिन्ले मिल्स सुरू करण्याबाबत मंत्रालयात बैठक झाली. यावेळी आमदार ओमप्रकाश (बच्चू) कडू, वस्त्रोद्योग विभागाचे सचिव विरेंद्रसिंग, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाचे (नवी दिल्ली) अध्यक्ष व सरव्यवस्थापकीय संचालक आशुतोष गुप्ता उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले की, मिल सुरू होईपर्यंत अर्धवेतन देण्यासंदर्भात उपाययोजना करणे आवश्यक आहे. यावर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल.

## केंद्रीय पद्धतीनेच शिक्षक भरती करा, अन्यथा आंदोलन

**गडचिरोली** : महाराष्ट्र शासनाने सन २००५ मध्ये डीटीएड कॉलेजची खैरात वाटली, त्यानंतर २०११ मध्ये विद्यार्थ्यांची पट पडताळणी घेण्यात आली, त्या पट पडताळणीमध्ये एकच विद्यार्थी अनेक शाळेत शिकत होता हे निष्पन्न झाले. त्यामुळे प्राथमिक शाळेतील शिक्षक अतिरिक्त झाले, आणि या अतिरिक्त शिक्षकांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी राज्यात समायोजन प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानंतर कोरोनामुळे शिक्षक भरतीवर बंदी आली.

३ मार्च २०२३ रोजी महाराष्ट्र शिक्षक परिषद अंतर्गत टेट परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचा निकारल २४ मार्च २०२३ रोजी लागला. आता पवित्र पोर्टलवर शिक्षक भरती होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र शासनाच्या शासकीय व खाजगी संस्थांमध्ये शिक्षकांच्या जवळपास ३४ हजार जागा रिक्त आहेत. या रिक्त जागा केंद्रीय पध्द्धतीने भराव्यात, अशी मागणी डीटीएडधारक बेरोजगार संघटनेचे गडचिरोली कार्यकारी जिल्हाध्यक्ष राकेश धोटे यांनी केली आहे.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षक भरती हीच शासनाने विभागीय पद्धतीने केले तर बऱ्याच गरीब विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. त्यातून नैराश्य आणि बेरोजगारी वाढेल. बऱ्याच मुलांचे वय वाढलेले असल्याचे अशी मुले सदर शिक्षक भरती शेवटची भरती समजून कटाक्षाने लक्ष देत आहेत, असे धोटे यांनी म्हटले आहे.

## वसई तहसीदारपदी अविनाश कोष्टी

**वसई** : वसई तहसीलदारपदी आता अविनाश कोष्टी यांची वर्णी लागली आहे. कोष्टी हे कुर्ला ३-घाटकोपर येथे तहसीलदार म्हणून नियुक्त होते. आता त्यांनी वसईची सूत्रे हाती घेतली आहेत.

कोष्टी यांनी यापूर्वी वसईत नायाब तहसीलदार म्हणून २००७ ते २००९ पर्यंत पदभार सांभाळलेला होता. त्यामुळे वसईची चांगली माहिती असलेले अधिकारी अशी त्यांची छबी आहे. प्रशासकीय कर्मचारी, अधिकारी, राजकीय प्रतिनिधी, नागरिक यांनी निर्णयाचे स्वागत केले आहे.

## यशवंत पंचायतराजमध्ये मिनी मंत्रालय अव्वल

**वर्धा** : प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्तम काम करणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कार योजनेंतर्गत पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या पुरस्कार योजनेत मूल्यमापन वर्ष २०२१-२२ मध्ये वर्धा जिल्हा परिषद, नागपूर विभागात अव्वल ठरली.

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात पंचायतराज संस्थेचे योगदान मोठे आहे. राज्यातील विकासाच्या सर्व योजना पंचायतराज संस्थांमार्फत राबविल्या जातात. या संस्थांच्या कामागिरीनुसार त्यांना प्रोत्साहित करून त्यांची कार्यसंस्कृती वाढविणे आवश्यक आहे. यासाठी राज्यात पंचायतराज संस्थांमधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांसाठी विभाग व राज्य अशा दोन्ही स्तरावर यशवंत पंचायतराज अभियान ही पुरस्कार योजना सुरू करण्यात आली आहे. त्याच्या माध्यमातून अधिकाधिक पंचायतींमध्ये गुणवत्ता व विकास वाढीस लागला पाहिजे, असा उद्देश्य असून त्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. ग्रामीण विकास क्षेत्रात यशवंत पंचायतराज हा सर्वसमावेशक पुरस्कार असल्याने अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. शाश्वत विकास ध्येयांचे निकष व राष्ट्रीय पंचायत पुरस्कारअंतर्गत जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी केलेली प्रगती विचारात घेऊन यशवंत पंचायत राज अभियान सन २०२२-२३ (मूल्यमापन वर्ष २०२१-२२) राबविण्यात आले होते.

यामध्ये जिल्हा परिषद व जिल्ह्यातील पंचायत समित्या यांनी सहभाग घेतला होता. या उपक्रमात पं.स. व जि.प.ने वर्षभर राबविलेल्या शासनाच्या योजनांवर आधारित मूल्यमापन केले गेले.

## अधिकारी- कर्मचारी भेटतात कुठे?

**नाशिक** : शहराची काळजी वाहणाऱ्या नाशिक महापालिकेतील कर्मचारी, अधिकाऱ्यांनी कर्तव्य बजावताना वक्तशीरपणा पाळावा, यासाठी मुख्यालयात बोयोमेट्रिक हजेरी यंत्र बसविण्यात आले असले तरी, या यंत्राने घेतलेल्या बऱ्या, वाईट नोंदींची दखल घेऊन पुढील कार्यवाहीबाबत प्रशासनात अनभिज्ञता आहे. त्यामुळे हजेरी तर हजेरी नाही तर सेल्फीचा पर्याय निवडून अनेक कामचुकारांनी त्यातून मार्ग काढल्याने उघडकीस आले आहे.

महापालिकेच्या सेवेत असलेल्या सुमारे साडेचार हजारांहून अधिक कर्मचारी व अधिकाऱ्यांकडे वेगवेगळ्या कामांची, पदांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यासाठी स्वतंत्र आस्थापनांचे असून, जवळपास १७१ आस्थापनांचे दरमहा नियमित वेतन अदा केले जाते. अर्थातच त्यांच्या वेतनाचे व कामाचे मूल्यमापन करण्याची यंत्रणा महापालिकेत कार्यान्वित करण्यात आली आहे. मुख्यालयात टेबलावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी सक्तीची करण्यात आली आह. तर फिल्डवर असलेल्यांसाठी सेल्फीचा पर्याय खुला आहे.

## मीरा-भाईंदर अप्पर तहसीलदारपदी निलेश गौड

**भाईंदर** : मीरा-भाईंदर अप्पर तहसीलदारपदी निलेश गौड यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारत कामकाज चालू केले आहे. तर मीरा-भाईंदरमधील बदली झालेले अप्पर तहसीलदार नंदकिशोर देशमुख यांना प्रतीक्षाधीन ठेवले आहे.

अतिक्रमणे, इको सेंसिटिव झोन व मॅनग्रोव्ह, सीआरझेड परिसरात माती भराव-बांधकामे, उत्खननाच्या चुकीच्या परवानग्या अशी अनेक आव्हाने या विभागात असून त्या सोडविणे गरजेचे आहे, असे नागरिकांचे मत आहे.

# कठोर परिश्रमातून कल्याण परिमंडळाची कामगिरी अव्वल

**कल्याण** : नकारात्मक परिस्थितीचा यशस्वीपणे सामना करत सर्वच घटकांना केलेल्या कठोर परिश्रमातून कल्याण परिमंडळाला राज्यात अव्वल स्थान गाठता आले. वसूली कार्यक्षमतेत आघाडी, वीज गळतीत घट, कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित, ग्राहकांकडून थकबाकी वसूली तसेच इतर निकषांमध्ये कल्याण परिमंडळाने मोलाची कामगिरी बजावली. चालू आर्थिक वर्षात ही कामगिरी उंचावताना नवीन आव्हानांचा वेध घेण्याचे आवाहन कल्याण प्रादेशिक विभागाचे सह-व्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे यांनी कल्याण परिमंडळातील अधिकारी, अभियंते, कर्मचारी व जनमित्रांना या विषयावर बोलताना केले.

गेल्या आर्थिक वर्षातील कामगिरीचा आढावा व चालू आर्थिक वर्षातील आव्हाने या संदर्भात कल्याण परिमंडळच्या प्रांगणात आयोजित केलेल्या कार्यक्रमांत ते बोलत होते. मुख्य अभियंता धनंजय औंढेकर, अधीक्षक अभियंते दीपक पाटील, दिलीप भोळे आणि राजेशसिंग चव्हाण यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. सहव्यवस्थापकीय संचालक श्री. डांगे म्हणाले, वसूली कार्यक्षमता १०३ टक्क्यांच्या घरात पोहचवणे हे वर्षभर व सातत्याने घेतलेल्या कठोर मेहनतीचा परिपाक आहे. त्यामुळेच गतवर्षीच्या तुलनेत यंदा मार्च अखेर परिमंडळाच्या थकबाकीत उल्लेखनीय घट झाल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्य अभियंता औंढेकर यांनी गत आर्थिक वर्षातील कामगिरीचा आढावा घेत योगदान देणाऱ्या सर्वांचे कौतुक केले. विशेषत: वीजचोरांविरूध्द व्यापक व पथदर्शी कारवायांचा त्यांनी गौरव केला. वीज गळती १२ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे आव्हान पेलण्यासाठी सज्ज राहण्याच्या सूचना देतानाच तत्पर ग्राहक सेवेत कोठेही कमी पडणार नाही, याची दक्षता बाळगण्याची सूचना त्यांनी कर्मचारी व अधिकाऱ्यांना केली.

यावेळी उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, कार्यकारी अभियंता (प्रशासन) अनिल महाजन, वरिष्ठ क्षेत्रीय कार्यालयातील सर्व कार्यकारी अभियंते उपविभागीय अभियंते, सहायक व कनिष्ठ अभियंते, जनमित्र, कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता स्मिता काळे यांनी केले. तर अधीक्षक अभियंता भोळे यांनी आभार मानले. गतवर्षीच्या कामगिरीत वसूली कार्यक्षमता व उद्दिष्टपूर्तीच्या निकषांवर कल्याण एक मंडळ कार्यालय, डोंबिवली, कल्याण पश्चिम व उल्हासनगर दोन ही तीन विभागीय कार्यालये, प्रत्येक मंडलातील पहिले पाच उपविभागीय कार्यालये व १० शाखा कार्यालयांचा विशेष गौरव करण्यात आला.

## आरोग्य विभागाच्या पद भरतीमध्ये कुठलाही गैरप्रकार झाल्यास कारवाई : प्रकाश निकम

**पालघर** : वृत्तमत्रांमध्ये प्रसिद्ध होत असलेल्या वृत्तांच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रिये दरम्यान गैरव्यवहार झाला असल्यास संबंधितांवर त्वरित कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी सांगितले.

आरोग्य विभागामध्ये ५०० कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदे मंजूर होऊन आली आहेत. याचे मी स्वागत करतो. जिल्हात मदतच होईल. मात्र ही भरती करताना, ज्या उमेदवारांकडे पैशाची मागणी केली असेल त्या उमेदवाराने निनावी पत्र किंवा फोन केला तरीदेखील संबंधित अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येऊन ठेकेदाराचा ठेका रद्द केला जाईल, असेही प्रकाश निकम यांनी याबाबत बोलताना सांगितले.

# जागतिक कामगार दिनाच्या निमित्ताने...

## एकत्रित येणारे कामगार आणि महाराष्ट्र दिन

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ६० वर्षे पूर्ण झाली. एखाद्या राज्याच्या वर्धापन दिन या पलिकडे या दिवसाचे काय महत्त्व आहे? असा प्रश्न कोणी विचारला तर तो गैर म्हणता येणार नाही. पण त्याचे खरे उत्तर असे आहे की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा वर्धापन दिन हा एका तत्त्वनिष्ठ लोकशाही चळवळीचा गौरव आहे. हे राज्य मराठी आहे म्हणून नव्हे, तर हे राज्य ज्या वैचारिक-राजकीय प्रक्रियेतून निर्माण झाले, ती आजच्या समस्यांसाठी महत्वाची आहे म्हणूनच.

१९५० मध्ये प्रगतीशील लोकशाही राज्याची प्रतिज्ञा या देशाने भारतीय घटनेच्या रूपाने घेतली. त्याच सूत्राला धरून, मराठी भाषिकांचे राज्य स्थापन करण्याची मागणी घेऊन १९५० ते १९६० च्या दरम्यान चळवळ झाली, तिचा आधार फक्त भाषिक विभाजनाचा नव्हता, तर लोकभाषेच्या आधारावर देशाचे राजकीय व्यवस्थापन करण्याचा, म्हणजे खऱ्या अर्थाने लोकशाही राज्याचा होता. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे नेतृत्व डाव्या कामगार-शेतकरी नेत्यांकडे होते, हा केवळ योगायोग नाही. समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र हा सर्व जनतेचा ध्येयवाद होता. ती त्यांची स्वातंत्र्य चळवळीतून आलेली आकांक्षा होती.

ते राज्य निर्माण करण्यासाठी भाषावार प्रांतरचना निर्माण होणे आवश्यक होते. शिवाय ते तत्त्व फक्त महाराष्ट्रासाठी नव्हते. गुजरात, पंजाबी सुभा, आंध्र, तेलंगणा, मद्रास-तामिळनाडू या साऱ्यांसाठी एकच सूत्र होते. मराठीपणाच्या नावाने दंगे पेटविणारा द्वेष त्या आंदोलनात नव्हता की विधानसभेत गदारोळ आणि परीक्षा केंद्रांवर हल्ले करण्याची बौद्धिक दिवाळखोरी नव्हती. राजकारणामधील एखादी सुपारी नव्हती की स्पर्धात्मक बोली नव्हती. म्हणूनच या मराठी राज्याची लोकशाही मागणी जेव्हा प्रत्यक्षात आणायची तो मूहूर्त जागतिक कामगार दिनाचा ठरविण्यात आला. म्हणूनच १ मे, महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन हे एकाच दिवशी येतात. हा काहींना केवळ एक योगायोग आहे, असे वाटते. कारण त्या कोणालाच याची आठवण नाही की, मुंबईसह आजच्या महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी या राज्यातील कामगार-शेतकरी वर्गाने डावे पक्ष, डावे विचारवंत, साहित्यिक आणि नेते यांच्या नेतृत्वाखाली चळवळ केली होती. त्यासाठी लढा करताना १०६ कार्यकर्त्यांनी प्राणार्पण केले. त्यांचे नेतृत्व करणारे कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, साथी एस्. एम्. जोशी, कॉम्रेड मिरजकर, क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील, दादासाहेब गायकवाड, आचार्य अत्रे यांसारखे दिग्गज नेत्यांनी हे कामगार-शेतकरी वर्गाची ध्वजा हातात घेतली होती.

त्यांच्यासमवेत त्या मराठी राज्याची नाद सह्याद्री आणि सातपुड्याच्या डोंगरकपाऱ्यांमध्ये घुमवून महाराष्ट्राच्या शरीरावर रोमांच उभे करणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि अमर शेख हे त्याच लाल राजकीय मातीचे पुत्र होते. कामगार चळवळ त्यांच्या रक्तामध्ये होती. तीच त्यांच्या जीभेवरून बोलत होती. मुंबईसह मराठी भाषिकांचे राज्य आणि कामगार-शेतकऱ्यांच्या राज्याचे स्वप्न हे या सर्वांच्या विचारांमध्ये दुधामध्ये साखर मिसळावी त्या रितीने त्यांच्या विचारांमध्ये एकजीव झालेले होते.

खरंतर संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ही कामगार-शेतकऱ्यांच्या चळवळीमधून झालेली आहे. किंबहुना कामगार चळवळ आणि महाराष्ट्राची निर्मिती हे वेगळे करताच येणार नाहीत, इतके त्यांच्यामध्ये एकत्व आहे केवळ गतवैभवाच्या गोष्टी काढण्यासाठी नाही, तर त्यातून वर्तमानातील काही राजकीय समस्यांना सामोरे जाण्यासाठी निश्चित सूत्रे मिळू शकतात.

मुळात संयुक्त महाराष्ट्रासाठी लढा करावा लागला त्याचे कारण मुंबई. मुंबईचा महाराष्ट्रामध्ये समावेश करण्यावरून खरा संघर्ष निर्माण झाला. त्याचे कारण मुंबई ही राज्याचीच नव्हे, तर देशाची आर्थिक राजधानी होती. मालक वर्ग अमराठी होता, तर कामगार मात्र प्रामुख्याने मराठी भाषिक होते. केवळ मुंबईमधील मूठभर भांडवलदारांनी मुंबई महाराष्ट्राला मिळू नये यासाठी आकाश पाताळ एक केले. त्याला केंद्र सरकार आणि त्यावेळचा काँग्रेस पक्ष बळी पडला आणि त्यातून हे सर्व संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे मंथन झाले.

देशामध्ये भाषावर प्रांतरचना निर्माण करण्याचा ठराव काँग्रेसने तसे म्हंटले तर, १९२० सालीच केलेला होता. अगदी बाळ गंगाधर टिळकांनीदेखील १८९३ साली अशाच प्रकारची कल्पना, एकूण



भारताच्या संदर्भात मांडलेली होती. त्यावेळी ब्रिटीशांनी निर्माण केलेली प्रांतरचना अत्यंत अशास्त्रीय आणि लोकाशाहीविरोधी होती. कारण त्यामध्ये भाषा, प्रादेशिक संस्कृती, जनता आणि सरकार यातील अंतर, कारभाराचा सोपेपणा या कशाचाही विचार केला गेलेला नव्हता. कारण त्यांचा उद्देशच मुळी लोकशाही विरोधी आणि जनतेला भाषिक-राष्ट्रीय-सांस्कृतिक मुद्यांपासून दूर ठेवणे हा होता. त्यामुळे शक्यतो प्रातांच्या नावापासूनच ही काळजी घेण्यात आलेली होती. जसे मद्रास प्रांत, मुंबई प्रांत, पंजाब आणि सिंध, इत्यादी.

१९२६ मध्ये काँग्रेसची संघटनात्मक पुनर्रचना केली गेली. त्यावेळी अशा लोकशाही विरोधी विचित्र प्रांतरचनेचा आधार नाकारण्यात आला. काँग्रेसची संघटना भाषावार उभी करण्याचा आदेश महात्मा गांधीनी दिला आणि एकमताने तो प्रत्यक्षात आणला गेला. १९२८ मध्ये मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील समितीने भविष्यातील भारताच्या घटनेचे प्रारूप बनविले त्यातदेखील भाषावार प्रांतरचना हाच आधार धरला होता.

सर्व मराठी भाषिकांचा एक असा संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याची मागणी आणि संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना १९४६ मध्येच झाली होती. अशाच मागण्या पंजाबी मल्याळी, तेलुगु, कन्नड, इत्यादी भाषिकांकडून येत होत्या. १९५२ मध्ये तेलुगू भाषिक आंध्र प्रदेशाच्या मागणीसाठी प्रचंड चळवळ झाली. आमरण उपोषणामध्ये श्रीरामलू यांचा मृत्यू झाला. त्यानंतर स्वतंत्र आंध्राच्या मागणीला नेहरू यांना मान्यता द्यावी लागली. त्याच धर्तीवर मराठी महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी चळवळीला जोर येणे अपरिहार्यच होते. १९५३ मध्ये आंध्र प्रदेश मद्रास राज्यातून वेगळा काढून तेलगू भाषिकांसाठी स्वातंत्र राज्य निर्माण करण्यात आले. राज्य पुनर्निर्माण आयोगीची नेमणूक १९५३ करण्यात आली. १९५५ मध्ये त्यांच्या अहवालातून आयोगाने देशात १४ राज्यांची निर्मिती भाषेच्या आधारावर एक भाषी राज्ये म्हणून करावीत अशी शिफारस केली. अपवाद केला फक्त महाराष्ट्र, गुजरात आणि पंजाबचा.

मराठी भाषिकांसाठी महाराष्ट्र आणि गुजराती भाषिकांसाठी गुजरात ही अत्यंत साधी स्वच्छ मागणी मान्य करताना आयोगाने सर्व तत्त्वे पायदळी तुडविली. महाराष्ट्र हा शब्दच त्यांनी भाषावार प्रांतरचनेतून बाद केला. त्यासाठी एका बाजूला विदर्भाच्या नावाखाली महाराष्ट्र तोडला. आणि केवळ मुंबई मराठी भाषिकांच्या राज्याला मिळू नये यासाठी उर्वरित महाराष्ट्र गुजरातला जोडला. म्हणजेच विदर्भ ह्या मराठी भाषिक विभागाचे वेगळे राज्य करण्याची शिफारस केली. तर मुंबई-मराठवाडा-पश्चिम महाराष्ट्र-सौराष्ट्र-कच्छ इत्यादी गुजराती भाषिकांचे मुंबई महाभाषिक राज्य करण्याची विपरित शिफारस केली. दुसऱ्या बाजूस गुजरातला जोडला.

महाराष्ट्राचा प्रश्न हा अधिक जटील बनला होता, मुख्यत: मुंबईच्या मुद्यावर. त्याचे कारण त्याच्या मुळाशी अगदी उघड असा आर्थिक-राजकीय वर्गीय मुद्दा होता. शिवाय वर्गसंघर्ष होता. कारण मुंबई देशाचे आर्थिक केंद्र होते आणि आजदेखील आहे. त्यावर वरचष्मा बड्या मिलमालकांचा, भांडवलदार पेढीवाले, सट्टेबाज व्यापारी, बडे आयात-निर्यातदार यांचा होता. पण त्यांची संख्या अत्यंत मर्यादित होती. त्यांना लोकशाहीची भाषा करणाऱ्या वर्गजागृत कामगार शेतकऱ्यांच्या म्हणजेच बहुसंख्य मराठी भाषिकांच्या राज्याचा भाग व्हायचे नव्हते. म्हणूनच मुंबईच्या प्रश्नावर झालेल्या विराट चळवळीचा पाया केवळ भाषिक नव्हता,तर वर्गीय होता. मुंबईतील बड्या भांडवलदार मंडळींना मराठी राज्यापेक्षा केंद्रशासित किंवा स्वतंत्रच राहणे पसंत होते.त्यामध्ये पुरूषोत्तम ठाकूरदास यांच्या नेतृत्वाखालील बॉम्बे सिटीझन्स कमिटी होती. गिरणीमालकांनी, स.का. पाटील, मोरारजी देसाई यांच्यासारख्या काँग्रेसी नेत्यांनी, मुंबई ही महाराष्ट्राला जोडता कामा नये, असे अतिशय आग्रहाने मांडले होते. मुख्यत गिरणी कामगार, छोटे व्यापारी, हमाल आणि काही प्रमाणात तृतीय श्रेणी कर्मचारी किंवा शिक्षक, मध्यमवर्गीय हे बहुसंख्येने मराठी होते. शिवाय यातील बहुसंख्य सर्व डाव्यांच्या नेतृत्वाखाली प्रत्यक्ष कामगार संघटनांमध्ये होतो.

स्वातंत्र्य चळवळीमध्ये १९२० पर्यंत टिळक, गोखले यांच्यासारख्या मराठी नेत्यांचे, तर सामाजिक मुक्तीच्या चळवळीत तर देशात महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचेच निर्विवाद नेतृत्व होते. १९२२ नंतर महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली लढा जास्त व्यापक आणि सार्वत्रिक झालेला असला, तरी त्यामध्ये मराठी कामगार आणि शेतकऱ्यांचा जो उत्साह आणि सहभाग होता, त्याची तुलना फक्त बंगालशीच होऊ शकत होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही सर्व उर्जा संयुक्त महारष्ट्राच्या मागणीसाठी पुन्हा रस्त्यावर आली होती. भांडवलदारांच्या विचारा-मागील प्रमुख कारण असे होते की, मराठी भाषिक राज्यातील मुंबईमध्ये सरकारवर भांडवलदारांपेक्षा कामगार-शेतकऱ्यांचा, समाजवादी विचारांचाच जास्त प्रभाव राहील, अशी त्यांची अटकळ होती. कारण त्या लढ्याचे नेते होते, श्रीपाद डांगे, एस्.एम्.जोशी, आचार्य अत्रे तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि अमर शेख. हे सर्व एक तर कम्युनिस्ट किंवा समाजवादी किंवा प्रखर लोकशाहीवादी. त्यांचे जनतेला आवाहन केवळ मराठी भाषिकांच्या राज्याचे नव्हते. नवा महाराष्ट्र समाजवादी असेल, असे ते काहीसे स्वप्र स्वरूपात मांडत होते. संयुक्त महाराष्ट्रासाठी लढा उभारला केला तो कामगारांनी आणि शेतकऱ्यांनीच.

**- अजित अभ्यंकर**

# कामगार चळवळीची कोंडी

वेगवेगळ्या माध्यमातून कामगार अथवा कर्मचारी हा नेहमीच भरडला जात असल्याची उदाहरणे आपल्याला जगभरातील वेगवेगळ्या आस्थापनांमधून, अनेक उद्योगांमध्ये परिस्थिती कमी अधिक फरकाने सारखीच असल्याचे दिसून येते. अशावेळी झालेली कामगार वर्गाची अथवा कामगार चळवळीची कोंडी फक्त परिस्थितीने केलेली नाही, तर कामगारांचा विचार, त्या त्या उद्योगाच्या पातळीवर, एक वर्ग म्हणून करण्याच्या निश्चित केलेल्या मूळ दृष्टिकोनाला तिलांजली दिल्यामुळेच झालेली आहे. हे मात्र उद्योजक अथवा भांडवलदार सातत्याने दुर्लक्षित करत असल्याचे जाणवते. त्यातूनच मग कामगारांच्या अनेक प्रश्नांची निर्मिती होत असते.

कोणतीही चळवळ ही एका आर्थिक-सामाजिक-राजकीय परिस्थितीला समाजाने (किंवा त्यातील एखाद्या विभागाने) दिलेला प्रतिसाद असतो. मुंबईतील गेटसभा-बंद-संप-मोर्चे-दीर्घ तुरुंगवास-कलापथके-अभ्यासवर्ग-त्यांचे प्रखर ध्येयवादी डावे राजकीय नेतृत्व अशा स्वरूपांतून विसाव्या शतकातील कामगार चळवळीची प्रतिमा आपल्या सर्वांच्या मनावर कोरली गेलेली आहे. या सर्व परिस्थिती अथवा संघर्षातून कामगार चळवळीची एक प्रतिमा जनमानसात दिसून येते.

या चळवळीचा इतिहास फार जुना आहे. पण अलिकडचा अभ्यास केला तर, आपल्याला असे आढळून येईल की, पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस रशियात कामगार वर्गाच्या सत्तेसाठी क्रांती झाली होती. दोन महायुद्धांच्या दरम्यान सर्व युरोपात भांडवलशाहीला भीषण आर्थिक मंदीने ग्रासले होते. परिणामत: वैचारिक सैद्धांतिक पातळीवर-देखील भांडवलशाहीला मोठेच आव्हान देण्यात आलेले होते. यातील काही बाबी महत्वाच्या असून आपण त्याचा विचार इथे करू.

दुसऱ्या महायुद्धामुळे १९५० नंतर १९७३ पर्यंत भांडवलशाहीला जीवदान मिळाले, पण ही भांडवलशाही आता नव्या रूपात आलेली होती. सरकारच्या मोठ्या हस्तक्षेपावर आधारित कल्याणकारी राज्य या नावाने भांडवलशाहीचा नवा आविष्कार झाला होता. त्यात सामूहिक सौदाशक्ती या नावाने कामगार संघटनांचे मुलभूत अधिकार, सहभाग, संपाचा अधिकार या सर्वांना मान्यता तर होतीच, पण पुढे जाऊन युरोप-अमेरिकेत (भांडवलशाही चौकटीत का होईना) सैद्धांतिक समर्थनदेखील प्राप्त होत होते. १९५० नंतर ज्या बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात भांडवल गुंतवणूक करू लागल्या, त्यांनी आपापल्या देशातील ही नवी व्यवस्थापकीय नीती तेथेदेखील राबविण्यास सुरुवात केली. या कंपन्यांची नवी व्यवस्थापकीय नीती, त्यांची एकूण आर्थिक सुस्थिती आणि मर्यादित स्पर्धा यामुळे तेथील कामगारांचे वेतनमान-अधिकार हे वाढत राहिले.


दुसरे म्हणजे, १९५२ पर्यंत देशात कामगार कायद्यांचा नवा पायाच घातला गेला. त्यातून औद्योगिक विवाद सोडविण्याची नवी यंत्रणा निर्माण झाली. या कायद्याचे अर्थ लावताना १९६० ते १९८० या काळात सर्वोच्च न्यायालयाने कायद्याच्या उद्दिष्टांचा विचार करून कामगारांना अनुकूल असे निवाडे दिले.

तिसरे म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील कारखानदारीचा विकास याच काळात मोठ्या प्रमाणात झाला. तेथेदेखील कामगार संघटनांच्या अधिकारांना मोठा वाव मिळाला. त्यातून अनेक प्रश्नांची सोडवणूक होत होती, पण संघर्ष मात्र ठरलेलाच असायचा, हेही तितकेच खरे.

चौथे म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील नि:स्वार्थी, ध्येयवादी, राजकीय नेतृत्व हे वरील सर्व परिस्थितीत सर्वात प्रभावी ठरले. या घटकांचा एकत्रित परिणाम म्हणून १९८० पर्यंत ज्याला संघटित कामगार म्हणतात, त्या मोठ्या कारखान्यातील कामगारांच्या चळवळीला खूप मोठे उधाण आले.

पण हे यश अनेक मर्यादांनी ग्रस्त होते. त्याचा पाया हा मोठ्या शहरातील मोठ्या कारखान्यांपुरता मर्यादित होता. स्वातंत्र्यपूर्व काळाप्रमाणे, त्याची व्याख्या आणि व्याप्ती उद्योग अशी न राहता, एकेका कारखान्यापुरती संकुचित झाली होती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मोठ्या कारखान्यांतील संघटित कामगारांचे वेतन आणि साधारणत: समाजातील कोणत्याही अन्य कष्टकरी समुदायातील कामगारांचे वेतन यातील अंतर वेगाने वाढत काही पटींपर्यंत पोहोचू लागले. वेतनाचे-नफ्याचे अर्थशास्त्रच त्यामुळे बिघडू लागले.

१९८० नंतर त्यांना या उद्दिष्टांसाठी डावे वैचारिक-



सैद्धांतिक नेतृत्व हे अडगळीप्रमाणे वाटू लागले. त्यांनी त्यांचे स्थानिक नेते शोधले. व्यवस्थापनांनी लाल बावट्याला असणाऱ्या राजकीय विरोधातून, तर काही ठिकाणी तात्कालिक घटकांचा विचार करून अशा तथाकथित उत्स्फूर्त नेतृत्वाला उघड उत्तेजन दिले. मात्र अपरिहार्यपणे काही ठिकाणी अशा संघटना अत्यंत आक्रमक झाल्याने अराजकी, ध्येयहीन आक्रमकता म्हणजेच नवी कामगार चळवळ, असे त्याचे कोडकौतुक करून मुंबईच्या गिरणी कामगारांमधून लाल बावट्याच्या हद्दपारीचे सैद्धांतिक समर्थनदेखील काही तथाकथित डाव्या बुद्धिमंतांनी केले. सर्व नव्या उद्योगांमध्ये ही सिद्धांतहीन आक्रमकता कामगार चळवळीचा स्वभाव असल्याचे मानण्यात आले. शिवसेनेसारख्या उजव्या फॅसिस्ट शक्तींचा राजकीय हत्यार म्हणून वापर करूनदेखील कामगार चळवळ फोडण्यात आली. त्यानंतरच्या काळात कामगार नेते डॉ. दत्ता सामंत यांनी कामगार आघाडीच्या माध्यमातून पुकारलेला १९८२ चा गिरणी कामगारांचा संप तर ऐतिहासिक ठरला. तो अद्यापही कायदेशीररित्या मिटला नसला तरी मुंबईतील गिरण्या आणि गिरणी कामगार कायमचा संपला, ही वस्तुस्थिती आहे. आक्रमक चळवळीचे हे एक उदाहरण इथे विचारात घेण्याजोगे आहे.

त्यानंतरच्या काळात म्हणजे १९९३ साली सोव्हिएत युनियनचा पाडाव झाला. जगातील भांडवलापासून ते शेतीपर्यंतच्या सर्व बाजारपेठा एकत्र जोडण्याचे धोरण जागतिक पातळीवर बड्या देशांनी जगावर लादले. तसेच कल्याणकारी राज्य या कल्पनेला तिलांजली देऊन पुन्हा पूर्वीप्रमाणेच मुक्त बेबंद भांडवलशाहीच्याच मार्गाने जाण्याचे नवे धोरण जाहीर करण्यात आले. सरकारी उद्योगांची गळचेपी सुरू झाली आहे. परिणामी देशात प्रचंड प्रमाणात परदेशी भांडवल- वस्तू- सेवा यांची आयात सुरू झाली.

कामगार कायद्यांचा व्यापक उदार अर्थ मोडीत काढून सर्वोच्च न्यायालयाने आपण राजकीय-आर्थिक सत्तेचेच भाग आहोत, हे आपल्या कामगारविरोधी प्रत्येक निकालातून अधिकाधिक प्रमाणात सिद्ध केले. कामगारांच्या विरोधात नंतरच्या काळात अनेक कारस्थाने झाली. त्यातून कामगार चळवळ नष्ट करण्याचा किंवा पुरती नेस्तनाबूत करण्याकडेच कल राहिला. त्यानुसार उद्योगांसाठी तसेच कामगारांसाठी कायद्यांची निर्मिती करण्यात आली. यामागील एकच नीती होती, ती म्हणजे कामगार चळवळ ही अशी असावी की, कामगारांनी अधिकाधिक तडजोड करून कामे करावीत, त्यांनी न्याय्य हक्कासाठी उद्योगांना जाब विचारू नये, आंदोलने करू नयेत. जणू काही एकप्रकारची गुलामगिरीची सुरूवातच यानिमित्ताने करण्याचा सत्ताधारी वर्गाचा हेतू होता. यामागे फार मोठी भांडवलदारांची लॉबी होती. त्यांनीच त्यांच्या मर्जीनुसार सत्ताधाऱ्यांना त्यांच्यासाठी अनुकूल करून घेतले होते. त्यामुळे कामगार चळवळीची फार मोठी कोंडी झाली आणि ती सोडविण्यासाठी आज कुठल्याही प्रकारे कार्यवाही होताना दिसून येत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

अर्थातच कामगार चळवळीची आज कोंडी झाली आहे, हे निश्चित. पण ती फक्त परिस्थितीने केलेली नाही, तर कामगारांचा विचार, निदान त्या त्या उद्योगाच्या पातळीवर, एक वर्ग म्हणून करण्याच्या दृष्टिकोनाला तिलांजली दिल्यामुळेच ती झालेली आहे, हे दिसून येते.

आजच्या संदर्भाने विचार करताना खालील मुद्द्यांचा विचार चळवळीला करावा लागणार आहे. आज बँक, विमा, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन, माध्यमे, दूरसंचार-संज्ञापन, माहिती तंत्रज्ञान, जाहिरात, संशोधन, हॉटेल, पर्यटन विपणन, वाहतूक यांसारख्या सेवाक्षेत्राची वाढ पूर्णत: असुरक्षित वाटत आहे. खासगी क्षेत्रात दर वर्षी किमान १० टक्के वाढ दराने होत आहे. देशातील एकूण रोजगारामध्ये ३० टक्क्यांहून अधिक आणि आर्थिक उत्पादनात ६० टक्के इतका सेवाक्षेत्राचा वाटा आहे. वस्तू उत्पादनाच्या क्षेत्रात देखील कित्येक कार्याचे सेवांमध्ये रूपांतर होत आहे. बहुतेक सेवाक्षेत्रांत माहिती तंत्रज्ञानामुळे स्थळांच्या-देशांच्या-प्रांतांच्या सीमा या संदर्भहीन झाल्या आहेत.

सेवाक्षेत्रातील रोजगाराचे आणि कर्मचारी प्रशासनाचे धोरण सामूहिक नसून वैयक्तिक आहे. प्रत्येक कर्मचारी हा दुसऱ्याचा स्पर्धक म्हणूनच वापरला जातो आहे. संस्थेशी बांधीलकी, संस्थेचा अभिमान, एका संस्थेत करिअर या संकल्पना देखील हद्दपार केल्या जात आहेत. असा विचार हा मागास किंवा अकार्यक्षम लोकांचा म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. या क्षेत्राकडे कामगार अधिक संख्येने वळला, तसेच त्या सेवा देणाऱ्या संस्था तसेच सेवा उद्योगांनाही वाव मिळत गेला.

सेवाक्षेत्रातील नवा कर्मचारी तुलनेने अधिक शिक्षित आहे, शहरी आहे. त्याच्या सार्वजनिक जीवनात सामुहिकतेला किंचित-देखील स्थान राहिलेले नाही. शिक्षण-घर-कर्ज या प्रत्येक बाबतीत त्याला दीर्घकालीन कर्जाचाच आधार घ्यावा लागतो. नोकरी, कामाचे तास आणि त्यातील उन्नती याबाबत पूर्ण असुरक्षितता आहे. यामुळे त्याच्या आनंदाच्या, उन्नतीच्या, उपभोगाच्या, नीतीच्या सर्व संकल्पना या पूर्णत: वैयक्तिक बनल्या आहेत. या सर्व मुद्यांचा आपण गंभीरपणे विचार करत नाही किंवा तशी मानसिकताही सध्या तरी दिसून येत नाही.

या पार्श्वभूमीवर तेथे कामगार चळवळीचा अर्थ कसा लावायचा, कसा पोहोचवायचा? याचे मोठे आव्हान या वित्त भांडवलाच्या कालखंडामध्ये आपल्यासमोर आहे. कामगार चळवळीचा अर्थ हा भांडवलदारांना अनुकूल आणि प्रतिकूल अशाच वर्गवारी आढळतो आणि विशेष म्हणजे भांडवलदारांना अनुकूल असलेल्याच्या कामगार संघटना अधिक असल्याचे चित्र आहे. आज सेवाक्षेत्रातील कामाचे स्वरूप लक्षात घेऊन त्यांच्या औद्यौगिक पातळीवरील संघटना संस्थांची निर्मिती आवश्यक आहे. निदान आपल्याच कारखान्यातील कंत्राटी कामगारांना समान कामाला समान वेतन या तत्त्वानुसार वेतन मिळालेच पाहिजे, या भूमिकेवर येऊन त्यासाठी संप-लढे प्रत्यक्षात जोपर्यंत त्यांच्याकडून सुरू होत नाहीत, तोपर्यंत कामगारांचे भवितव्य अंधारात आहे.

• संपादक : एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण • कार्यकारी संपादक : अशोक रामचंद्र शिंदे प्रकाशक-मुद्रक : श्री.एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण यांनी कर्मचारी टाइम्स हे मासिक राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ साठी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीअल इस्टेट, केशवराव खाड्ये मार्ग, जेकब सर्कल, मुंबई ४०००११ येथे छापून राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२ येथे प्रसिद्ध केले. शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त. • संपर्क संपादकीय : ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६, जाहिरात : ९८९०९१६५८८, ७९७२९२७०१५ वितरण : ९८९०९१६५८८, ९५०३५७९५५२ • ई मेल : karmacharitimes@gmail.com वेबसाईट : www.karmacharitimes.com • सर्व कायदेशीर बाबी मुंबई न्यायालयाच्या कक्षेत • (प्रेरणास्थान : आदरणीय कै. र.ग.कर्णिक, संस्थापक : भाऊसाहेब पठाण)

Editor : M.M. Alias Bhausaheb Pathan Executive Editor : Ashok Ramchandra Shinde Publisher Printer : Shri. M.M. Alias Bhausaheb Pathan printed the magazine 'Karmachari Times' for State Government Group D (Class IV) Employee Central Federation at Plascote Industries, 23 Municipal Industrial Estate, Keshavrao Khadye Marg, Jacob Circle, Mumbai 400011. State Government Group D (Class IV) Employees Central Federation, 9, New Administration Building, Ground Floor, Madam Cama Marg, Opposite Mantralaya, Mumbai 400032. Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India. • Contact - Editorial : 9890916588, 9821374626 • Advertisement : 9890916588, 9503579552 • Distribution : 9890916588, 9503579552
E-mail : karmacharitimes@gmail.com Website : www.karmacharitimes.com • All Legal matter subject to Mumbai Jurisdiction